December 2012

December 31

इथे ' मी ' म्हणजे फक्त मी नव्हे --

जगाच्या रीतीचे भानही सुटलेली अभिसारिका फक्त एका क्षणाच्या रंगतीचा सहवास मागते आहे ! सुंदर चित्र !

जोग म्हणजे जागृती !

या बाबतीत दुसऱ्यांचा सल्ला विचारणे हाच मुख्य दोष --

जवळजवळ सगळेच स्खलनशील, गोंधळलेले असे असूनही आपापले म्हणणे मांडत असतात आणि प्रत्यक्ष जगण्यात आंतर विरोधाने युक्तही असतात -- मलाही अंतिम वा सत्य समजते, असा माझा दावा नाही -- माझ्या अपुऱ्या, माझ्या वाट्याला आलेल्या, जगण्यातून जे समजले ते मात्र मी इथे प्रामाणिकपणे बोलतो --

जे कुणी म्हटलेलेच नाही, त्यावर तुम्ही आक्षेप घेत आहात --

December 27

कदाचित जादूची छडी वा ठोस उपाय तातडीने हवा असणे हीही तीव्र आंदोलनामागची, कडक शिक्षेच्या मागणीमागची प्रेरणा असेल. फेसबुकवर खरडणारे तर जाऊच द्या, स्वतःच्या मनात अशा प्रश्नांबद्दल सजग, संवेदनशील असलेले सगळेच कृतिशील आहेत, असे मला वाटते. उद्वेग ठीक आहे, त्यातून कदाचित जास्त कळकळ व्यक्त होईल. प्रश्न समजून घेत राहणेच महत्त्वाचे. ' मला काय त्याचे ' असे म्हणणारेही काही असू शकतील -- त्यांनी कसे जगावे याचा सल्ला मी देऊ शकत नाही कारण तुम्ही तरी काय करू शकताय, या प्रश्नावर काय बोलणार ? दुसऱ्यांनी काय करावे यावर भर देण्यापेक्षा, हे समजून घेण्याच्या प्रक्रियेत असणे अधिक महत्त्वाचे नाही का ?

माझे म्हणणे समोरच्या कुठल्याही प्रश्नाचा आवाका घेताना त्यावर उपाय सांगता आले तरच बोलावे, असे नाही. प्रश्न समजून घेण्याच्या प्रक्रियेला, लगेच उपाय सांगितला नाही म्हणून नाकारता येणार नाही. कदाचित ठोस, हा उपाय, असे होणारही नाही, तरीही, त्या प्रश्नाकडे पाहिले जाणे वाईट नाही. विचार करणारे म्हणजे कृतीहीन आणि आदोलन करणारेच फक्त कृतिशील, असे गृहीत धरावे का ? सोपी उत्तरेच कदाचित अटळ असतील -- आणि तरीही, प्रश्नाच्या मुळाकडे जाण्याचे प्रयत्न चालूच राहाणे इष्ट वाटते.

December 26

सेक्सक्रीडके ( सेक्स टॉईज ) उपलब्ध असणे हा प्रतिबंधक उपाय होईल का -- काही प्रमाणात तरी ?

हा एक वेगळाच मुद्दा मांडला गेला आहे -- Rape is a crime only for a male-dominant society. If you try a woman's point of view, rape is far lesser crime just like pick-pocketing. -- आहे का असे ?

फलाशा न धरता कर्म करावे -- हे सगळ्यांना माहीत आहे हो -- पण दिसतोय का कुणी असा ?

आपल्या नोकरीच्या / उद्योगाच्या क्षेत्रात निष्णात असलेले तिथून बाहेर पडल्यावर एकदम पोकळीत गेल्यासारखे होतात, असे अनेकदा दिसते. कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक कृतीत इंटरेस्ट नसेल तर असे होत असावे. बागकाम, स्वायंपाक असे तरी काही आवडीचे असायला हवे. तसे दुसरे काहीच नसेल तर अनेकांना अवघड जाते, हे खरे आहे.

इथे आपण जे बोलतो ते निरर्थक ठरते, असे मुळीच समजू नये -- सगळे मिळून हे मानवी मन आहे -- इथे एखादा महत्त्वाचा कण सापडला तर पूर्ण एकूण माणसालाही तो काही देऊ शकतो, यात शंकाच नाही --

December 25

त्रस्ततेच्या सगळ्याच कारणांचे मन रास्त समर्थन करते !

अहो, साधा पेपर फोडून पैसे कमावणाराही एखाद्या विद्यार्थ्याच्या आत्महत्येला कारणीभूत होत नाही ? कुणाकुणाला आणि कितीजणांना फाशी देणार ! मला शक्य असलेला हिंसाचार सोडून बाकीच्यांना फाशी द्या, एवढीच माझी रास्त मागणी असते !

माझे मन हे सारखे बाहेरून आत, असे ' मिळवत ' असते -- हा एक मुद्दा -- आणि सेक्सानंदाचा एकच क्षण मला माझ्या ताणतणावांतून सुटायला उपलब्ध असल्याने तो अतिमहत्त्वाचा होऊन बसणे -- हा दुसरा प्रश्न -- यांकडे लक्ष न देता , आपले आहे ते तसेच चालू ठेवून, आपल्याला प्रश्न सोडवून हवे आहेत !

मला या प्रश्नांची निराकरणे मी माझ्यात शोधली पाहिजेत असेच वाटते -- बाहेर उपाय करत धावाधाव करणे, फारसे उपयोगाचे नाही -- तुमची पोस्ट या मुद्याकडेही निर्देश करते, असे मला दिसते --

-- माझ्या सर्व गरजा भागलेले आयुष्य, ही एक अशक्य बाब आहे --

रोमांचक चर्चा !

आत्तापर्यंतचा गोषवारा असा निघतो -- ' आत्मकेंद्री ' आणि ' लोकांबरोबर ' यांत फार फरक नाही -- आत्मकेंद्री माणूस हिंदू, मराठी, समाजवादी, कम्युनिस्ट, काँग्रेसवाला, भारतीय -- असा असला म्हणजे त्याच्या आत्मकेंद्रीपणाचा परीघ वाढतो. आता ' प्रवाविरुद्ध ' म्हणजे काय, हे पाहावे लागेल.

December 24

एक मोठे लेखक म्हणाले, प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्या कलावंतांना वाव ठेवा !

सिमेंटमध्ये भेसळ करून इमारत कच्ची होण्याबद्दल बेफिकीर राहून अनेक मजुरांच्या मृत्यूंना कारणीभूत होणारे, औषधांत भेसळ करणारे, शालेय मुलांच्या अन्नासाठी असलेले पैसे त्यासाठी न वापरणारे,केमिकल दूध तयार करून विकणारे, करोडोंचे घोटाळे करणारे, स्वतःची मौजमजा आणि सतत काही ना काही साजरे करत जगणारे -- हे सगळे पाहून, हे काहीच उपलब्ध नसलेल्या, बेकार, चिरडल्या गेलेल्या लोकांची मनःस्थिती काय होत असेल ? अमुक एक गोष्ट गुन्हा समजावी, हे समाजमान्यच असते -- हे सगळे थांबले पाहिजे याबाबत दुमत नसतेच आणि तरीही प्रचंड प्रमाणावर हे घडत असलेले दिसते. या सर्व बाबतींत शिक्षांची तीव्रता वाढवावी, त्या अधिक भयानक कराव्यात, यावरही एकमत होऊ शकते !

हे माझे वाक्य म्हणून दिलेले नसून, असे म्हणण्यात काय अंतर्भूत असते ते तपासले जावे, हा हेतू आहे.

माझी प्रतिक्रिया ही क्षची नसते किंवा क्षची प्रतिक्रिया माझी नसते -- या अर्थाने सगळेच एकमेकांना नाकारत असतात -- प्रश्न तो नाही -- एखादी प्रतिक्रिया नोंदवून त्या विषयावर काही घडते का हे पाहणे -- तेच इथे फारसे काही घडले नाही -- प्रतिक्रियांचे मूल्य ठरवता येत नाही, हे यासाठीच म्हटले होते -- तिकडे दुर्लक्ष होते आहे -- असो --

December 23

फारच वाईट झाले. अक्षयने माझ्या एका नाटकात काम केले होते, त्या वेळी या उगवत्या ताऱ्याची ओळखही झाली होती. दोन्ही उत्तम नट गेले ! मोठे नुकसान ! आणि अक्षयचा छोटा ! काय बोलणार --

मराठी साहित्यात बोंबलायला होऊन होऊन कसले गुन्हे होणार ? हिंदीत जावे त्यांनी ! दबंग व्हावे !

अरे वा ! आयुष्यभर व्रतस्थपणे प्रायोगिक रंगभूमीच्या क्षेत्रात काम करत राहिलेले काकडे काका ! त्यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा !

सगळ्या प्रतिक्रिया या कुणाची ना कुणाची स्पेस इन्व्हेड करणाऱ्याच असतात ! कुणाचीही स्पेस इन्व्हेड न करणारी प्रतिक्रिया ही अस्तित्वात असूच न शकणारी स्वप्नीलता आहे !

मी तेच म्हणतोय -- प्रतिक्रया अमुक अशी असावी की नसावी -- हे म्हणण्यात फारसा अर्थ नसतो -- प्रतिक्रियेचे प्रोग्रामिंग हे लाखो घटकांनी ठरत असते -- काही लोक, पूर्ण माणूस -- ही चर्चा ठीक आहे पण आपण देतो त्या सगळ्या प्रतिक्रिया ' आपल्या ' असतात -- मग दुसऱ्याच्या कशा असाव्यात, हे आपण का बोलतो ? तर , एक तर सगळे मिळून बोलताना एखाद्या विषयाचे भान वाढते का, ते पाहण्यासाठी किंवा आपलेच रेटण्यासाठी -- आपण काहींना क्रिमिनल, वेडे म्हणतो, तेही सापेक्ष असते असे म्हणणारे लोक आहेत -- म्हणून थांबत काहीच नाही --

December 22

अमुक प्रतिक्र्या पद्धती अधिक मौल्यवान असे सिद्ध करता येत नाही --

आपण एकटे हवेत जगत नसतो -- क्रियाप्रतिक्र्यांचेच जगणे चालू असते -- संबंधांशिवाय जगणे असू शकते ? आपले आणि इतरांचे मिळूनच जगणे असते -- एकमेकांचे एकमेकांवर परिणाम होत असतात -- प्रतिक्रिया सगळ्या अर्धवटच असतात -- ' सत्य ' वगैरे नसतात -- पण त्या असतात --

भिन्नलिंगी व्यक्तींच्या सहवासात मतभेद वगैरे किरकोळ गोष्टींची तीव्रता आपोआप कमी होते ! यावरून काय ते घ्या समजून !

December 21

-- बलात्काऱ्यांना शिक्षा काय द्यावी याची चर्चा, निर्णय व्हावाच -- पण प्रिव्हेंटिव्हमध्ये काय काय यावे, हेही पाहायला हवे --

December 20

एखादे स्थिर तत्त्व पाळण्याच्या अट्टहासामुळे असे कन्फ्यूजन होऊ शकते !

मला यात घट्ट धरून ठेवलेली सुरक्षितता आणि तळाशी असणारी अप्रत्यक्ष अशी असुरक्षिततेची भीती जाणवते !

December 16

' पॉजपेयी ' ही सिक्सर आहे !

समजा तत्त्वज्ञानात विचार असतो -- ती कृती असते की नसते ?

आता कृतिशीलता म्हणजे काय, हेच आधी तपासायला हवे.

लेखक भीतीतून मुक्त कधी होतो -- हेच -- कधी कधी भीती ही स्ट्रॅटेजीही असते --

की त्या त्या वेळच्या आपल्या प्रतिक्रिया हेच योग्य आणि हेच शहाणपण ?

आणि क्षणोक्षणी योग्य म्हणजे काय ?

लाईफपॅटर्न्स वेगळे असतात, जनुकनकाशे वेगळे असतात, कुणीही कोणत्याही कारणाने स्वतःला फार श्रेष्ठ वगैरे समजत असेल तर ती व्यक्ती भ्रमातच असते, यात शंकाच नाही -- पण --

मी नोकरी केली आणि आनंदाने -- त्यातल्या सगळ्या बऱ्यावाईटासह केली -- लेखन हा माझा काहीही कमवण्याचा विषयच नाही --

आधी, जे आहे त्याचे भान महत्त्वाचे --

पाहण्यावर बंधने नकोत -- फ्री असणे म्हणजे काय, हा वेगळाच विषय आहे --

त्याला लोक ' भूमिका ' नसलेला माणूस म्हणून हिणवतील !

वाजले, गाजले, भाजले, माजले, शिजले आणि पुजलेही ! भिजले आणि भजले सुद्धा !

' सम्यक क्रांती ' असे कधीकधी ऐकण्या-वाचण्यात येते -- त्यात राजकीय सत्ताबदलासह आणखी काय काय समाविष्ट असते ?

बऱ्याच वेळी नाटकांचा विजय व्हायच्या ऐवजी परीक्षकांचाच विजय होत असतो !

December 10
Champra Deshpande commented on a post.

परवा गोपूंच्या डॉक्युमेंटरीतही ' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकावर बोलताना नेमाडे त्यातल्या संवादांच्या भाषेवरच बोलताना दिसले ! कलाकृतीच्या आशयाबाबत या महान समीक्षकाचे काही चिंतनच नाही, असे म्हणावे की काय ?

मी विद्वान नाही, वाचलेले लक्षात राहतेच, असेही मी म्हणणार नाही, पण एखादी कलाकृती आशयाच्या अंगाने चांगली वा वाईट कशी ठरते, असे कुठे काही नेमाड्यांनी लिहिले असेल तर कुणीतरी दाखवावे. भाषिक स्वायत्तता , वास्तववाद, आकार केवढा असावा -- हे सगळे ठीक -- कलाकृतीचा आशय असे काही असते का आणि ते कितपत महत्त्वाचे असते, या महत्त्वाच्या विषयावर हे महान समीक्षक कुठेतरी बोलले असतीलच ( मला माहीत नाही कारण मी सगळे वाचलेले नाही ) -- ते कुणाला माहीत असल्यास सांगावे, ही विनंती.

संवाद सुरू होतोय की वाद सुरू होतोय, याचा आधीच अंदाज घ्यावा !

आपल्याला फारसे काही कळत नाही, याची जाणीव खूपजणांना असते -- डोंट वरी !

सायकिॲट्रिस्टनासुद्धा एकमेकांची कटिंग करून घ्यावी लागते ! ( अहो, डॉक्टर नाही का आजारी पडत ? आणि एकमेकांना औषधे देत ? )

ऑफीसची कामे, तांत्रिक बाबी ठीक -- त्याबद्दल नाही -- मनःस्थिती कधीच परिपूर्ण नसणे -- या अर्थी --

माझेही आडनाव देशपांडे असल्यामुळे आणि मीही लिहीत असल्यामुळे, पूर्वी काहीजण मला म्हणत, " लिहीत राहा तुम्ही -- एक दिवशी तुम्हालाही पुलंसारखे लिहायला जमेल ! " पण अनेक वर्षांत नाहीच जमले ! आता म्हणतात, " बरा छंद लावून घेतलाय तुम्ही -- लिहिण्या-वाचण्याचा -- वेळ घालवायचा प्रश्नच नाही ! " सध्या माझी लेटेस्ट पायरी ही आहे -- " अजून लिहिता तुम्ही ? "

म्हणजे नकारार्थी उत्तर हाच निष्कर्ष समजायचा का ?

उदाहरणे ज्या त्या व्यक्तीने आपापल्या आयुष्यातली पाहावीत, ही नम्र विनंती --

स्वतःचा कोणताच निर्णय, कृती वा अवस्था निर्दोष, पूर्ण, बरोबर वा समाधानकारक न वाटणे -- हा या पोस्टचा विषय आहे. त्यामुळे पूर्ण बरोबर असे काही असते का, हा एक समोर येणारा प्रश्न आहे.

प्रश्न हा आहे की हे सगळे असेच ठेवून परिवर्तन म्हणजे काय करायचे आहे ?

मी नाटककार होणे महत्त्वाचे नाही ( सगळ्यांनी चांगले जगणे महत्त्वाचे ), नियतीवाद, प्रयत्नवाद -- असे फाटे फोडायचे नाहीत -- मुद्यावर बोलायचे --

पुस्तकांची नावे आणि मुखपृष्ठे पाहायला मराठी वाचक यावेत म्हणून आणखी काहीतरी अधिकची स्ट्रॅटेजी लागेल ! पण तरी अवघडच होईल -- हे पुस्तक दर्जेदार असण्याची शक्यता आहे, हा वास येतोच मराठी वाचकांना ! मग ते टाळतात. वाचतानासुद्धा ते पुस्तक दर्जेदार वाटता कामा नये, यासाठीही लागेल एक जबर युक्ती ! मग जमेल !

एसटी ड्रायव्हरवर अवलंबून असणे, महानगरपालिकेवर अवलंबून असणे -- हे भीतीयुक्त नसते तर मानवी नात्यातले वा इतर संबंधातले अवलंबित्व जर भावनिक असेल तर ते भीतीयुक्त असते -- उदा -- एखादा फर्निचरपीस, पाळलेले कुत्रे, झाड, असे काहीही.

अनिश्चितता ही जगण्यातच आहे, तर इथेही असणारच --

शिवाय अनेकदा वचनाचेही गोंधळ जाणवतात. ' बैठक ' चे अनेकवचन ' बैठकी ' की ' बैठका ' असा आजच सकाळी मला प्रश्न पडला होता. मग ' सहल ' चे ' सहली ' हेते ना, मग ' बैठकी ' च बरोबर, असे ठरवून टाकले !

ज्यांचे बोलणे तर सोडाच, ओळखीही झाल्या नसत्या अशा व्यक्ती इथे फ्रेंड होऊन आपसात संवाद साधतात !

मुळात मेंदूचा वापरच खूप कमी टक्के होतो म्हणतात -- त्यातही अनावश्यक विचार भरले गेले तर उपलब्ध शक्ती कितपत वापरली जाते, हा प्रश्नच आहे !

मीच दुभंग असल्यावर मला काय दिसणार ? -- चांगली कविता !

अपराधी भावना बाळगत जगावे का, हा प्रश्नच आहे.

विध्वंसक अस्मिता डोक्यांत धगधगत ठेवायला स्मारकांचा खूप उपयोग होतो ! एकात्मता या विषयावर भाषणे देता यावी अशी परिस्थिती कायम ठेवता येते !

December 3

' तुमच्या जगण्यात जशा अपेक्षा असतात तसे आयुष्य तुम्हाला मिळते ' -- हे मला हस्तरेषाशास्त्राचे पायातत्त्व वाटते. या शास्त्राचा मी सुमारे सात वर्षे प्राणपणाने अभ्यास केला. ( याची गोडी लागली तर दारूची नशा फिकी पडेल ! ) मला ही अंधश्रद्धा वाटत नाही. यातले कालमापन सरासरी आयुष्यमानावर बेतले जात असल्याने २-३ वर्षे इकडेतिकडे होतात, एवढेच. तुमच्या अपेक्षा मेंदूत ग्रथित असतात आणि त्या तुमच्या तळव्यावर उमटलेल्या असतात, असे यातले गृहीत आहे.

मूल्य ही गोष्टच मुळात सत्ताधाऱ्यांनी घडवलेली असते, हे कळल्यावर, त्यांना उधळून लावायला हा सटरफटर मार्ग अत्युत्तम !

कित्येक वर्षांपूर्वी मी एक ' द फनी ओल्ड मॅन ' नामक झेक चित्रपट पाहिला होता. तो विनोदी-गंभीर होता. ग्रेट चित्रपट ! अजूनही खूपसा माझ्या लक्षात आहे ! तो पाहिल्यानंतर थोड्याच दिवसांत मला चिं. त्र्यं. खानोलकर भेटले होते, त्यांना मी तो कण न कण सांगितला होता. त्यांना ते सगळे इतके आवडले की ' कल्पना एका झेक चित्रपटावरून ' असा उल्लेख करून त्यांनी त्यावर ' अज्ञात कबुतरे ' नावाची कादंबरी लिहिली !

फुली फुली खाली अत्तराचे दिवे -- म्हटले तरी काहीतरी घडणारच हो मेंदूत --

बुद्धीने वा कुणाच्याही स्वभावाने मानवी संबंधांचे प्रश्न सुटत नाहीत -- या प्रश्नाला अध्यात्मिक म्हणावे लागेल. समाज एकत्रितपणे हिंदुत्ववादी किंवा कम्युनिस्ट होऊ शकतो, तशा पद्धतीने हे प्रश्न समजणार नाहीत. प्रत्येक व्यक्तीत ती सखोलता यावी लागेल.

मनाची स्थितिशीलता -- एकाच बिंदूवर अडकून पडणे -- याबाबतची ही पोस्ट आहे. एखाद्या प्रिय व्यक्तीची थोडा वेळ वाट पाहणे, त्याच व्यक्तीच्या विचारात राहणे हे जरा सनसनाटी, सुखाचे आणि इंटरेस्टिंग वाटू शकते -- पण ती मर्यादा संपल्यावर ? वर आलेल्या उदाहरणाप्रमाणे हेच वर्षानुवर्षे चालले तर ? आणि मनाची स्थितिशीलता आणि सातत्य पाहता, तेच चालू आहे, असे दिसते ! वर्षानुवर्षे वाट पाहणे ! यामुळेच ' वेटिंग फॉर गोदो ' हे नाटक लिहिले गेले असावे, असे वाटते !

जगता जगताच जगणे समजून घेण्याची प्रक्रियाही चालू असावी, असे काहींना वाटते, त्यांतला मी एक आहे. एखादा प्रसंग वा संकट वा आघात असा स्वतंत्रपणे -- इन आयसोलेशन -- समजून घेता येत नाही आणि प्रसंगांचे मूल्यही व्यक्तिगत असते. त्यामुळे, लहानमोठ्या कोणत्याही गोष्टीतून ही प्रक्रिया चालू राहावी लागणार. सगळ्यांनाच याची समान अर्जन्सी असेल, असेही नाही. काहींना या प्रक्रियेची गरजच नाही आहे, असे जगावे, असेही वाटू शकते. हे सगळे गृहीत धरूनच या पोस्टस देत असतो. मूळ मुद्यावर लिहीनच.

कोणतेही व्यसन जसे जगण्यातल्या प्रश्नांपासून पळवाट म्हणून वापरले जाते, त्या अर्थी इथे ' पळवाट ' म्हटले आहे --

तू जगणे स्थगित करण्याचे गॅरंटीड मार्ग तर सांगत नाहीयस ना ?

आपण सगळे मिळून काही समजून घेत असताना किती अनपेक्षितपणे खोलात जातो, हे खरोखर अति-महत्त्वाचे वाटते !

प्रियकराने प्रेयसीची किंवा तिने त्याची वाट पाहणे, हे तर अत्युच्च वाट पाहणे ! त्याचे काय ? ते जगणे की स्थगित होणे ?

समान इंटरेस्ट असलेल्या व्यक्ती एरवी कधीतरीच भेटू शकत होत्या, त्या इथे रोजही भेटू शकतात. मला हा नुसता शाब्दिक संवाद वाटत नाही -- हा मानसिक सहवासही आहे. त्यामुळे शारीरिक वये, समाजातला दर्जा यांवर अवलंबून नसलेली मैत्री

इथे शक्य होते. तुम्ही जितके खुले असाल तितका खुला प्रदेश इथे उपलब्ध होतो. विश्वास निर्माण झाला तर प्रगाढ मैत्री होऊ शकते. या फेसबुकचा पळवाट म्हणून उपयोग न होता जगणे म्हणूनच याचा आयुष्यात अंतर्भाव झाला तर ही एक खूपच उपकारक गोष्ट वाटते. जे लोक हे माध्यम पळवाट म्हणून वापरतील त्यांचे जगणे खुरटेल आणि खुंटेल !

माणसाचे मानसिक पोट भरू शकते का, एवढाच प्रश्न आहे !

कोलाहलानुभव सगळे काव्याग्नीत जळून नष्ट व्हावे !

आपल्या आतला कोलाहल वेगळा आणि बाहेरचा वेगळा, असे खरेच आहे का, याची शंका येते --

ज्येष्ठ नागरिकांसाठी ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ मंडळ ः एक विचार -- मिळून साऱ्याजणी

miloonsaryajani.com

ज्येष्ठ विवाहित जोडप्यांमधली एक व्यक्ती निवर्तल्यावर उरलेल्या व्यक्तीला एकाकी वाटण्याचा हा प्रश्न. आजच्या काळाच्या माहोलामुळे वाढणारी त्याची तीव्रता. स्थलकालपरिस्थितीनुरूप प्रश्न आणि त्यांची स्वरूपे बदलणे, वागण्याच्या व नीतीच्या कल्पना बदलणे, हे होतच राहते – त्यात काहीजण पायाचे दगड वा धाडसी प्रवर्तकही होतात. पुढे ती वाट रुळते, त्यातले आश्चर्य कमी होत जाते, तसे याही बाबतीत होईल, असे वाटते. असे आणखी काही प्रश्नही वातावरणात आहेत पण ते सर्वमान्य नैतिक रचनेला धक्का लावणारे असल्याने त्यांबद्दल कुणी फारसे बोलत नाही. विवाहाचे साधारण वय लक्षात घेतले तर त्या वयात कुणाचीच विशेष योग्यता वा क्षमता सिद्ध झालेली नसते, स्वतःच्याही आवडीनिवडी, विचार समजणे चालू असते, नात्यात कशा प्रकारचे प्रश्न येऊ शकतात याची नीटशी कल्पना नसते. अशा अवस्थेत तात्कालिक आकर्षण, परिस्थितीचा वा व्यक्तींचा दबाव, अशा कारणांनी बरेचसे विवाह संपन्न होतात. विशेषतः स्त्रियांचे शिक्षण वा व्यक्तिविकास एकूणच कमी असण्याच्या काळात ते तसेच धकूनही गेले असेल. आता प्रौढ वयात अनेकांना आपली निवड चुकलेली आहे, हे प्रकर्षाने जाणवत असते. त्याचबरोबर संसार वाढलेला असतो, मुलेबाळेही असतात आणि त्यांचे प्रश्न आघाडीवर असतात. अशा वेळी मोडतोड वा घटस्फोट या मार्गाने जाणे योग्य वाटत नाही. पण मन असमाधानी व क्षुब्ध राहते. या परिस्थितीत त्या स्त्री व पुरुष विवाहितांनी नवी मैत्री करणे, त्या नव्या संबंधित व्यक्तीबरोबर एकत्र राहणे – असे का घडू नये ? याचे काय परिणाम होऊ शकतील ? – हाही चर्चेचा विषय होऊ शकतो.

असे खूपच विषय असू शकतील आणि त्यांवर न्याय्य मार्ग निघावे असेही वाटू शकेल – ते होतही राहील. तरीही आयुष्य प्रश्नहीन होईल असे नाही आणि एका प्रश्नातून मार्ग काढता काढता दुसरे अनेक प्रश्न निर्माणही होऊ शकतील. ही सर्व

प्रक्रिया चालू आहे आणि चालू राहीलच. याचबरोबर, असे स्थलकालपरिस्थितींच्या प्रश्नांत आयुष्य गाडले न जाता जगणे शक्य आहे का, हाही प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे, असे वाटते.

भारताचे मनुष्यबळ वाढवण्यासाठी सगळा खटाटोप !

मानसिक द्वंद्वात्मकता -- विदीर्णता स्वतःबरोबरच अपूर्णतेची भावना आणते. ही विदीर्णता कायम राहून बदल घडतात, तथाकथित ' प्रगती ' ही होते -- पण या विदीर्णतेतच जगणे बंदिस्त होते -- जगण्यातली जान जाते --

उलट अपूर्णतेत माणूस बंदिस्त होतो, संवेदनशीलता जाते, जगणे खुंटते -- माणूस रिजिड, घट्ट होत जातो, आकलनाची शक्यता दुरावते --

त्या रंगाच्या जाहिरातीत म्हटले जाते तसे, " ऐसा नही है, अवधूत, ऐसा नही है । " आपल्या लक्षात आलेली एखादी गोष्ट मांडल्यावर, त्या बाबतीत ज्याला जे सुचेल ते इथे आधी यावे, असे मला वाटते. त्यामुळे त्या बाबतीतले अधिक आयाम समोर येतात. आणि ' मला माहीत आहे ' असे शब्द वा आविर्भाव वा मानसिक अवस्था होऊ न देता जेवढे बोलता येईल तेवढेच बोलायचे, हे माझे ठरलेले असते.

समजा पॉझिटिव्हली मला काहीही समजलेले नाही पण तुमची पद्धत कुचकामी आहे हे मात्र मला दिसते आहे -- अशा परिस्थितीत, हे नाकारल्याशिवाय नवीन शक्यता समोर तरी कशी येणार ? अशा विश्लेषणात्मक आणि विच्छिन्न पद्धतीने मानवी प्रश्न समजूच शकत नाहीत, हे मात्र मला स्पष्ट दिसते. समजणे याचा अर्थ, त्या प्रश्नाचे मूळच नष्ट होणे, असा मी करतो. बाकी सगळे समजणे म्हणजे गोंधळ या ना त्या रूपात चालू ठेवणे असते.

मानसिक सातत्य गृहीत धरल्याने वयपरत्वे माणूस चिडचिडा होत जातो कारण तो भूतकाळात रुतत गेल्याने त्याचा वर्तमानाशी संघर्ष वाढत जातो.

Abhijeet Zunjarrao's photo.
आत्ताच पाहिले सगळे फोटो -- छान आहेत !

अच्छा ! बुद्धीने अशी प्रश्नांची शकले पाडून त्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढणे म्हणजे समजणे, असे तुमचे मत दिसते ! अशा वेलफॉर्म्ड प्रश्नांचा आणि त्यांतून मिळणाऱ्या निष्कर्षांचा प्रत्यक्ष जगण्यात उपयोग नाही, असे मला दिसते. कितीही शकले केली तरीही निष्कर्ष वेगवेगळे येऊ शकतात, हेही आहेच ! आणि असे निष्कर्ष काढेपर्यंत आणखी हजारो प्रश्न निर्माण झालेले असणार ! ही पद्धत फेल होताना दिसते म्हणूनच तर, सर्व प्रश्नांचे मूळ एकच असेल का, ही शक्यता या पोस्टमध्ये घेतलेली आहे.

हे पाहायला खरे तर प्रत्येक व्यक्तीला उसंत मिळाली पाहिजे, हे एक, आणि अधिकाधिक व्यक्तींना याचे महत्त्व वाटून त्यांनी यासाठी उसंत काढलीही पाहिजे, असे वाटते -- कारण हे सर्वांच्या आरोग्यपूर्ण जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. दिसायला साधी दिसणारी ही गोष्ट खूपच महत्त्वाची वाटते. समोर येणारे असे प्रश्न म्हणजे चैन वा करमणूक नसून प्रत्यक्ष जगण्याशी खोलवरचा संबंध असलेले आहेत, असे मला दिसते.

"प्रामाणिक-अप्रामाणिक हे द्वंद्वही फारसे विश्वासार्ह नाही --"

"दोन विरुद्ध गोष्टी एकाच वेळी सत्य ?"

"मानवी प्रश्न हे स्वतंत्रपणे एकेक असे अस्तित्वात नसून ते एकमेकांत गुंतलेले, एकमेकांवर परिणाम करणारे असतात, असे अनेकदा व्यक्त होते -- याला काही अर्थ आहे की नाही ?"

MIDNIGHT INTERLUDE - By - Omkar Kulkarni

"थत्तेजी, मी माझ्या पद्धतीने आधीच या फिल्मवर इथे लिहिले आहे, त्यामुळे, पुन्हा लिहीत नाही. तुम्ही दृश्य आणि संगीत या अंगांनी या फिल्मची अर्थसमृद्धी दाखवून दिलीत, ती खूप महत्त्वाची वाटली !"

"मानसिक / काल्पनिक भीतीचा अंश असलेले सगळेच विचार, नुसते अप्रगल्भच नव्हे तर हिंसक आणि विध्वंसक असतात. ते प्रचंड प्रमाणात भूतकाळ आणि भविष्यकाळात अडकणे असते. किनारा सोडूनच या प्रश्नाला तोंड देणे शक्य होऊ शकते."

"फारच महत्त्वाची शक्यता ! माझ्या ' वस्तू ' या नाटकात या शक्यतेशी संबंधित एक प्रसंग आहे."

"स्वतःला उमगलेल्या सत्याशी स्वतःला धरून ठेवण्याचे प्रयत्न -- हेच तर चालू असते सतत -- ते स्वतःच्या मर्यादित कुवतीत चालत असल्याने, त्यातून समजत काहीच नाही, नुसतीच एक संघर्षमय अवस्था चालू राहते. यातून शेवटी थकणे आणि निराशावादी होणे, हाच धोका जास्त ! मन याचे बौद्धिक समर्थन करत राहते आणि उदात्तीकरणही !"

"त्यापेक्षा टक्कलवाले जास्त हुशार -- कारण हलकेपणा तर असतोच शिवाय नवे केस उगववण्यात शक्ती वायाही जात नाही !"

"नाही -- पण स्पष्टीकरण देऊन मजा घालवणारही नाही --"

"सगळ्यांना ' खास ' म्हटले तर त्या शब्दाला अर्थ राहणार नाही आणि ' खास ' म्हणजे ' नक्कीच ' असा अर्थ घेतला तरी सगळ्यांना वेडे म्हटले तर ' वेडे ' या श्ब्दालाही अर्थ राहणार नाही. ' माजणे ' म्हणजे पसरणे, विस्तारणे -- असे समजून घेतले तरीही, हे गाणे मात्र एखाद्या ' खास वेड्याने ' लिहिले आहे, असे म्हणता येईल !"
( जगी हा खास वेड्यांचा पसारा माजला सारा )

"अवघा तो शकुन । हृदयी देवाचे चरण ।। -- आणि -- तुका म्हणे हरिच्या दासा । शुभकाळ अवघ्या दिशा ।।"

"On Facts And Truth हा इमर्सनचा लघुनिबंध इथे प्रस्तुत ठरावा. सगळेच स्वतः निवडलेल्या फॅक्टसशी बांधलेले -- वेगळ्या फॅक्टस आल्या की कन्फ्यूजन !"

"व्यक्तीचे व्यक्तिमत्व तिला तिच्या भूतकाळामुळेच मिळते तसेच समूहाचे असावे ! स्वतःची खरीखोटी ओळख तयार करत राहणे, ही मानवी मनाची सवय आणि गरज असावी !"

"अरे ग्रेट काम ! अभिजित, आपला एक प्रयोग होऊ द्या तिथे ! नासिरुद्दिन शहा हा ३०-३० वर्षे ' वेटिंग फॉर गोदो ' करणारा असामान्य नट आहे ! आणि प्रत्येक वेळी हे नाटक मला नव्याने कळते, असे तो म्हणतो ! हा एक आणि एकमेव ! सलाम, नासिरभाई !"

"Mind Watching -- why we behave the way we do -- written by Hans & Michael Eysenck -- हे ते पुस्तक -- हे सायन्स फिक्शन नाही."

"या पोस्टचा उपरोधिक सूर लक्षात घ्यावा -- लोकोत्तर होणे हे काहीतरी महत्त्वाचे आहे, असे सांगण्यासाठी ही पोस्ट नाही -- आपण लोकोत्तर व्हावे, असे ठरवून कुणी जगत नाही -- भीती आणि स्वरक्षणाची काळजी, हा जगण्याचा पॅटर्न असण्याबद्दलची ही पोस्ट आहे."

"त्याच परिस्थितीतला एक कम्युनिस्ट होतो आणि एक हिंदुत्ववादी होतो -- अशी काही भानगड असावी --"

"एका मानसशास्त्राच्या पुस्तकात वाचले की तुमची मते, विचारसरणी -- हे सर्व तुमच्या जनुकनकाशावर अवलंबून असते !"

"अशा विदीर्ण जगण्यातून स्वतःचे हाल करून घेणाराही दुसरा प्राणी नसावा !"

"उत्तरसंरचनावादात तर वेडे, गुन्हेगार या संज्ञाच सापेक्ष आहेत, असे म्हटले आहे."

"उपद्रव न होणे, विचित्र न वाटणे आणि त्या त्या समाजातल्या सामान्यतः सर्वमान्य पद्धतीप्रमाणे वागणे, असा अर्थ दिसतो. दुसऱ्या अंगाने पाहता, इतके सवयबद्ध आणि मान्य पॅटर्नशी जुळवून घेत बसणारे वागणे हे रटाळ, जिवंतपणा हरवलेले आणि स्वत्वहीन आणि सत्त्वहीनही म्हणता येईल. एखादा एकलकोंडा कवी हा इतरांच्या दृष्टीने ॲब्नॉर्मल असू शकतो पण त्याला समुपदेशनाची वा औषधांची गरज आहे का, हे शास्त्र कसे ठवणार ? "

"नीती, सभ्यता, औचित्य, समंजसपणा, मॅनर्स, स्थळकाळभान -- वगैरे !"

" तुम्ही म्हणताय तो बारकावा मी सजगपणे लक्षात घेतला नव्हता पण आता पाहिल्यावर दिसते ते असे -- छोटे म्हटले जाणारे प्रश्न हरघडी निर्माण होत असतात, त्यांतल्या बऱ्याच प्रश्नांकडे आपण लक्षही देत नाही, बरेचसे अडगळीत ढकलून देतो. या प्रक्रियेतूनच तथाकथित मोठे प्रश्न आकाराला येतात, असे दिसते. छोट्या प्रश्नांबाबतचे वागणे आपल्या सवयी घट्ट करत जाते. त्यामुळे क्षणोक्षणी हे प्रश्न समजून नष्ट होण्याचा प्रवाह चालू राहावा लागेल, असे दिसते. या दृष्टीने पाहता ' प्रश्नांतूनच ' ही शब्दयोजना योग्य वाटते. छोटा प्रश्न आणि मोठा प्रश्न यांतला भेदच कितपत व्हॅलिड आहे, हे इथे विचारात घेतलेले नाही, सामान्यतः आपण बोलतो त्या स्तरावर तो भेद गृहीत धरला आहे."

"असे प्रत्येकाने आत्ता महत्त्वाचे वाटणारे एकेक वाक्य दिले तर काही एक पट उभा राहील --"

"उलट ते म्हणतात, जगाच्या या अवस्थेला मी -- आपणच जबाबदार आहोत !"

"जाऊ द्या , मी काही जेकेंचा प्रवक्ता नाही -- मित्र म्हणून मला वाटले की तुम्ही नीट वाचून पाहावे --"

"म्हणून आपण एकमेकांना काही पटवायची जबाबदारी घेण्याला शून्य अर्थ असतो --"

"ते मुळीच अधिकारवाणी कधीच वापरत नसत -- त्यांना अधिकार देऊ करणारी, जगद्‌गुरू करणारी ' स्टार ' ही संस्था त्यांनी उधळून लावली --"

"सगळ्या प्रश्नांची उत्तरे मला माहीत आहेत, असे समजणाऱ्या दोन वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये संवाद, चर्चा कसल्या होतात ? जेकेंच्या चर्चा या ' मला माहीत नाही ' इथून सुरू व्हाव्या लागतात."

“जेकेंनी कितीजणांशी किती चर्चा केल्या आहेत त्याला गणतीच नाही ! डॉ. बोहम या शास्त्रज्ञाशी झालेल्या चर्चाही निरर्थक ?"

"झेंडा खांद्यावर घेतला तर सन्नाट्याची तयारी ठेवावी लागणारच !"

"ज्यांना आपल्या मनाच्या वापरपद्धतीचे सातत्य राखून होऊ शकतील तेवढेच बदल पुरेसे वाटतात, तेवढ्याने फारसे काही घडत नाही, इकडे दुर्लक्ष करायचे असते, पूर्ण माणसाचे प्रश्न असे न पाहता छोट्या छोट्या समूहनिहाय प्रश्नांबाबत भूमिका घेणे हेच क्रांतिकारक वाटते, अशा कुणालाही जेके कसे आवडतील ? आपण स्वतः बदलायला तयार असल्याशिवाय मानवजातीच्या हिताच्या गप्पा व्यर्थ आहेत, इतपत मान्य असल्याशिवाय जेके खरे तर वाचलेही जाऊ शकत नाहीत, आवडणे तर दूरच ! अर्जन्सी ऑफ चेंज म्हणजे बाहेर नव्हे, मूलतः माझ्यात बदल ! हे कुणालाही लक्षात यायलाच हवे इथपर्यंत तर ते बुद्धीनेच घेऊन जातात -- बुद्धीने त्याचा प्रतिवाद होऊ शकत नाही. त्यामुळे, आधीच भूमिका घेऊन बसलेले बरेचजण त्यांच्यावर -- म्हणजे ते जे सांगतात त्यावर -- संतापत असतात !"

"एका विद्यार्थिनीच्या कारनाम्यांबद्दल विचारायला तिला ' बाईंनी ' बोलावले होते -- ती काही सांगत होती -- " तुझे बंडल मारणे पूर्ण होऊ दे मुली -- प्रयत्न स्तुत्य आहे तुझा ! " -- हा भाव बाईंच्या चेहऱ्यावर असताना दुसऱ्या एका खोडकर विद्यार्थिनीने काढलेला फोटो !"

"त्याशिवाय का ' बुद्धिबळ आणि झब्बू ' लिहिता आले असते ?"

"त्यामुळे तर मला या छोट्या छोट्या गोष्टींचे महत्त्व वाटते !"

"अजातशत्रू म्हणजे आपण कुणाचे शत्रुत्व मानायचे नाही, एवढाच अर्थ करायचा ! तर जमेल !"

"माझ्यावर सारखे कोवळे ऊन कोण टाकत बसणार -- आहे खरा प्रॉब्लेम !"

"याच्या उलटही एक किस्सा आहे -- सकाळची कोवळ्या उन्हाची वेळ -- मी चाललो होतो रस्त्याने -- ओळखीच्या एक तरुण बाई भेटल्या -- त्यांचे माझ्याकडे लक्ष गेल्यागेल्या त्या म्हणाल्या, " काका, तुम्ही एकदम हँडसम दिसताय ! " आता याची दहा जन्मांतसुद्धा अपेक्षा नसते ! आयुष्यात हे तेव्हा एकदाच घडले ! याचा भारतात केवढा मोठा दुष्काळ सतत चालू आहे --"

"गाभ्याशी असणारा व्यापक जिवंतपणा --"

"फेसबुकची कविता अशी काही वेगळी कविता उदयाला आलेली दिसत नाही -- हे एक संपर्कमाध्यमच आहे -- इथे कदाचित पीक जास्त येईल आणि कमी कसाचेही बरेच असेल -- पण उत्तम, महत्त्वाचे कवीही इथे आहेतच ! शंकाच नाही !"

"प्रतिमा निर्माण होण्यासाठी कोणत्याही रीतसर शिक्षणाची गरज नसते. तो जणू जगण्याचा एक समाजमान्य साचाच असतो. प्रत्येक व्यक्तीला समाज त्या साच्यात फिट करतोच !"

"सर्व प्रतिमा मर्यादित, वेगळ्या आणि आत्मकेंद्रीच असल्यामुळे संघर्ष अटळ होतात."

"माणूस विचाराने स्वतःला अलग करतो -- ही अलगता म्हणजेच प्रतिमा. ती अनेक संस्कार, प्रक्रिया, परिणामांनी मर्यादित असते. सुखतत्त्व आणि संरक्षण ही या प्रतिमेची पायाभूत तत्त्वे असतात. यामुळेच राग, द्वेष, प्रेम, जिव्हाळा, सूड, असूया, मत्सर इत्यादी भावना निर्माण होतात. भावनांचे मूळ विचारांतच असते. भावनांमुळे प्रतिमा घडत नसून प्रतिमेमुळे भावना उद्भवतात."

"हे जरा नीट सांगा -- दोन्ही वाक्ये व्हेग आहेत --"

"निरनिराळे भ्रष्टाचार, त्यांचे मोडस ऑपरेंडी, लोकपाल, राज्यांची प्रगती, चळवळी का बोंबलल्या आणि उद्धव-राज एकत्र येणार का -- हे डोक्यात भरून करू काय ? काय जे फायनल होईल ते बघू -- नेत्यांना निवडून दिलेले आहे -- आता आपली कामे बघू --"

"तू जे बोलतेयस त्यावरून असे वाटतेय की तू समजलेले सगळे बोलत नाहीयस --"

"तो पुरस्कार सामान्यतः माणूस आता लौकरच मरेल अशी खात्री पटल्यावर दिला जातो !"

"वर्तमानात राहणे, हे तू जे म्हणतेस, तेच सवयीचे असू शकणार नाही -- ते जुने घिसेपिटे असूच शकत नाही --"

"नाही, यावर बोलावे लागेल -- ही एक सवय होईल का ? -- मला नाही वाटत --"

"ज्या बुद्धीला स्वतःला झुगारून देणेही समजते, तीच खरी बुद्धी !"

"आपले बराक्काण्णारावजी ओबामासाहेब ! त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा !"

"चर्चा, वाद असा कोणता हेतू नाही, जगण्याच्या ओघात येऊन जाणारी एक मनःस्थिती व्यक्त केली, इतकेच --"

"' तसेच काही तरी....माणसाच्या भाव भावनाच्या बाबतीतही म्हणता येईल....' श्रीनिवासजी, तुम्ही डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ आणि माणूसतज्ञ आहात ! मला काही प्रॉब्लेम आला तर मी तुम्हालाच गाठायचे ठरवलेले आहे !"

"मला तर वाटते सर्व प्रकारचे रोमँटिसिझम आणि रिऍलिझम ऊर्फ वास्तववाद यांत फारसा फरकच नाही --"

"आस्तिक असणे, कधीतरी का असे ना, आनंदी असणे, स्मित करणे, शुभेच्छा देणे, सहानुभूती वाटणे -- या सगळ्याच विकृती आहेत की काय कोण जाणे !"

"तुकारामाच्या शब्दांत ' एकविध मन ' ( एकात्म असलेले, विदीर्ण नसलेले मन ) म्हणजे देव."

"बुद्धी कमीजास्त असली तरी शहाणपण परिपूर्ण असू शकते !"

"ही उजेडाची आरास म्हणजे मनातले ताण सैल होत जाण्याची प्रक्रिया वाटते -- सगळेच अनुभव किरकोळ, हलकेफुलके होत जाणे -- प्रत्यक्ष सुखदुःखे भोगतानाचे वजन त्यांना न राहणे -- आणि पुन्हा त्याच तशाच ताणमयतेत परतण्याची शक्यता मावळणे ! त्या त्या वेळी सत्य मानल्या गेलेल्या भ्रमांची पटले उलगडणे, हेच दार सताड उघडणे ! जगलेल्या आयुष्याकडे जणू ' बाहेरून ' पाहणे !"

"आपल्या डोक्याचे स्वरूप आणि माप यांचा साचा घेऊन हा साचा जगाचे भले करणारा आहे याची खात्री / निष्ठा बाळगणे म्हणजे रोमँटिक ( मराठीत स्वप्नील म्हणू या ? ) !"

' भूमिका ' म्हणजे काहीतरी श्रेयस वा सत्य असून तेच फक्त मूल्य -- असे तिचे दैवतीकरण करणे, हे रोमँटिक नाही ? सर्व तऱ्हांनी होऊ द्यात ना आकलनाचे प्रयत्न -- त्यानेच मराठीचे कल्याण होईल. दुसरे काही असताच कामा नये, असूच शकत नाही -- हे टिकणारे नाही. मोठमोठ्या सत्ताही जगा आणि जगू द्या, या शहाणपणाचे महत्त्व जाणतात -- मराठी साहित्यात एकच एक आग्रह वा सक्ती कशाला ? तो आग्रहही, बऱ्याच ठिकाणी माणसाच्याच आकलनातून नाकारल्या गेलेल्या गोष्टीबाबत ? ही भीतीग्रस्तता आणि हेकटपणा मराठीचे कोणते हित साधू शकेल ? की शेवटी सगळे वाद सत्तेनेच सुटावे ?"

"आधी थियऱ्यांचा संघर्ष, मग मृत्यू -- असा क्रम आहे. आणि अमुकच सत्य, असे काही नाही. एखाद्या आपल्या आवडत्या थियरीने आपल्या म्हणजे वाचकाच्या हेतूप्रमाणे केलेले अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन -- हे कितपत अर्थपूर्ण समजावे, असा प्रश्न येतो."

"ओबामाण्णाजी मामासाहेब आणि रोम्नीअप्पाजी नानासाहेब -- असे म्हणा हो !"

"आणि विचारांचा भावनांशी फारच गतिशील संबंध आहे, असेही म्हणावे लागेल -- जरा विरोधी काही जाणवले की लोक भडकून उठतात !"

आणि हेही थोडे उपयोगी -- For some theories of literature (especially certain kinds of formalism), the distinction between "literary" and other sorts of texts is of paramount importance. Other schools (particularly post-structuralism in its various forms: new historicism, deconstruction, some strains of Marxism and feminism) have sought to break down distinctions between the two and have applied the tools of textual interpretation to a wide range of "texts", including film, non-fiction, historical writing, and even cultural events.

Bakhtin argued that the "utter inadequacy" of literary theory is evident when it is forced to deal with the novel; while other genres are fairly stabilized, the novel is still developing.[4]

Another crucial distinction among the various theories of literary interpretation is intentionality, the amount of weight given to the author's own opinions about and intentions for a work. For most pre-20th century approaches, the author's intentions are a guiding factor and an important determiner of the "correct" interpretation of texts. The New Criticism was the first school to disavow the role of the author in interpreting texts, preferring to focus on "the text itself" in a close reading. In fact, as much contention as there is between formalism and later schools, they share the tenet that the author's interpretation of a work is no more inherently meaningful than any other.

Such a disagreement cannot be easily resolved, because it is inherent in the radically different terms and goals (that is, the theories) of the critics. Their theories of reading derive from vastly different intellectual traditions: the New Critic bases his work on an East-Coast American scholarly and religious tradition, while the Marxist derives his thought from a body of critical social and economic thought, the post-structuralist's work emerges from twentieth-century Continental philosophy of language, and the Darwinian from the modern evolutionary synthesis. To expect such different approaches to have much in common would be naïve; so calling them all "theories of literature"

without acknowledging their heterogeneity is itself a reduction of their differences. -- हे लक्षात घ्यायला हवे. उपपत्ती क्लॅश होतात आणि अमुकच उपपत्ती सर्वश्रेष्ठ असे सिद्ध होत नाही. ( जसे नैतिकतेबद्दल बोलताना रसेल दाखवतो -- एकपत्नी, बहुपत्नी, एकपती, बहुपती -- या पद्धती असणाऱ्या प्रत्येकाला आपलेच बरोबर असे वाटते पण यांतले अमुकच माणसाच्या हिताचे आहे, असे सिद्ध करता येत नाही. )

सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवाद यांचा जेवढा डांगोरा आहे तेवडा त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या ' प्रदेश साकल्याचा ' याचा मुळीच दिसत नाही.

"Death Of Literary Theory, End Of Theory असे नेटवर बरेच आहे -- शिवाय -- Reading After Theory, The Future Of Theory, After Theory, Post Theory : New Directions In Criticism, What Is Left Of Theory, Life After Theory -- अशा नावांची पुस्तकेही आहेत. नेमका मजकूर नंतर देईन."

"अति झाल्याने असे झाले असावे किंवा असेच इतकेच भेद असूनही पूर्वी कुणी असे का म्हटले नाही, मला माहीत नाही --"

"मूल्यमापनाच्या उपपत्तींची अशी शकले झाल्यानेच वा चिंधड्या उडाल्यानेच उपपत्तीच्या मृत्यूची घोषणा करायची वेळ आली."

"दृष्टिकोणांच्या यादीत स्त्रीवादी, परिवर्तनवादी, समसंभोगवादी, वर्णसमतावादी, जातनिर्मूलनवादी असेही काही वाढवता येतील -- की हे सगळे परिवर्तनवादात बसतील ?"

"एच जी वेल्स या लेखकाची ' इन द कंट्री ऑफ द ब्लाईंड ' नामक एक दीर्घकथा आहे --"

"तिथे आलेल्या डोळसाचे ऑपरेशन करून त्याचे डोळे काढावे, असे ठरते !"

" साहित्याच्या क्षेत्रात समीक्षकाचे स्थान नाकारावे असे कुणालाच वाटत नाही -- कारण एकूण प्रक्रियेचे आकलन वाढण्यात ते आपल्याला मोलाची साथ देत असतात --"

"( थोडा लाईट टच -- ) आपल्याला एक करता येईल -- सर्वमान्य व्हावा असा एक निकाल तयार ठेवू -- तो असा -- सबळ पुराव्या अभावी कुठलाच आरोप सिद्ध झाला नाही, त्यामुळे सर्व आरोपी मुक्त ! ( शिक्षेपासून मुक्त -- साक्षात्कारी या अर्थी नव्हे ! ) -- लोकशाहीत न्यायाची प्रक्रिया पूर्ण करून मग निकाल लागावा, हेच बरे होईल !"

" माणसे निसरड्या आणि भ्रामक ' निश्चितपणा ' तच जगत असतात, असेही एक आकलन आहे -- चर्चा असेल तर निष्कर्षाची घाई करू नये --"

उत्तर-आधुनिकतावाद तसेच म्हणतो -- त्यामुळे तर डेथ ऑफ थिअरी !"

"अनेक जेन्युईन पद्धती आहेत साहित्याकडे पाहण्याच्या -- त्यामुळे साहित्यव्यवहार फ्रॅग्मेंटरी -- विदीर्ण समजावा का -- आणि एकूण मानवासाठी असे साहित्य असू शकते का -- हा इथे मला विषय वाटतो --"

"कोर्टात जसे आरोप निश्चित करतात त्याप्रमाणे इथे विषय नेमका ठरवता येईल का ?"

"मूळ पोस्टमधल्या शक्यता या अलग -- सामोपचाराची शक्यता नसलेल्या आहेत -- याकडे लक्ष द्यावे -- बौद्धिक दिशा दिलेली नाही म्हणजे साक्षात्कारी -- असेही समजायचे कारण वाटत नाही --"

"मराठीत शुक्रतारा मंद वारा वाले लाखो असतील -- ते सोडा --"

"मी अशाच लेखकाला मोठा समजतो जो स्वतःकडे कोणतीच ऑथॉरिटी घेत नाही --"

"मी असे सुचवेन की ज्यांना असे वाटते की लेखकाकडे नवे काही नसते -- तो निव्वळ कौशल्यामुळे महत्त्वाचा ठरतो -- त्यांनी त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या अशा दोन दोन कृतींची नावे सांगावीत --"

"आपल्याकडचे लेखक, समीक्षक, वाचक हे खूपच मोठे आणि तुंबळ युद्धे माजतील असे विषय आहेत --"

“इतरांना सांगावे असे लेखकाकडे काही असूच शकत नाही, असा हा मुद्दा दिसतो --"

"गडबड कशाला -- यातून काय काय निघते ते तर पाहू --"

"समजा ९७ भूमिका आहेत -- तर त्या त्या भूमिका पटणाऱ्यांचे ते ते वाचक, असे असेल का ?"

"आता साहित्यव्यवहार लेखककेंद्रितही राहिलेला नाही -- ( एका भूमिकेप्रमाणे )."

"अनेक भूमिका आहेत -- त्यांतली अमुकच एक सत्य असे सिद्ध झालेले नाही, होऊ शकत नाही कारण बुद्धी हे साधन मर्यादित असल्याने ते अनेक पद्धतींनी वापरता येते -- अशा परिस्थितीत साहित्याकडे कसे पाहावे ? -- हा मला इथे प्रश्न दिसतो --"

“मत बदलणे किंवा न बदलणे -- हे का घडत असेल आणि जगण्यात त्याचे महत्त्व काय ?"

"ही पोस्ट नुसते काहीतरी एकच रेटत राहणारी नाहीय -- ओपन आहे -- तसे पाहिले जावे --"

"अमुक एका विचारसरणीने माणसाचे भले होणार आहे, असे समजणारे हे आजचे खरे रोमँटिक ! त्या जुन्या चंद्रतारेवाल्या रोमँटिकांचा काळ संपलेला आहे !"

"मी अंधळ्यांपैकी एक व्हायला तयार आहे -- हत्ती शोधा !"

"भ्रष्टाचार फक्त आर्थिकच नसतो, हे खरेच आहे ! आपल्या मनाच्या कोणत्या अवस्थेला भ्रष्टाचार म्हणता येईल, असा मला प्रश्न पडतो --"

"भीतीमुळे माणूस स्थितिशीलतेची आवड जोपासतो पण जगणे स्थितिशील असू शकत नाही -- म्हणूनच लेखनात भूमिका परावर्तित करण्यापेक्षा जगण्याचा वेध घेणेच महत्त्वाचे ठरते."

"लेखकाला एक भूमिका असते, ती त्याच्या लेखनात यायला हवी / येतेच आणि त्याच्या प्रामाणिकपणामुळे दोन्हीत संगती असते -- या भ्रामक बांधिलकीच्या कल्पनांमुळे हे सगळे गोंधळ आहेत. लेखक असे संगतवार जगत नसतो. आणि लेखक संगतवार नसेल तर लेखन अमुक भूमिकेचे असण्यातले औचित्य संपते."

"कोणत्याही वादी माणसाला तो वाद टिकणे, त्या वादाचा कळप टिकणे याची मानसिक गरज असते. त्यातून येणारी असुरक्षितता आणि भीतीही असते. अशा माणसाने आणलेला सहिष्णुतेचा आव खरा नसतो. भीती असणारा हिंसक असतोच."

"शंभर टक्के कसलेतरी वादी असलेल्यांचे जगणे संपलेलेच असते -- ते रोबो झालेले असतात. उदा. जहाल क्रांतिकारक, तालिबानी, आत्मघातकी दहशतवादी, वगैरे. इतर वादी हे शंभर टक्के नसल्यामुळे ते सतत आंतरविरोधात जगत असतात आणि त्यात त्यांची खूप शक्ती वाया जात असते. शिवाय समतावादी माणूस विषमतेचे वागताना दिसणे, नैतिक माणूस मधेच अनैतिक होणे -- असेही होत राहते. आहे त्या जगात माणसाचे सहज जगणे कमी आणि ताणाचे जगणेच जास्त, हा अशा जगण्याचा पट असतो. या आंतरविरोधाशिवाय जगता येईल का, या प्रश्नाचाही दुसरा अर्थ तोच आहे -- अमुक वादी न होता जगता येईल का ?"

जसे, मी स्त्रीकडे बघणारही नाही अशी प्रतिज्ञा केलेले लोक स्वतःची वाट लावतात, तसेच शांतता'वादी' असण्याचे आहे. ४०-४० वर्षे अशा प्रेरणा मानलेले लोक शेवटी ' तरीही काही कळले नाही ' म्हणून जे. कृष्णमूर्तींकडे रडत आलेले ' कॉमेंटरीज ऑन लिव्हिंग ' मध्ये दिसतात. अमुक ' वादी ' न होता जगणे शक्य आहे की नाही, हाच खरा प्रश्न आहे."

"अनंतजी, हे तुमचे वाक्य मलाही परफेक्ट फिट आहे ( मनापासून बोलतोय ) -- इतक्या निरर्थपूर्ण वाक्यासारखा अत्युत्तम शेवट या चर्चेला दुसरा असू शकत नाही ! हे आपले दोघांचे एकमत असलेले भरतवाक्य समजू या, असे मला वाटते !"

"मै एक सिंगल निहत्ता आदमी हूं ।"

"शिवाय तुमच्यावर तुटून पडायला माझ्याकडे टोळी नाही --"

"गायकवाडजी, तुम्ही हे खरेच म्हणताय की रागावून, हे कळत नाहीय. तुम्ही ते खरोखर जाणवूनच म्हणत असणार. आणि समजा मला अजून ते जाणवलेले नाही, तरीही थोडा संवाद शक्य वाटतो मला."

"प्रश्नच नाही ! हरणे-जिंकणे-मिळवणे-टिकवणे हे असले की प्रॉब्लेम होतात !"

"भंडारेजी, बुद्धीचे जे शिस्तशीर स्ट्रक्चर आवश्यक आहे असे आपण म्हणतो, तेच संशयास्पद आहे -- अबाधित मुळीच नाही, हे बुद्धीनेच उत्तर-संरचनावादात दाखवून दिले आहे."

"अहो अनंतजी, पूर्ण जगाने नाकारले असे म्हणत नाहीय मी -- तर्कयुक्त बुद्धी माणसाला तिथपर्यंत घेऊन गेलेली आहे, असे म्हणतोय -- तेही न पटणारे, बुद्धीचाच तो प्रवास न मानवणारे असणारच ना !"

"आपापल्या आकलनाप्रमाणे अनेकांच्या अभिव्यक्ती चालू राहणार -- बुद्धिभेद, भ्रमित होणे हे कसे ठरवणार आणि कंट्रोल करणार ?"

"अभ्यासू बुद्धिवादी यात का घेतले, हे काहींना खटकते -- पण माझ्यासह बऱ्याच जणांच्या निरीक्षणाप्रमाणे ते बरोबर आहे असे याच चर्चेत दिसून येते. तरीही ज्यांना हे चूक वाटत असेल त्यांचा बुद्धिभेद करायचा प्रयत्नही मी करणार नाही."

"विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद हे नंतरच्या तल्लख बुद्धीमुळे नाकारायची वेळ आली -- इतक्या मोठ्या बदलालाही कुणी बुद्धिभेद केला, भ्रमित केले असे म्हणत नाहीत. आपल्यालाच काय प्रॉब्लेम आहे ?"

"श्रद्धावान माणसाची श्रद्धा डळमळीत करणे -- याला बुद्धिभेद म्हटलेले मी अनेकदा पाहिले आहे -- पण एखाद्याच्या तल्लख बुद्धीमुळे दुसरा बुद्धिमानही भ्रमित होत असेल तर अवघड आहे -- मग इंजेक्षन देऊन तल्लखवाल्याची बुद्धी कमी करणे -- हाच त्यावर उपाय दिसतो --"

"बुद्धिवाद्याचा बुद्धिभेद कसा होतो, ते खरेच मला कळत नाही -- जरा स्पष्ट करावे, प्लीज --"

"भंडारेजी, अमुकच एक उत्तर काढावे किंवा हारजीत जाहीर करावी, असा हेतूच नाही आणि नसावाही -- एकमेकांना हा विषय कसा दिसतो हे पाहाणे -- हे महत्त्वाचे --"

"उत्तर-संरचनावाद्यांनी संरचनावाद्यांचा बुद्धिभेद केला -- असे कुणी म्हणत नाही."

"आधुनिकतावाद, संरचनावाद यांच्यांत बुद्धिप्रामाण्यवाद -- विवेकवाद यांना एक स्थान होते -- ते बुद्धीच्याच तर्कशुद्ध वापराने उत्तर-संरचनावादात नाकारले गेले ! बुद्धीनेच बुद्धी संशयास्पद होत असेल तर बुद्धीच्या अभिमान्यांनी तरी घाबरू नये किंवा मागे हटू नये."

"बुद्धिभेद करणे हे भक्तिमार्ग्यांना एक वेळ खटकावे पण बुद्धिवाद्यांनाही ?"

"आणि गायकवाडजी, अनंतजी वेगळे बोलले आहेत -- तुमच्यापुढे वेगळा प्रश्न आहे --"

"बुद्धिभेद करणे हे भक्तिमार्ग्यांना एक वेळ खटकावे पण बुद्धिवाद्यांनाही ?"

"मी तर्काला कुठे विरोध केला, मला खरेच माहीत नाही -- उलट तर्कच माणसाला मूलभूत प्रश्नाकडे नेतो, असे मला दिसते !"

"जोपर्यंत चर्चा शक्य आहे तेवढी होऊ द्या ना -- आता चर्चा शक्य नाही, असे होईल तिथे थांबू --"

"अहो रोटेजी, आत्ता चाललेली चर्चा तर्क कुठे सोडते आहे, ते सांगा --"

"बाळबोध, बालिश, उथळ आणि पोरकट, हे सगळे म्हणून झाले, असे धरून पुढे बोलू ,म्हणजे ते शब्द वापरायची गरज पडणार नाही. आणि या स्टेटसमधले सगळे मान्यच असेल आणि त्यात नवीन काही नसेल, तर प्रश्नच मिटतो. पण गायकवाडना हे सत्य आहे असे तर वाटत नाहीच, पण हे बोलणेही अत्यंत वाईट आहे, असे वाटते ! ( म्हणजे त्यांना यात काहीतरी ' नवीन ' वाटतेय ! ) आणि या स्टेटसमधल्याप्रमाणे सगळे आहे, हे सगळ्यांनाच दिसत असेल तर मग -- या लोकांमध्ये सांस्कृतिक फरक आहेत, असे का समजावे -- त्यांना एकाच स्तराचे का समजू नये -- हा पुढचा प्रश्न येतो."

"' अत्यंत वाईट ' हे गायकवाड म्हणाले आहेत, त्यामुळे त्याबाबतचा प्रश्न अर्थातच त्यांना उद्देशून आहे."

"-- अत्यंत वाईट, वाईट, चांगले आणि अत्यंत चांगले -- हे फरक आपण कशाच्या आधारावर, कसे करतो, ते स्पष्ट व्हावे."

"अविनाशजी, वाईट का आहे ते जरा सांगा -- सत्य असेल तर पाहायचे नाही ?"

"हत्यारे वेगळी -- प्रवृत्ती सेम !"

"प्रियाजी, हे सगळे भावनाप्रधानच असतात, त्यामुळे ते वेगळे घेतलेले नाहीत. यांतला कुणीही चॅलेंज केला गेला वा दुखवला गेला तर होणारे परिणाम पाहा."

"सर्वांना समजावे असेच वाटणार कुणालाही -- पण सर्वांना समजण्यासाठी, आपल्याला जे म्हणायचे आहे ते सोडून, सर्वांना समजण्यासाठी दुसरेच काही बोलणेही बरे नव्हे."

"म्हणूनच कलावंतांनी निंदास्तुतीत जास्त न अडकणे बरे !"

"म्हणजे, तुमचे खरे आहे, असे मी म्हणालो, तर मी खोटे बोलतोय, असे तुम्ही समजणार !"

"१००० पाने लिहावी लागणार आहेत म्हणजे किती प्रचंड काम आहे, ते बघा ! त्यातली आतली गोष्ट सांगतो -- थोडी पाने लिहून झाली की ती माझ्यासह कुणालाच पटत नाहीयत म्हणून फाडून टाकली जाताहेत ! काहीतरी नवीन करावे म्हणून खरे तर हा प्रकल्प मी हाती घेतला ! पण, यात नवे काही घडणे अशक्य आहे, अशा पराभूत अवस्थेत मी आलोय. यातून आपल्याला कुणी सावरावे, असेही म्हणायची सोय नाही ! कारण ती एक अपेक्षा ठरणार !"

"समीर, या सगळ्या शक्यतांमधूनच संपर्काचे प्रयत्न चालणार. आदर्श पद्धत कोणती आणि ती कोण कुणाला शिकवणार ?"

"काहीच अपेक्षा नाहीत हे पटवण्यासाठी मी एक पुस्तक लिहायला घेतले आहे -- सध्याच्या अंदाजाप्रमाणे ते किमान १००० पानांचे होईल !"

पाऊस

"विरामचिन्हांचा वापर केला की शब्दक्रमातून येणाऱ्या अर्थवलयांच्या शक्यता मारल्या जातात. सुरुवातीच्या भागात हे झाले आहे. शेवटच्या तीन ओळी अप्रतिम आहेत. अकारण सविस्तर झाल्याने पहिला भाग त्या तीन ओळींना तोलणारा वाटत नाही. मला हा नुसता तांत्रिक दोष वाटत नाही -- समजावून देण्याची इच्छा आणि खुली अभिव्यक्ती यांतला तो गोंधळ आहे. माझी मते बरोबरच असतील असे नाही, पण खरोखर वाटते तेच बोलेन -- चालेल ना ?"

काहीच न सांगणाऱ्याचं बुक

"माणसाच्या मनाचे बारकावे सखोल जाणणारा हा कवी आहे, हे त्याच्या शब्दाशब्दातून जाणवते. याने कुणाची, कसलीही फिकीर करू नये -- असेच ‘ खरे ' असावे '."

"काहींना हल्ली खरेच वाटते की सारखी चिडचिड न करता, साधे, सरळही बोलावे -- हे एक मोठे सुचिन्ह आहे !"

"" अरे, या तर मरणसावल्या ! " असे म्हणून ते आणखीनच जोरात हसू लागल्याने अंधाराला तडे जाऊ लागले -- हेही चालेल का, बघा --"

"खरे तर हे साधे, निनावी जगणे असायला हवे -- त्याला ' विलोभनीय ' म्हणावे लागू नये --"

"अवधूत, आता कुणाचेही आर्थिक स्तर कुणालाही कळणे अवघड झाले आहे, त्याची मलाही गंमत वाटते --"

क्षण क्षण

"पहिल्या तीन कडव्यांत अगदीच साधी वाटणारी कविता शेवटच्या कडव्यात अनपेक्षितपणे ' पीळ 'दार होते. फक्त ' तुमच्या-आमच्या ' मुळे येणारा सामान्यीकरणाचा आणि बोधप्रदतेचा फील टाळता आला असता, असे वाटले."

"हसरी सकाळ -- सुंदर सकाळ ! त्यातही, स्त्रीहास्यसकाळ -- दुप्पट सुंदर सकाळ !!"

टोल

"लीपिंग इन द डार्क जणू !"

मनातील इच्छा व वस्तुस्थितीची जाणीव....आणि दिवास्वप व वाङःग्मय ' यांच्यातील साम्य ! - फ्रोइड

"चला, गंमत पोचली !!! हे हसू सकाळीच सगळीकडे पसरावे, असा प्रयत्न होता ! आता मलाही आनंद झाला !"

मनातील इच्छा व वस्तुस्थितीची जाणीव....आणि दिवास्वप व वाङःग्मय ' यांच्यातील साम्य ! - फ्रोइड

"सुषमाजी, आपली कविता कुणालाही कळताच कामा नये या जिद्दीने प्रतिमापरिप्लुत कविता लिहून असंख्य कवी लोकांना वात आणत आहेत -- त्यात आता हे सगळे त्यांच्या गिचमिड हस्ताक्षरात वाचायचे म्हटले तर वाचक नुसते शांत बसून राहतील ! तुम्ही हा असा विषय काढूही नका आणि त्याला प्रोत्साहन तर मुळीच देऊ नका, असे सुचवावेसे वाटते."

"तेच तेच बोलणाऱ्यांनी त्याला
जुना केला आहे
डोळे उघडले तर

अजूनही तो नवाच आहे !"

"अमर, कामाचे स्वरूप आणि निर्मितीचा हेतू यांमुळे ' वेगळे ' दिसणे होत असावे. समोर वॉल्ट डिस्ने आहे किंवा फ्रॉईड आहे म्हणून आपण गप्प बसू शकत नाही, आणि बोलायचे तर आपल्या क्लॅरिटीनेच बोलावे लागणार !"

"' मेघदूत ' चा बॅले मराठी माणसांना दाखवायला निघालेला हा अजब, अद्वितीय माणूस ! कोण आहेत हे करंटे लोक त्याला अडथळे आणणारे ?"

"अमर्याद सुंदर !"

"एक टक्का आणि नव्याण्णव टक्के हे कलेत पटणारे नाही. इनसाईट ही पूर्ण कलाकृतीभर असावी लागते. त्याची टक्केवारी सांगता येणार नाही."

"माणसाचे - कलावंताचे घडणे हे अनुभव, अभ्यास, इतर असंख्य परिणाम यांसहच असते. माध्यमाच्या शक्यतांचे त्याचे भान यांतूनच येत असते."

"दुःख भोगणे आणि दुःख समजणे यांतला तो फरक आहे. खूप मोठमोठी दुःखे भोगून झालेला लेखकही मौल्यवान ( तुमच्या भाषेत ' कालातीत ' ) असेलच, असे नाही."

"अमर, लेखक जी पात्रे निर्माण करतो त्या सगळ्या पात्रांच्या अनुभूतीतून तो गेलेला असणे गरजेचे नसते. शक्यही नसते. शेक्स्पिअरच्याच चार मोठ्या ट्रॅजेडीज घेतल्या तर त्या चार प्रकारच्या दुःखप्रक्रियांतून तो स्वतः गेलेला असतो, असे नाही ( तसे झाले असते तर तो वेडा होऊन मेला असता आणि ही नाटके समोर आलीच नसती, असे मला वाटते. ) त्याला मानवी दुःखाची प्रक्रिया आणि रचना समजलेली असते. त्या आकलनातून तो अनेक वेगवेगळी पात्रे निर्माण करतो. पुरुष लेखक स्त्रीचे दुःख व्यक्त करतो ते स्वतः तेच तसेच भोगणे शक्य नसूनही करतो. सगळ्या पात्रांच्या सगळ्या अनुभवांतून तो लेखक गेलेला असतो किंवा असला पाहिजे, असे नाही. दुःख कालातीत नसते, दुःखाची आकलनप्रक्रिया कालातीत असते."

दिवास्वप्नाचे व्यावहारिक उपयोग ठीक, ते सध्या बाजूला ठेवू. फक्त साहित्याच्या बाबतीतले पाहू. इथे सारांश असा दिसतो की करमणुकीचे -- पलायनवादी साहित्य हे दिवास्वप्नाच्या प्रक्रियेतून येते आणि दर्जेदार -- जगण्याला सामोरे जाणारे

साहित्य हे दुःखातून येते. दुःख व्यक्त करणे आणि दुःखाच्या रचनेची समज व्यक्त करणे यांतला फरक लक्षात घेतला पाहिजे. स्वतःचे दुःख व्यक्त करणारी कलाकृतीही फार दर्जेदार होऊ शकत नाही कारण तीही दिवास्वप्नासारखीच एक नुसती मानसिक प्रतिक्रिया असते -- मर्यादित असते. दर्जेदार कलाकृतीच्या प्रत्यक्ष निर्मितीप्रक्रियेत तो लेखक स्वतः दुःख भोगत असेल का, याबाबत शंका आहे. दुःखाच्या पूर्ण रचनेचे भान व्यक्त व्हायचे असेल तर तो लेखक नुसता प्रतिक्रियेच्या अवस्थेत असून चालणार नाही. तो त्यातून बाहेर पडलेला आणि व्यापक आवाक्याचा असावा लागेल. शेकस्पिअर त्या ट्रॅजेडीज लिहिताना स्वतः दुःखात राहून ते व्यक्त करत नसतो. त्याच्या स्वबाह्य व्यापक आवाक्यामुळे तो मोठा लेखक ठरतो.

"भेद आहेत पण वर्चस्वाचे प्रयत्न नाहीत, सत्ताकारण नाही -- अशी मानवी जगण्याची कल्पना, वास्तववादी नेमाड्यांनी करावी, हा एक मोठा विनोदच म्हणावा लागेल !"

"माझे सहमत होणे हे अर्थात माणसाचे मन कसे चालते, याच्या निरीक्षणावर आधारित --"

फ्लॅट झालीये का

"ही कविता नीट लिहिली गेली नाहीय, संपर्काच्या मोठ्या गॅप्स सोडल्या गेल्या आहेत, त्यामुळे पोचत नाहीय, असे वाटते."

मी इथेच पूर्वी एक नोट दिली होती, ती पुन्हा देतो, पण आता चर्चा करण्याइतके तपशील लक्षात नाहीत --

बाकी शून्य

विश्या म्हणाला, “ ब्रम्ह म्हणजे तुझं डेथ वॉरंट, रांडेच्या. ह्या अध्यात्म, देवदेवस्कीच्या नादानं कोणाचं कधी भलं झालेलं नाही. “

मी म्हटलं, “ हे अध्यात्म नाही, तत्त्वज्ञान आहे. “

विश्या म्हणाला, “ तत्त्वज्ञानाविषयी मला एकच गोष्ट माहीत आहे. A philosopher is like a blind man in a dark room, looking for a black cat which is not there. माझ्या संदर्भग्रंथात याची नोंद आहे. आणि रांडेच्या, तत्त्वज्ञान सांगणारा मनुष्य मोठा होतो. तत्त्वज्ञान ऐकणारा आयुष्यातून उठतो. “

मग मी तत्त्वज्ञान ठेवलं आणि मराठी साहित्य वाचायला घेतलं ." ( कादंबरी पृष्ठ ४२१. )

--- कमलेश वालावलकर यांची ‘ बाकी शून्य ‘ ही कादंबरी अलीकडेच वाचली. मला ही एक अपवादात्मक चांगली कादंबरी वाटली.

तरुण वयातल्या जगण्याचा आवाका घेणाऱ्या ‘ वासूनाका ‘, ‘ कोसला ‘ अशा कलाकृतींचा खूप बोलबाला आहे. त्यांहून मोठी आव्हाने ही कादंबरी घेते. केवळ बुद्धीच्या अंगाने आयुष्य जगणाऱ्या एका तरुणाचे एक टोक गाठणारे हे आयुष्य आहे. इथे नुसती वर्णनात्मकता नसून या प्रक्रियेतल्या मूलभूत प्रश्नांशी झटापट आहे. जगण्याच्या एका साच्याचा ठसा देण्यापेक्षा जगणे अनेक तऱ्हांनी पाहण्याची इथली समज अद्वितीय आहे !

"अहो, चव्हाटा हा ग्रुपच असा आहे की इथे भल्याभल्यांचा अहंकार उतरणारच ! मी तर अहंकाराच्या चपला बाहेर काढूनच इथे प्रवेश करतो !"

"इतके पिटुकले फोटो त्या महिलांव्यतिरिक्त कोण बघत असेल ?"

"विनयजी, देखण्या बायका, दुसऱ्याचे, त्यांच्या फायद्याचे भ्रम पक्के ठेवण्यात तरी हुशार असतात -- हेच यावरून दिसून येते !"

"' कम्युनिकेशन स्किल्स ' लागतात हो !"

तटस्थ एक्झिट

"जरा माझ्या भाषेत बोलतो -- शेवटच्या तीन ओळी माणसाच्या मनाची गधडी गुंतागुंत अचूक व्यक्त करणाऱ्या आहेत ! हे इनसाईटशिवाय शक्य होत नसते !"

"हा प्रश्न तरी पडतोय का -- किंवा हा प्रश्न आहे, असे तरी वाटतेय का ?"

"सांस्कृतिकचे काय एवढे महत्त्व ? दुसरी कामे खूप आहेत. हे घ्या उरकून पटापट ! पण सांस्कृतिक खात्याचेही काम तर दिसले पाहिजे !"

"मुळात एकमेकांच्या अभिव्यक्तींच्या तुकड्यांतून कोणते, कसले आकलन होते हा प्रश्नच आहे -- या दहा ऐवजी त्या दहा व्यक्ती समोर असत्या तर जी आकलने वेगळी होऊ शकतात, त्यांचे मूल्यमापन कसे करणार ?"

"अविनाशजी, ' आहे ते चालू ठेवायचे ' या वाक्यानंतर उद्गारचिन्ह टाकलेय हो ! ती साधुवृत्ती आपली सगळ्यांची आहे, म्हणून टाकलेय ते !"

"त्या ठोसमुळेच तर देशभर चर्चा आणि डोकी आऊट, असे झाले आहे ना !"

"दोन्ही पाहायचे, बोलायचे आणि आहे ते चालू ठेवायचे !"

"मन आहे व्हिलन -- तिथे तपासा --"

"अविनाश, तुम्ही जी साखळ्यांची / बेड्यांची यादी दिलीत त्यात विचारसरणीची साखळी / बेडी विसरलात की ती साखळी / बेडी नाहीच, असे तुम्हाला वाटते ? का ?"

"माणसाचे मन हे अलगतावादीच असल्याने ' मिळवणे ' याला महत्त्व येणारच ! पैसा, संपत्तीच नव्हे, एक प्रतिमा कमवणेही असते. कुणीही काहीही कमवणे हे दुसऱ्याच्या जिवावरच असते, त्यामुळे त्याचे त्रास आणि ताण सगळ्यांच्या जगण्यात पसरतात. मने अशीच राहू द्यात पण भ्रष्टाचार नको, असे म्हणणे हा भ्रमिष्टपणा किंवा ढोंगीपणा आहे. समजा आर्थिक भ्रष्टाचाराला फाशीची शिक्षा ठेवली तर तो कमी होईल का, हा एक प्रश्न आणि मनाचा पॅटर्नच भ्रष्टाचारी असल्यावर तो आणखी वेगळ्या मार्गाने काम करणार नाही का, हा दुसरा प्रश्न. हे सगळे न पाहता आपल्याला प्रश्नमुक्त जगणे हवे आहे !!!"

तिढ्याचा काळ आणि नाटक.

तिढ्याचा काळ आणि नाटक

"कालटप्प्यांच्या संदर्भात उभे-आडवे-तिरपे छेद पाहात, जगण्याचे बदलते नमूने आणि कलारूपांच्या वेगवेगळ्या शक्यतांचा वेध घेत केलेले, संवेदनशील, अभ्यासपूर्ण लेखन !"

"सूक्ष्म नादमयतेचा उपरोधिक वापर करणारी एक वेगळी कविता."

"मी उत्सुक राहीन !"

"पाचव्या नंबरला, प्रश्न समजून घ्यायला नकार देऊन उत्तरांचा आग्रह धरणारे घ्या --"

"सत्य इतिहास म्हणजे काय ते सांगा मग --"

"तुम्ही उगीचच यादी वाढवताय -- पहिले तीन एकात येतात -- भूतकाळातून काय समजते, हा प्रश्न मला महत्त्वाचा वाटतो -- यात चूक काय आहे ?"

"पहिला टप्पा काय ? प्रश्न समजून घेणे -- की उत्तर समजून घेणे ?"

" काय हवे ते बघू, आधी प्रश्न काय आहे ते तर पाहू, असे मी म्हणतो -- तुम्ही त्यालाच नकार देता, असे दिसते -- कट्टर विचारसरण्या माणसे मारायचे समर्थन करणारच, हा तुम्हाला प्रश्न वाटत नाही ?"

"योग्य-अयोग्य आपण कोण ठरवणार ? काय आहे ते माहिती असलेले बरे ! नेटवरही सगळी माहिती उपलब्ध आहे .”

"माणसांनी एकमेकांना लहानमोठे समजणे, हे अनावश्यक आहे -- प्रत्येकाने आपापल्या कुवतीने जगणे-मरणे, एवढेच महत्त्वाचे !"

"भयानक वास्तवाची शांत कविता. या एकत्रितपणातच निरर्थता भरलेली. वेदना आणि शांतपणा, वेदना आणि आनंद, वेदना आणि देखणेपणा -- एकत्र ! एकाकीपणासह तालबद्ध नृत्य ! स्वर क्षीण होत आला तरी थांबू नकोस, हे सांगणे ! अत्यंत सहज, स्मूथ शैलीत लिहिलेली अति-पॉवरफुल कविता -- निरर्थकतेचा खोल प्रत्यय देणारी ! ही कविता मी पाचदा वाचली आणि प्रत्येक वेळी नवे काही जाणवतेय -- आणि अजूनही, आता ही कविता समजली, असे म्हणू शकत नाहीय. हे असे घडतेय ते प्रतिमाजंजाळामुळे नव्हे तर आशयाच्या अमर्यादतेमुळे ! ग्रेट ! आणखीही कविता असतील तर इथे देत जा, ही विनंती."

" कुठलीही कट्टर विचारसरणी ही माणसे मारण्याचे समर्थन करणारच, एवढेच मी सुचवतोय ! ( तुमच्या माहितीसाठी -- इतिहास हा माझा अत्यंत तिरस्काराचा विषय आहे. )"

"मी बुद्धिप्रामाण्यवादी नाही पण बुद्धी बरी असल्याने मला तर वेगळीच शंका येते. पोस्टमॉडर्निझममधला एक महत्त्वाचा भाग असा आहे की त्यात मॉडर्निझममध्ये असणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवादाला आव्हान आहे. हे आपल्या मराठी बांधवांना माहीतच होऊ नये म्हणून इथले बुद्धिप्रामाण्यवादी पोमॉ हा शब्द ' मॉडर्नच्या पुढचे ' अशा साळढाळ अर्थाने मुद्दामच तर वापरत नसतील ? म्हणजे इथे कुणी यावर विचारच करू नये, अज्ञानातच राहावे, म्हणजे आपली सद्दी चालू राहील, या विचाराने ? अहो, बुद्धी कितीही ग्रेट असली तरी मुख्यतः ती स्वार्थासाठीच वापरायची असते, हे काय त्यांना समजत नसेल ?"

"याला मी ' पोस्टमॉडर्न विशेषज्ञता ' म्हणायला तयार आहे. याचे पायाभूत तत्त्व " विशेषज्ञता असे काही नसतेच " , हे असावे लागेल. यावरून तुमच्या लक्षात येईल की पोमॉ हा शब्द मी गोपूंच्या अर्थाने नव्हे तर इतरांना पटणाऱ्या अर्थाने वापरतोय. गोपूंनी साठ्यांना पोमॉ म्हणणे हा एका भूमिकावाल्याने दुसऱ्या भूमिकावाल्याचा अपमान करणे आहे ! दोघेही त्याला भूषण समजत आहेत ! त्यांचे ठीक आहे, पण या डीव्हीडी आता शेकड्याने भारतभर वितरीत होत आहेत ! भूमिकांचे भक्त, हे ऐकून स्वतःला पोमॉ म्हणायला लागले तर सगळ्या भूमिकाच धोक्यात येतील ! हल्ली कुणाला कसली काळजीच नाही बाबा !"

शेअर बाजारातल्या घडामोडींची चर्चा करणारी काही टीव्ही चॅनेल्स आहेत. ( मला स्वतःला त्यात शून्य इंटरेस्ट आहे आणि आयुष्यात मी कधी एक रुपयाचाही शेअर घेतला नाही. ) तर त्यांतल्या एका चॅनेलवर अश्विन गुजराल नामक एक व्यक्ती तज्ञ म्हणून येत असे. टाय हमखास बांधलेला असे. पूर्वी मर्फी रेडियोच्या कॅलेंडरवर असणाऱ्या गुटगुटीत बालकासारखा चेहरा. मी मनात त्यांचे नाव गट्टूराम असेच ठेवलेले होते. ते सज्जन बहुतेक वेळी, अमुक शेअरचा भाव वाढूही शकतो आणि कमीही होऊ शकतो, असा तज्ञ अंदाज सांगत. मी अचंबित होऊन पाहात राही ! तसाच गोपूंचा एक तज्ञपणा मला या डॉक्युमेंटरीत दिसला. भारत आणि चीन यांच्या प्रगतीची तुलना करताना आधी ते म्हणाले, भारताला चीनकडून शिकण्यासारखे काही नाही, कारण तिथली शासनव्यवस्था वेगळी, भारताची वेगळी, त्यामुळे त्यांनी साधले तसे आपण साधू, असे नाही. पण एकाच मिनिटात ते असेही म्हणाले की तशा एकछत्री ( त्यांचा शब्द वेगळा असेल ) व्यवस्थेत प्रगती होतेच असेही नाही आणि लोकशाहीत प्रगती होऊ शकत नाही, असेही नाही. मला अचंबित व्हायची सवयच असल्याने मी अचंबित झालो !

"मला बऱ्यापैकी कळणाऱ्या आणि थोडे कळणाऱ्या विषयांवर बोलून झाले, आता अजिबातच न कळणाऱ्या विषयावर थोडे बोलून हा विषय संपवतो."

आणखी एक गंमत बघा. अमेरिकेत मॅकार्थी नामक कुणी सेनेटर कम्युनिस्टांच्या चौकशा करून त्यांचा कसा छळ करत असे याच्या अहवालाचे खंड गोपूंच्या वाचनात आले आणि त्यावरून गोपूंना त्यांच्या ' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकाचा चौकशी-फॉर्म सुचला, असे ते सांगतात. तो सेनेटर किती अन्यायी, असे त्यांना वाटत असलेले दिसते. गोपूंच्या विचारसरणीच्या देशांत काय चालते ? विरोधकांचा हार घालून सत्कार ? तिथले कुठले असे अहवाल येतात का बाहेर ? अमेरिकेत आर्थर मिलर या त्याच देशातल्या नाटककाराने त्या मॅकार्थी प्रकरणावरूनच ' क्रुसिबल ' नावाचे नाटक लिहिले आणि ते जगभर गाजले. असे गोपूंच्या विचारसरणीच्या देशांत घडू शकेल ? कट्टर भूमिकेमुळे माणूस किती आंधळा होतो, याचे हे उदाहरण. हिटलरने कत्तल केली तर त्याला फॅसिस्ट म्हणायचे कारण तो संकुचित विचारसरणीवाला, आणि यांनी तशीच माणसे मारणे योग्य कारण हे विशाल, मानवहिताची भूमिका बाळगणारे !

"माझे सरकारी युनिकोड आहे --"

"मराठी चालू असताना येत नाही -- इंग्लिश चालू असेल तरच येते --"

"किंवा, आणखी एक होऊ शकते -- विद्वत्तेचा उपयोग करून, आळेकर, एलकुंचवार हे दोघे गोपूंच्या भूमिकेला पूरकच कसे आहेत, किंबहुना तीच भूमिका ते कसे वेगळ्या प्रकारे मांडत आहेत, हे दाखवून देणे !"

"मी हे असले मनातले सहसा फारसे बोलत नाही, पण इथे मैत्रीत बोललोच आहे तर एक राहिलेला मुद्दा सांगतो. गोपूंनी सांगितलेल्या चार नाटककारांत आळेकर आणि एलकुंचवार कसे आले असावेत, हा एक प्रश्न विचारात घ्यावा असा आहे. भूमिका सोडून पुढे जाणारी अशी ही निःपक्षपाती, समावेशक विद्वत्ता म्हणावी की अलग पडण्याची -- आयसोलेट होण्याची -- भीती म्हणावी ? की आपल्याला आवडणाऱ्या दोनच नाटककारांची नावे सांगणे हे फारच खत्रुडपणाचे दिसेल, अशी लाज वाटली असावी ? की हा एक प्रकारचा समझोता असेल ? अहो, भूमिका काहीही असली तरी मानवी जगणे वेगळेच असते, संदर्भशून्य वागता येत नसते ! आपद्धर्म असतात !"

"देवापेक्षा देवीच पावावी, असे वाटणे, हा एक मानवी दुबळेपणा आहेच माझ्यात !"

"ती पावण्याची शक्यत असते म्हणतात, इथे काय आहे, कोण जाणे !"

"मी विचार केला, यात नुकसान तर काही नाही, जाऊ दे पुढे !"

"एकूण माणूसच हलकट असतो, जवानीत ताकद जास्त असल्यामुळे जास्त ह असतो !"

"थिएटर ॲकॅडेमी सोडून महाराष्ट्रातल्या सगळ्या नामवंत संस्था ( रंगायन पासून ), अनेक हौशी नाट्यसंस्था, बँका, कारखाने, कॉलेजेस यांना या संहितांचे प्रयोग करावेसे वाटणे, ही काय नगण्य बाब आहे ? याच महाराष्ट्रातली प्रतिष्ठेची समजली जाणारी लेखनाची बरीच पारितोषिके असणे हेही नगण्य ? मी असल्या फालतूगिरीला किंमत न देता माझे काम करत असतो, पण आज हे मैत्रीत बोलावेसे वाटले."

"फ्रेंडसशी बोलताना मनातला एखादा राग व्यक्त झाला तरी चालतो -- तसे काही बोलतो. २२ प्रायोगिक नाटके आणि २० एकांकिका आणि एडसबबात जागरूकता वाढवण्यासाठी एक पथनाट्य, एवढे माझे नाट्यक्षेत्रात काम आहे. आणि हे अगदीच हौसखात्यात केलेले फालतू काम नाही. असे असूनही या डॉक्युमेंटरीत गोपूंना कोणते नाटककार आठवतात ? एलकुंचवार, आळेकर, साठे आणि पवार ! असे हे संकुचित विद्वान ! अशा कुजकट विद्वत्तेचा मला हा पहिलाच अनुभव आहे, असेही नाही म्हणा ! आपल्याच भाषेत, एका वेगळ्या वाटेने का असे ना, बऱ्यापैकी काम असणाऱ्याला अनुल्लेखाने मारायचा प्रयत्न कणाऱ्या या विद्वान लेखकाला, त्याच्या नाटकातल्या श्रीधर विश्वनाथ या पात्राच्या चौकशीचे एवढे महत्त्व वाटते, हे त्याचे व्यक्तिगत दुःख ठरते, ते अशा संकुचिततेमुळेच !"

"आविष्कारी मात्र मला चपखल ! माझी पाच नाटके !"

"अभ्यास कमी पडणारे, कार्यानुभव नसलेले, ईझीचेयर विचारवंत -- हेही घ्या !"

"श्रद्धावान, देवनिष्ठ, अध्यात्मवादी, धर्मवादी -- या जास्त इरसाल आहेत !"

"गोपू चर्चेची ॲलर्जी झालीय, दुसरे काय !"

डॉक्टरी शिक्षणाच्या काळात त्या विद्यार्थ्यांची मनोरुग्णालयालाही भेट असते. असे काही विद्यार्थी ते रुग्णालय पाहात फिरत होते. बाजूच्या जागेत काही रुग्ण बागकाम करत होते. तेवढ्यात अचानक एक रुग्ण एक गुलाबाचे फूल घेऊन एका विद्यार्थ्याकडे आला आणि त्याला ते फूल देऊ लागला. विद्यार्थी बावचळला " अहो, नको, नको – " म्हणाला. त्या रुग्णाने एकदम डोळे वटारले आणि तो दरडावून त्या विद्यार्थ्याला म्हणाला, " घ्या ! – "

सिनियर डॉक्टर म्हणाले, “ अहो, घ्या, घ्या, तो प्रेमाने देतोय ! “ विद्यार्थ्याने घाबरून ते फूल घेतले आणि झपाझप चालत तो पुढे गेला. त्या रुग्णाच्या चेहऱ्यावर फुललेले समाधान पाहायलाही तो थांबला नाही ! तसेच इथे महाराष्ट्रात “ तुमच्या हातून भले करून नकोय आम्हाला “ --असे लोकांनी सांगितलेले असूनही, त्यांनी पिकवलेल्या संस्कृतीचे फूल सक्तीने घ्यायला लावणारे लोक म्हणजे समाजवादी आणि कम्युनिस्ट !

"' सखाराम बाइंडर ' वाचणे आणि ज्यांनी निळू फुल्यांनी उभा केलेला पाहिला असेल तो, यांतला फरक आठवा ! चर्चेला वावच उरणार नाही ! पण बरीच नाटके संहिता स्तरावरही अस्तित्वात असतातच -- प्रयोग न पाहताही आपल्याला ती ग्रेट वाटतात !"

"उत्तर अजूनही संदिग्ध राहिले असे एका मित्राला वाटले -- म्हणून शॉर्ट बट स्वीट उत्तर ---- समाजवादी आणि कम्युनिस्ट ! राजकारणातून बाहेर टाकलेले ! आता तपासा सांस्कृतिक क्षेत्र ! गोपूंसारखे काही नवे सत्य गवसतेय का पाहा !"

"गोपू एका ठिकाणी असे म्हणाले आहेत की पेशवाईतली सत्ता गेल्यावर पुन्हा आपले कुठेतरी वर्चस्व कसे आणावे याचा ब्राम्हण विचार करत होते, त्यातूनच विष्णूदास भाव्यांकडून पहिले मराठी नाटक लिहिले गेले ! मला असले अन्वय पटत नाहीत पण तसाच एक अन्वय मी आजच्या मराठी सांस्कृतिक क्षेत्रासाठी देऊ शकतो. महाराष्ट्राच्या राजकारणातून गेल्या काही वर्षांत कुणाला हाकलून देण्यात आले आहे ते पाहा आणि त्यांनीच तर इथले सांस्कृतिक क्षेत्र काबीज केलेले नाही ना, याचा अभ्यास करा ! मला वाटते, गोपूंना एक रहस्य उलगडले तसेच हे आणखी एक उलगडेल !"

" -- पूर्वी प्लेगची साथ आली की माणसे पटापट मरत. डॉक्टरला खूप काम पडे. तो रोगी बघायला जातोय तोवर बऱ्याचदा तो मेलेला असे. त्याला खांदे द्यायलाही माणसे मिळत नसत. मग लोक डॉक्टरलाच म्हणत, जाऊ द्या आता, आल्यासारखा खांदा तर द्या. खांदा देऊन देऊन डॉक्टरचा खांदा दुखत होता. तो दिवसभर काम करून थकून आला होता आणि जरा बसला होता. तेवढ्यात एकजण पळत आला, म्हणाला, डॉक्टर, लौकर चला, माझा भाऊ फार आजारी आहे. जाणे तर भाग होते. डॉक्टर म्हणाला, येईन पण खांदा देणार नाही. ----- हे सांगायचे कारण मत सांगेन पण चर्चा करणार नाही !"

"एखाद्या माणसाला नाटकी म्हटले जाते पण कवती किंवा कथ्थी म्हटले जात नाही -- हा बिचाऱ्या नाटकाचा निष्कारण होणारा अवमान आहे !"

"गोपू, मकरंद साठे यांना पोस्टमॉडर्न नाटककार म्हणाले आहेत -- हे बोलणे, विचारसरणीचे महत्त्व मानणाऱ्या नाटककाराचा अपमान आहे, हे कुणालाच कळलेले दिसत नाही. पोस्ट मॉडर्न हे जणू काही भूषण आहे, असे समजले गेलेले दिसते !"

"कवी, लेखक, नाटककार असलेल्या गोपूंवरची दीड तासाची फिल्म असून त्यांच्या कोणत्याही कलाकृतीचा आशय, माणसाच्या जगण्यातले प्रश्न, यांवर यात एक अक्षरही नाही !"

"लागूंचे ग्लॅमर आपण आपल्या वैचारिक क्षेत्रावर परिणाम करणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे -- ज्याचीत्याची मर्जी !"

"शुभरात्र !"

"डॉ. लागू नट म्हणून ठीक पण ते काही आमचे संस्कृतिक नेते नाहीत !"

"गेली काही वर्षे ज्यांनी मराठी सांस्कृतिक क्षेत्र ताब्यात ठेवले आहे त्यांनी मराठीचे प्रचंड नुकसान केलेले आहे, असे माझे स्पष्ट मत आहे."

"' उद्धस्त धर्मशाळा ' हे माझ्या मते किरकोळ नाटक आहे -- नाटक, नेमाडे म्हणतात तसे भाषेच्या नव्हे तर आशयाच्या अंगाने जोखले पाहिजे -- ह्या डाव्या विचारसरणीच्या माणसाची चौकशी झाली यात विशेष कौतुक काय आहे ? जिथे यांची सत्ता असते तिथे तर विरोधी माणसांची चटणीच केली जाते, त्याचे काय ?"

"दिग्दर्शक माझा जुना मित्र आहे -- नंतर भेटायचे ठरलेही होते -- पण पिताना हाच विषय निघाला असता -- प्रचंड वाद झाला असता -- आणि मला कंटाळा आला होता --"

"नाटकाचा आशय याबद्दल काय होते त्यात ?"

"मित्रांचे कष्ट होते -- प्रेमाचा भाग होता - पण मला ते काहीच आवडले नाही -- मला वाद घालायचाही कांटाळा आला होता -- मी निघून आलो --"

"मीही होतो तिथे --"

"कुणी कितीही चुकीचे बोलला तरी त्यात थोडे तरी तथ्य असतेच, याची जाणीव असली तर चर्चा बरी चालू शकते. पण ' मीच परिपक्व, योग्य मतांचा आणि तू किती बालिश, बेसलेस ' असे मनात असले की खिल्लीबिल्ली चालू होते. चर्चा याचा अर्थच, मी नसलेल्या अशा दुसऱ्या व्यक्तीशी बोलणे. हेच जे विसरतात ते चर्चेला योग्य कसे म्हणावे ? मैत्रीत थोडी चेष्टा, गंमत ठीक आहे, ते हिंसात्मक होऊ नये. तांब्यांनी योग्यच सांगितले आहे."

"मनापासून सॅल्यूट मारावा असा ग्रेट अभिनेता !"

"हा खरोखरच अतिमहत्त्वाचा प्रश्न आहे -- याची कोंडी फुटायची जागा कोणती ?"

"' कुणाच्या ' म्हटलेय म्हणजे व्यक्तीचा प्रश्न आहे. अमुक व्यक्तीच्या नादी लागावे असे आपल्याला वाटणे आणि असे नादी लागू द्यावे असे त्या व्यक्तीला वाटणे -- या दोन अटी फुलफिल झाल्या तर पुढे सांगण्यासारखे काही उरण्याची शक्यता दिसत नाही !"

"इतकी ॲब्सर्ड परिस्थिती दिसणे, याला माझा सलाम, मनापासून !"

"बोंबला ! हा नवीनच प्रकार निघाला ! ' हेही बरोबर, तेही बरोबर ' हा एक मठ्ठपणा म्हणून आपल्याला माहीत होता -- आता -- हेही चूक आणि तेही चूक ?"

"( मित्रांनो, जरा चावटपणा माफ करा ) हे गाणे कुसुमाग्रजांनी लिहिले आहे ना ? मग हा ढिसाळपणा कसा ? बरोबर काय, चूक काय -- याला महत्त्वच नाही ?"

कहाणी लज्जागौरीची

"कविता आवडली पण ते लज्जागौरी वगैरे समजून घ्यायचा मला कंटाळा आहे --"

"बघा बाबा हा मध्यम मार्ग कुणाला चालतोय का ते !"

"आपापल्या पाहण्याच्या प्रक्रिया व्यक्त होणे, हे खरेच बरेचसे झालेले आहे. थांबू या ! अर्थातच कटुता नाही, फ्रेंडशिप पक्की !"

"सॉरी, थत्तेजी, मला हे मान्य नाही."

"शास्त्रीय दृष्टिकोण म्हणजे मनात आधीच निष्कर्ष तयार ठेवणे नव्हे."

"आधी वैचारिक भूमिकांचे निष्कर्ष घेऊन कलानिर्मिती होते, असे कुणी म्हणू लागले तर माझ्याही दृष्टीने प्रश्न मिटतो."

"हे चित्र अमुक भूमिकेचे आहे म्हणाल की अर्थपूर्ण आहे म्हणाल ?"

"तसे नाही, शास्त्र, तत्त्वज्ञान यांत धरतो का आपण भूमिकांचा आग्रह ? भूमिका याचा अर्थच व्यक्तिनिहाय, गटनिहाय इंटरेस्ट. यातला चिकित्सकपणा म्हणजे ठरलेले ईप्सित कसे लौकर साध्य होईल अशा स्वरूपाचा असणार. शास्त्र, तत्त्वज्ञान या क्षेत्रांप्रमाणेच कलेतही आत्मनिरपेक्ष खुलेपणा असायला हवा, असे मी म्हणतोय. प्रत्यक्ष जगण्याचे मटेरियल घेऊन त्याच्या सर्व गुंतागुंतीसह त्याचे भान घेणे, हे मला कलेचे कार्य वाटते."

"कलानिर्मिती म्हणजे मताभिव्यक्ती ?"

"बरोबर-चूक या घट्ट भूमिका असलेले कलावंत संवेदनशीलपणे, खुलेपणाने जगण्यातली गुंतागुंत समजून घेऊन निर्मिती करू शकतील, असे तुम्हाला खरेच वाटते ?"

"मी साधक असल्याचे कुठेही क्लेम केलेले नाही -- चिकित्सा ही एखाद्या घट्ट भूमिकेशी बांधलेली असू शकते का याचे तुम्ही उत्तरच देत नाही आहात --"

"अहो, आत्मकेंद्रीपणाला आपण चिकित्सकपणा म्हणू शकतो का, एवढाच प्रश्न आहे."

"मी ' दगडाचा ' हा शब्द ' निरर्थक ' या अर्थी वापरलेला आहे."

"अगदी बरोबर ! चर्चेत प्रश्न आणि उत्तरे यांचाच वापर व्हावा -- दगडांचा नव्हेच --"

"व्यक्तिनिहाय आणि गटनिहाय हिताची भूमिका हेच मूल्य समजून काम व्हायला हवे असे शास्त्राच्या आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात कुणी म्हणत नाही कारण ते फारच वेडेपणाचे दिसेल याची जाणीव असते. कलेचे क्षेत्रही जर मानवी जगणे समजून घ्यायचे माध्यम असेल तर भूमिकांचा संकुचित मठ्ठपणा टाकल्याशिवाय इथेही काही अर्थपूर्ण काम होऊ शकणार नाही, हे आपण का पाहात नाही ? मठ्ठपणा वगैरे शब्द कुणीही वापरू शकतो -- तो काही मुद्दा नसतो. आपल्याला अडचणीचे प्रश्न आले की चिडणे, चेष्टा करणे ही अवजारे आपण लगेच बाहेर काढतो, हे कशाचे लक्षण आहे ? भूमिका ही व्यक्तिनिहाय, गटनिहाय हिताची / फायद्याची असते -- हा कसला दगडाचा चिकित्सक घट्टपणा ?"

"माणसाच्या जगण्यातले सर्व महत्त्वाचे प्रश्न हे संबंधांचे असून भूमिकांमुळेच तयार झालेले आहेत, हे आपल्याला दिसतच नाहीय की पाहायचे नाहीय ? समजा, हे असेच होत राहणार, भूमिकांशिवाय जगण्याची कल्पनाही शक्य नाही, तो प्रश्नही व्हॅलिड नाही आणि या पद्धतीने विचका होत असला तरी इलाज नाही -- असा पूर्ण निराशावादी दृष्टिकोण आपल्याला ग्राह्य वाटत असेल तर माणसाच्या जगण्यात कला आणि तत्त्वज्ञान यांना स्थान काय ? की त्यांचीही काही गरज नाही ? जाईल तिकडे जाईल आणि धडकेल तिथे धडकेल ?"

"आपण जगण्यातला एखादा प्रश्न आहे तसा बघायलाच नकार का देतो ? सुखी माणसाचा सदरा, असा माणूस असेल तरी का, वगैरे बोलून आपण प्रश्नही पाहायचे का नाकारतो ?"

"दिसायला हे प्रश्न साधे दिसतात -- सुख टिकत का नाही ? दुःख मिटत का नाही ? --"

"भूमिका घ्या, भूमिका घ्या -- असा कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात फारच धोशा चालू असतो, त्यामुळे, निर्भीडपणे हा विषय तपासला जावा."

"काही भूमिकावाले मानतात की ते दुसऱ्यांना आनंदी करणार आहेत -- आनंदी होणे न होणे हे त्या त्या व्यक्तीत घडावे लागते, एवढ्यापुरते ते ' कुणाच्याही आयुष्यात ' असे आहे. स्वातीजी आणि रवीजी यांनी हा विषय एकदम, मानवी संबंध या व्यापक क्षेत्रात नेला आहे . तत्पूर्वी राजकीय, सामाजिक, वैचारिक भूमिकांचे काय असते, तेही पाहावे. या भूमिका संघर्ष, ताणतणाव, डावपेच, विध्वंस या घटकांसहच असतात की नाही ? अहो, हे तर लागणारच, त्याला काय करणार ? -- अशी प्रतिक्रिया द्यायची असेल तर देता येईल, पण आधी काय आहे ते पाहावे."

"अरे वा ! स्वातीजी, स्वागत ! फ्रेंडस, स्वातीजी मानसशास्त्राच्या अभ्यासक आहेत, हे आपल्यापैकी अनेकांना माहीत असेलच. त्यांच्या, या चर्चेतल्या उपस्थितीने ही चर्चा अधिक उद्बोधक होईल, यात शंकाच नाही. मीही आता अधिक

उत्सुक. स्वातीजी, दुःखदायक नसणाऱ्या किंवा आनंददायक असणाऱ्या अशा शास्त्रसंमत ताणांची काही उदाहरणे द्या, प्लीज --"

"आनंदाचा क्षण म्हणजे ताणरहित क्षण --"

"मी यातल्या आवश्यक त्या ज्ञानशाखांचा अभ्यासक नाही, पण ही चाललेली चर्चा समजून घ्यायचा प्रयत्न करतोय. मला थोड्या सोप्या पद्धतीने असे दिसतेय की माणसाचे कंडिशनिंग, प्रोग्रामिंग -- जनुकीय, भाषिक, धार्मिक, वगैरे म्हणजे संस्कृती. हे आकलन थोडेफार बरोबर असेल तर ' सुसंस्कृत ' हा शब्द का, कशासाठी वापरला जातो, असा मला प्रश्न पडतोय. यात ' श्रेयस ' अशी काही गोष्ट असते का ? ती कशी ठरते ?"

"भूमिका ही विचारपूर्वक, कष्टपूर्वक घडवलेली, स्वीकारलेली मानसिक अवस्था -- एक पवित्रा, पोझ -- असते. हा एक ताण असतो. ताण दुःखमय असतो, हे सांगायला मानसशास्त्रज्ञाची गरज नाही. या अर्थाने, सगळे भूमिकावाले दुःखाचे पुरस्कर्ते आणि दुःखी असतात. ते स्वतःच्या किंवा कुणाच्याही आयुष्यात शांततेचा -- आनंदाचा क्षण आणू शकत नाहीत. याउलट गौतम बुद्ध दुःखमुक्तीबद्दल बोलतो. भूमिकावाल्यांचा आणि बुद्धाचा काडीचाही संबंध असू शकत नाही. निर्वाण आणि भूमिका एकच म्हणावे तर भूमिका हजार प्रकारच्या असतात, मग निर्वाणही हजार प्रकारचे असतात का, असा प्रश्न येतो. माझ्या आठवणीप्रमाणे आंबेडकरांनी मांडलेल्या बुद्ध धर्मात निर्वाणाची वार्ता नाही -- की जो बुद्ध धर्माचा प्राण आहे. मी तज्ञ नाही -- यावर जाणकारांनी प्रकाश टाकावा."

"इथे आणखी काही असेल तर मी थोड्या वेळाने पाहीन -- सध्या बाय --"

"याला जे. कृष्णमूर्ती डिकंडिशनिंग म्हणतात -- ते म्हणजे मनाचे कष्ट थांबवणे --"

"बाहेरून, अभ्यासाने, कष्टाने, सरावाने --असे मिळवायचे हे ज्ञान नसून ते स्वतःत उमलणारे ज्ञान आहे, असे बुद्ध म्हणतोय, असे वाटते. थोडे अलंकारिक बोलल्याची त्याला अशी शिक्षा देऊ नये."

"चिन्हरचनेत मूल्यकल्पनाही येते का ? कशी ? तीही सत्ता-शोषण रचनेचाच भाग असते का ?"

"सॉरी ! याचे काय करायचे ते खरेच मला माहिती नाही !"

मित्रांनो, मी तर अंतर्धान पावलो होतो, पण तुमची तळमळ पाहून पुन्हा आलोय --

एक : होय, आहे मी संकुचित, पण मी जमिनीवर आहे.

दोन : होय, आहे मी संकुचित, पण मी जमिनीवर आहे.

तीन : होय, आहे मी संकुचित, पण मी जमिनीवर आहे.

चार : होय, आहे मी संकुचित, पण मी जमिनीवर आहे.

वगैरे.

जमिनीवर असल्यामुळे काय महत्त्वाचे आहे, काय करायला हवे, ते सर्वांनाच माहीत होते. पण ते वेगवेगळे होते.

वेगवेगळे असल्यामुळे त्यांच्यांत संघर्ष झाले. त्यातून सत्ता आणि विषमता निर्माण झाली.

संकुचितपणा म्हणजे जमीन, हे सर्वांचेच ठरलेले होते.

पण सांस्कृतिक गप्पा उदारतेच्या, सहानुभूतीच्या, विशालतेच्या मारायच्या, हेही सर्वांना मान्य होते.

संस्कृती, उदारता, विशालता असे काही नसतेच, हे सर्वांना आतून माहीत होते.

बुद्ध, तुकाराम, ज्ञानेश्वर हे जमिनीवरचे नव्हतेच, असे ठरवण्यात आले होते.

त्यामुळे, एक वेळ त्यांना मोठे म्हणा, पण आपल्याशी त्यांचा काही संबंध नाही, असे ठरलेले होते.

विषमता, जातीयता, अन्याय, अत्याचार, छळ निर्माण करू पण जमिनीवर राहू, हे पक्के होते.

त्याचे वर्चस्व राहण्या ऐवजी माझे राहणे म्हणजे विषमता नष्ट होणे , हे स्पष्टच होते.

प्रश्न विचारू नका, इहवादी राहा, बुद्धिवादी राहा, जमिनीवर राहा – हा एकमेव संदेश होता.

( याबाबतचे प्रश्न निर्माण करणारे जमिनीवरचे नाहीत, असे ठरवून टाकण्यात आले होते. )

"इंटरेस्ट आहे पण वेळ नाही, वेळ आहे पण इंटरेस्ट नाही, पैशांचा विनियोग दारूसाठी केला तर मजा येते आणि घरात अडगळ होत नाही, तोच विनियोग पुस्तकांसाठी केला तर घरात अडगळ होते -- ती कितीही समृद्ध असली तरी समृद्धी आणत नाही --"

"मला वाटते अशा इथल्या एफबी-चर्चांतून आपापले आकलन मांडण्याचे काम होऊ शकते, खूप विद्वत्ताप्रचुर देवाणघेवाण होऊ शकत नसली तरी. या चर्चेच्या निमित्ताने निघालेले जे विषय होते त्यांवर पुरेसे बोलून झालेले असून आता आपण तेच तेच बोलत राहण्याची शक्यता दिसते आहे. आपल्या आकलन-प्रक्रिया ओपन ठेवू आणि इथल्या इथेच काय तो निकाल लागावा, असा अधीरपणा टाळू. आणखी विषय येतील, चर्चा होत राहतील. त्यामुळे, मी, मधेच थोडी गरम हवा तयार झालेली ही चर्चा ( तसे होण्यात माझाही हात असल्याने, त्याबद्दल माफीही मागून ), माझ्या बाजूने थांबवत आहे. मैत्रीचा पाया पक्का राहो आणि ही मैत्री पुन्हाही आपल्याला चर्चेला प्रवृत्त करो हीच सदिच्छा !"

ज्यांचे निष्कर्ष पक्के आहेत त्यांना पटवून देत कोण बसणार ? तुकड्यांनी पाहणे म्हणजे काय हे स्पष्ट केलेले असूनही उदधृते द्या म्हणून हटून बसणे, मी युक्तिवाद करणार नाही, माझा विश्वास आहे, माझ्याहून वेगळे बोलणाऱ्याला काही समजलेलेच नाही -- असे म्हणणे, अशी निरनिराळ्या प्रकारची कट्टर माणसे असणे हाच तर जगण्यातला महत्त्वाचा प्रश्न असल्याचे पाहायला नकार देणे -- हे सगळे कुणाला लखलाभ म्हणायचे ? अनेक प्रकारे, अनेक अंगांनी माणूस जगणे समजून घेत असतो, हे न पाहता फक्त मलाच कळते अशा भ्रमात राहणेच पसंत करणे -- ही सगळी कसल्या संस्कृतीची लक्षणे आहेत ? निरनिराळ्या आदर्श विचारसरणी, उत्तम शिकवण देणारे धर्म यांच्यांत युद्धे होतात ती का, याकडे कुणी लक्ष देऊ इच्छित असेल तर त्याला मूर्खात काढणे, हा तर, आहे त्या सवयीत आणि आहे त्या विषमतेत जगणे चालू ठेवण्याचा पायाच आहे. एक अन्याय घालवेपर्यंत दुसरे हजार अन्याय का अस्तित्वात येतात हा प्रश्नही न पडणे -- ही सगळी कर्मठ, अस्मितावादी, हिंसावादी मते आहेत. अशा मार्गाने इथे स्वर्ग येणार आहे यावर कुणाचाही कितीही ठाम विश्वास असो, माझा नाही !

"माझे म्हणणे मांडायची जबाबदारी मी पुरेशी घेतलेली आहे -- पटवायची जबाबदारी नको --"

"तैसे अधमाचे गुण । एकविध नाही मन ।। -- या तुकारामाच्या उक्तीचा संस्कृती या विषयावर काही प्रकाश पडेल का ? की त्याच्या ओळी त्याला लखलाभ, असेच म्हणावे ?"

आहे ती अलगता, विदीर्णता, हिंसा, संघर्ष, वर्चस्ववाद, अन्याय -- हे सगळे चालू ठेवण्याचे समर्थन करणे, समग्रतेची शक्यताच नाकारणे, तशा कलाकृती दाखवल्या तरी त्यांबद्दल न बोलणे, हजारो प्रश्नांतला एकेक प्रश्न हळूहळू सोडवत बसण्याचे उदात्तीकरण करणे, ही पद्धत हजारो वर्षे फेल होत आलेली असून माणूस अधिकाधिक एकाकी आणि आत्मकेंद्री होत चालला आहे इकडे लक्ष न देणे, यांबाबत प्रश्न विचारणाऱ्यांना साक्षात्कारवादी, अध्यात्मवादी या निरर्थक शब्दांनी हेटाळणे, यातून अटळपणे येणारा गडद निराशावाद स्वीकारणे, या गोष्टींमुळेच विषमता, जातीयवाद वगैरे प्रश्न तर निर्माण होत नसतील, अशी शंकाही घेऊ न देणे -- ही जर संस्कृती असेल तर ती कुणी कुणाला लखलाभ म्हणायची गरज नाही -- तेच चालू आहे ! आहे ते चालू ठेवणे ! मी वर उल्लेख केलेल्या ग्रेट कलाकृती, असली संस्कृती नाकारतात !

"अरे वा ! एफबीवर आता स्मितसुकाळ होईल ! प्रसाराबद्दल धन्यवाद, जुई !"

"बुद्धिप्रामाण्यवादी माणूस हा अपरिहार्यपणे अलगतावादीच असतो -- हा माझा समारोप !"

"संस्कृतीचे मी सांगितले -- साक्षात्काराचा मुद्दा तुमचा आहे -- तुम्ही सांगा --"

"अलगतावादाचा प्रभाव म्हणजे संस्कृतीचा अभाव."

"माझ्या कल्पनेप्रमाणे मी उत्तरे दिलेली आहेत. स्त्रीवादाचा अँगल, समतेचा अँगल, जातीभेदविरोधाचा अँगल -- हे जगण्याकडे तुकड्यांनी पाहणे. यासाठी कुणाच्या उदधृतांची गरज नाही. ' मानवी आयुष्याविषयी काही एक भूमिका असणारा लेखक ' जेव्हा बौद्धिक, वैचारिक भूमिका घेतो तेव्हा तो समग्रतेचे भान घेऊ शकत नाही, हेच मी इथे मांडण्याचा प्रयत्न करतोय. जे काय असेल ते फक्त बौद्धिक, वैचारिक, एकरेषीय, विश्लेषणात्मक असेच असू शकते, अशी ज्यांची श्रद्धा आहे ते समग्रतेचा आवाका घेऊ शकत नाहीत. संस्कृतीची निर्मिती ही समग्रतेच्या भानातून होते -- दिशावादी तुकड्यांतून नाही. उलट, इथे माझी अशी तक्रार आहे की उपस्थित आक्षेपांवर कुणीच बोललेले नाही आणि मी जे लेखक सांगितले त्यांना ' साक्षात्कारी ' म्हणावे का, हेही कुणी सांगितलेले नाही."

"संस्कृतीच्या अभावामुळे निर्माण होणारे हजारो प्रश्न आहेत -- त्यांना संबंधांचे प्रश्न म्हणू -- त्यांतला एकेक प्रश्न घेऊन दिशावादी पद्धतीने लिहिणे म्हणजे माणसाकडे लक्ष देणे आणि संस्कृती निर्माण होणारे लिहिणे म्हणजे माणूस वगळून लिहिणे, असा तर समज इथे व्यक्त होत नाहीय ना, अशी शंका येते."

"संरचनावाद त्यांना सुचला म्हणून तो आपल्याला लागू पडत नाही, असे काही नाही. हे सगळे एकूण माणसाचे चिंतन आहे, असेच त्याकडे पाहायला हवे."

"आयनेस्को, बेकेट, पिरांदेल्लो, काफ्का, कोएत्झी, खानोलकर, आणि सतीश तांबे, रंगनाथ पठारे, राजन खान, मधू साबणे यांच्या काही कलाकृती या मुळीच दिशावादी नाहीत -- मग ती सगळी बुवाबाजीची उदाहरणे म्हणावीत का ?"

"या चर्चेमुळे ' दिशावाद ' ही संज्ञा सापडली !"

"आक्षेपांवर जर कुणी बोलत नसेल तर ते आक्षेत ग्राह्य झाले, असे समजावे काय ?"

"साक्षात्कार वगैरे शब्द वापरून मुद्दे उडवून लावण्यात अर्थ नाही -- आक्षेपांवर बोलले पाहिजे --"

"दिशावाद्यांना जे प्रश्न दिसतात त्यांच्या मुळाशी कुणी गेले तर हरकत काय आहे ?"

"माणसाचे जगणे असंख्य घटकांनी युक्त असते -- एकरेषीय विचाराला तो आवाका येऊ शकत नाही -- तशी कुंपणे कलेला न घालणारे कलाकार माणसाचे भान विस्तारतात आणि मनाच्या / बुद्धीच्या अलगतेतल्या मर्यादांमुळे निर्माण होणारे प्रश्न, गुंते, हिंसा याची समज त्याला देतात -- याचे महत्त्व बांधिलकीवाले का नाकारतात ?"

" देशीवादासारखाच, ' दिशावाद ' हा एक शब्द समीक्षेत रूढ व्हावा, असे वाटते. वैचारिक दिशा देण्याला महत्त्व देणारे ते दिशावादी !"

"बाजरीच्या भाकरीला पुरणाच्या पोळीची चव आणणे भाकरीच्या क्षेत्रात शक्य असो, नसो, साहित्याच्या, कलेच्या क्षेत्रात नक्की शक्य असते. आणि मुख्य म्हणज कलेच्या क्षेत्रात , बाजरीच्या भाकरीपेक्षा पुरणाची पोळी श्रेष्ठ, असे काही नसते !"

"विद्रोह, पुरोगामी, बांधिलकी, परिवर्तन -- हे शब्दच काय सांगतात ते पाहा -- ' तुकडे पाहा ' असे वाक्य असायची गरज नाही."

"समग्र भानाची कलाकृती ही जगण्याच्या अशा एका भागावर केंद्रित नसते उदा ' डिसग्रेस ' ही कादंबरी किंवा खानोलकरांचे लेखन -- हेच खरे तर माणसाला समतेचे आकलन देऊ शकते पण समतावाद्यांना हे भावत नाही, कळत नाही."

"विषमता, गरिबी, जातीयता, धार्मिक तेढ, स्त्रियांना गौणत्व असणे -- हे सगळे पूर्ण मानवी जगण्यासह न पाहता स्वतंत्र तुकडे म्हणून पाहा, असा बांधिलकीवाल्यांचा आग्रह असतो."

"त्याच्यापेक्षा वाईट संदिग्धता मूल्यात्मकतेबद्दलच आहे. बुद्धिप्रामाण्यवादी आणि तथाकथित सामाजिक बांधिलकीवाल्यांनी या गोष्टी खूप खुज्या करून टाकलेल्या आहेत !"

"चव्हाटा हा स्वच्छ लोकांचा असल्याने इथे फक्त कृष्ण-पत्रिका निघू शकेल !"

"' सावित्री ' ला नेमाडे छापून छापून वाढवलेली कादंबरी म्हणतात."

"गाओ झिंगझिआनची ' सोल मौंटन ' ही नोबेल पुरस्कारप्राप्त कादंबरी ही कादंबरीच नाही मुळात, असे काहीजण म्हणू शकतात ! या कादंबरीचा उत्कृष्ट मराठी अनुवाद माझा मित्र मधू साबणे याने केलेला आहे. ( पद्मगंधा प्रकाशन ). साहित्यप्रकार, घाट हे आमूलाग्रही बदलू शकतात. याचा अर्थच, अमुक म्हणजे असेच, असे काही नाही. अमुक अमुक पात्रांची सलग कथा वा सातत्यही नाही, ही कशी काय कादंबरी ? -- असे होऊ शकते. आणि या आक्षेपावर आधारित करणार मूल्यमापन ?"

"सर, इथे बरेच जण आपल्याला सर म्हणताहेत -- याचा थोडा फायदा घेऊ -- या विद्यार्थ्यांना या चर्चेचा विचार करून एक परिच्छेद लिहा, असे सांगून आपण चहाल जाऊ ! किंवा तुम्ही म्हणाल ते ड्रिंक !"

"तो निर्णय मूल्ययुक्त नाही, नाटक मूल्ययुक्त आहे ! कवितेऐवजी नाटक लिहिण्याचा निर्णय घेणारे आणखी खूप असतील !"

"संरचना कथेतही असते, कवितेतही असते -- वेगवेगळी असेल -- कलाकृतीचे मूल्य हे अशा प्रकार-विभाजनावर कसे ठरणार ?"

"बेकेटच्या ' वेटिंग फॉर गोदो ' ला काय, कुठल्या कॅटेगरीतले नाटक म्हणणार ?"

"आयनेस्कोचे नाटक ' सुखात्मिका ' की ' शोकात्मिका ' ? तसे सांगता येत नाही."

"तुम्ही त्या भेदांना मूल्यात्मक महत्त्व असल्याचे म्हणालात म्हणून तसे वाटले."

"हा मग आपल्यातला मूलभूतच मतभेद आहे -- एखादी कलाकृती ही कादंबरी आहे म्हणून ती कविता असलेल्या कलाकृतीहून आपोआप महत्त्वाची ठरते, हे मला कदापि मान्य होणार नाही."

"' भारताचे लाडके व्यक्तिमत्व आणि महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व ' -- ह्या विषयावर उद्बोधक चर्चा होऊ शकेल !"

"पु. शि. रेग्यांच्या ' सावित्री ' या कादंबरीतला एक भाग ' शब्दरंजन ' च्या दिवाळी अंकात कविता विभागात आलेला होता ! सरमिसळ होऊ शकते. तरीही, ही वर्णने मी नाकारत नाही. यांना मूल्यात्मक महत्त्व नाही, एवढेच मी म्हणतोय."

"मानवी संबंधांचे आकलन -- हेच महत्त्वाचे -- अनुभव, माहोल कोणताही असेल. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय हे फक्त ढोबळ वर्णन आहे. याहून जास्त काय महत्त्व आहे या शब्दांचे ?"

"उदा. ' राजकीय नाटक ' ही संज्ञा घेऊ. नाटकातला हा काहीतरी अत्युच्च दर्जाचा प्रकार असतो असे काहीजण समजतात. हा एक सोयीसाठी केलेला विभाग फक्त आहे -- यातला अनुभवाचा माहोल हा राजकीय क्षेत्रातला आहे, याचा निर्देश करण्यासाठी. या माहोलाला स्वतंत्र महत्त्व काय आहे दगडाचे ? हेच लोक प्रत्येक नाटक हे राजकीय नाटकच असते, असेही म्हणत असतात ! कला ही एक बौद्धिक रचना आहे, विचारसरणीच मानवी प्रश्न सोडवेल आणि चांगली राजकीय व्यवस्थाच इथे स्वर्ग आणेल -- असे भ्रम बाळगणारे लोक समीक्षेच्या क्षेत्रात हा गोंधळ माजवत राहतात. जगण्याकडे विभाजित पद्धतीने पाहण्याचा हा परिणाम असतो."

निव्वळ करमणुकीसाठी असलेले धंद्याचे लेखन सोडून बोलतो. त्याचप्रमाणे ,मूल्यमापनाची उपपत्ती अशी असूच शकत नाही, ही उत्तर आधुनिक धारणाही बाजूला ठेवूनच बोलावे लागेल. ‘ साहित्याच्या मूल्यमापनाचा पेच ‘ नामक माझा एक लेख ‘ नव अनुष्टुभ ‘ मध्ये आला होता तेही सगळे इथे बोलणे शक्य नाही. थोडक्यात बोलतो. ---- कोणतीही कला म्हणजे मानवी संबंधांचे भान इंटरेस्टिंग प्रक्रियेतून व्यक्त करण्याची कृती, असे म्हणता येईल. हे भान दोन प्रकारचे असू शकते – एक, समग्रतेचे किंवा दोन, विभाजित म्हणजे तुकडे अधोरेखित करणारे – उदा. विषमताविरोधी, राजकीय, सामाजिक, स्त्रीवादी, समसंभोगवादी – अशा भूमिका घेणारे. भूमिका घेणाऱ्या कलेचा आवाका मर्यादित असतो, तिचे उद्दिष्ट सांस्कृतिक नसून व्यावहारिक असते, असेही म्हणता येईल. त्यामुळे ‘ मौल्यवान कला ‘ या दर्जाला ती पोचू शकत नाही. अशा मौल्यवान कलेचे निर्मातेही दोन प्रकारचे असतात – एक, उत्स्फूर्तपणे समग्र भानाची कलानिर्मिती करतात पण त्या प्रक्रियेबद्दल फारसे बोलू शकत नाहीत ( उदा. चिं. त्र्यं. खानोलकर. ) आणि दुसरे त्या प्रक्रियेचे चिंतनही मांडू शकणारे ( उदा. गाओ झिंगझिआन. ) असे चिंतन मांडू शकणारे मराठीत कोण आहेत, किती आहेत ? कलावंतांच्या मुलाखती घेणारे तरी त्या त्या कलावंताच्या या चिंतनाला आवाहन करू शकणारे प्रश्न विचारणारे, असे किती आहेत ? इथे ‘ रंगमुद्रा ‘ या पूस्तकामुळे चर्चा सुरू झालेली दिसते. त्या पुस्तकात असे सखोल कितपत सापडू शकेल, शंकाच आहे. आणि मूळ पुस्तकात असे आव्हानात्मक भाग फारसे नसतीलच तर त्याचे परीक्षण हे माहितीवजा, परिचयात्मक असे होण्याची शक्यताच जास्त. ‘ व्हॅल्यू ॲडिशन ‘ हे अलिकडचे एक लोकप्रिय शब्दयुग आहे. माहिती, व्यवहार, कार्यक्षमता यांबरोबरच भूमिका घेणारी कला -- एवढ्या क्षेत्रातच या शब्दयुगाला महत्त्व असू शकेल. मौल्यवान कला ही समग्रतेची असल्याने इथे थोडे थोडे ‘ व्हॅल्यू ॲडिशन ‘ संभवत नाही. माझ्या दृष्टीने उत्तम समीक्षेचा एक मानदंड सांगायचा झाला तर मी मार्टिन एस्लिनच्या ‘ द थिएटर ऑफ द ॲब्सर्ड ‘ या पुस्तकाचा उल्लेख करीन. मौल्यवान कलेची समीक्षा ही त्या कलेइतकीच मौल्यवान असावी लागते.

"मित्र नक्कीच आहोत !"

मी सहज कोणीतरी ...

"मी म्हणजे मीच असे सांगून -- यातल्या प्रश्नांची जी अपेक्षित उत्तरे आहेत तसेच माझे चालू असते ! अपेक्षित म्हणजे मला अपेक्षित !"

"पण शंका असण्याची अवस्था म्हणजे काही कंफर्टेबल स्टेशन नव्हे -- निःशंक प्रवाही क्लॅरिटी ( असल्यास ) सापडेल तेव्हा खरे ! जेन्युइन ( म्हणजे मूलभूत ) शंका तरी तिकडे घेऊन जाईल का -- तळमळीने पाठपुरावा केला तर -- ही एक शंका -- शंका हेच ध्येय नाही -- ती सुरुवात आहे --"

"पण ज्यांना ' प्रोग्रेसिव्ह ' हा शब्द आवडतो त्यांनी स्वतःला तसे म्हणत राहायची पद्धत आहे !"

"चुकीच्या प्रश्नाला चुकीचे उत्तर मिळते -- जेके."

"जगण्यातले हे चमत्कार ज्याला क्षणोक्षणी दिसत असतील त्याच्या हातून असेच श्रेयस्कर चमत्कार घडतील !"

"सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमत ।। -- तुकाराम."

"तुमचे मनःपूर्वक अभिनंदन ! लेखकांना नगण्य लेखण्याच्या इथल्या आणि मराठीतल्या अनेकांचा निषेध !"

"या भानाबरोबरच मानसिक द्वंद्व येते -- काय असायला हवे आणि काय हवे यांतले -- हे द्वंद्व आले की निरागसता गेली ! या गोष्टींचे भान येऊनही निरागसता असू शकेल का, हा खरेच महत्त्वाचा प्रश्न आहे."

"अशी रचना उद्भवू शकते आयुष्यात -- उदा -- घर आणि ऑफीस. पण दोन्हींचा एकमेकांवर कधीच परिणाम होणार नाही -- हे अशक्य वाटते. असे त्याच वेळी घडू शकेल जेव्हा दोन्ही निरर्थक असल्याचे दिसेल म्हणजेच हे दोन वेगवेगळे राहणारच नाही !"

"कॉमेंटस पाहून हे म्हणावेसे वाटले --"

"घटनांच्या स्तरावर हा प्रश्न व्हॅलिड आहे, हे आधी पाहायला हवे --"

"अति-अवघड प्रश्न ! पण जगण्यातली ॲब्सर्डिटी समजावून देणारा !"

"आणि नॉन-व्हेज असेल तर मीही येतो --"

"माणसाचे मनच भाषामय आहे -- भाषेचे काही सत्य गवसणे हे मनाचेही सत्य असेल !"

"भाषा अशी खोलून पाहण्याच्या या छंदातून न जाणो जगण्याचे एखादे सत्यच बाहेर येईल !"

"होय -- एरवीच्या मनाला ते दिसतच नाही -- अकल्पितपणे ते समोर आल्यावर श्रोत्याचेही भान विस्तारते -- त्याचा आनंद होतो --"

पाऊस

"आक्रमणानंदप्रक्रिया !"

"मी आणि जग या मूलभूत विभाजनावरच काम आधारायचे ही मनाची कॉमन रचना असते, मग प्रत्येक व्यक्ती कितीही वेगळी असे ना का ! चांगली कला हे विभाजन नाकारून जगण्याचा पूर्ण आवाका घेणारी असते. या निर्मितीत एकूण भानच अमर्याद झालेले असते. त्यामुळे विभाजनाधारित संकुचित मनापेक्षा इथले दर्शनच वेगळे असते. हेच मूल्य !"

"ही काय भानगड आहे ? जरा नीट सांगा ना !"

"तरफ दिली तर पृथ्वी उलथवीन, या वाक्याप्रमाणे, ही कवितेची तरफ !"

"मला एक प्रश्न पडतो -- नाव हे फक्त मर्यादित गोष्टीला देता येते -- म्हणजे, दत्त, शंकर, विष्णू ही काहीतरी मर्यादित तत्त्वे असणार -- शिवाय त्यांच्यातले देवत्व अमर्याद असेल, तो प्रश्न नाही -- पण प्रत्येक मर्यादित गोष्ट तर नष्ट होते -- आणि अमर्याद तत्त्वाचा अवतार म्हणण्यात अर्थच नाही -- त्यामुळे, अवतार ही कल्पना सदोष, अशक्य आणि बनावट नाही वाटत का ? की याचे काही वेगळे स्पष्टीकरण आहे ?"

"बाकीचे थोडे थोडे ठीक आहे पण अवतार म्हणजे काय, हे खरेच मला समजतच नाही --"

"कायदा कसा गाढव असतो, एका शब्दामुळे कशी केस फिरते, ते पाहिलेले असल्याने -- थोडी सोय -- याचा उपयोग करायची वेळ माझ्यावर येण्याची अजिबात शक्यता वाटत नाही --"

"एक मित्र म्हणाले, हे करणे बरे, केले -- हे केले नव्हते ते चुकले होते, असे होऊ नये म्हणून -- व्यावहारिक शहाणपणाचा प्रयत्न !"

"अस्मितेत थोडाफार ग्रुपिझम असतो -- अलगतावाद आणि उदात्तीकरणही असते -- त्यामुळे हमखास संघर्षाची आणि हिंसेची बीजे असतात --"

"हीच पद्धत आम्हीही बराच काळ वापरली -- कधी महिन्याचे शेवटचे एकदोन दिवस रद्दी विकून आलेल्या १०-२० रुपयांवर घालवले -- पण रूटीन खर्चासाठी कधी कर्ज काढावे लागले नाही -- माझ्या एखाद्या कवितेचे १०-१५ रुपये येत, तेही नियतीची मदत वाटत !"

"विजय-पराभव असले काही नाही हो विजयजी ! इथे फक्त विषयाच्या वेगवेगळ्या बाजू समोर याव्यात, इतकेच ! मी तरी इथे जिंकण्या-हरण्याचे काही डोक्यातच ठेवत नाही. मैत्री महत्त्वाची आहे, कोणताही राग बाळगू नये, ही विनंती. मराठी ही जगातली २३ नंबरची भाषा आहे -- यावरून प्रतिनिधी कोण, असे बोलले गेले, इतकेच."

"सार्त्र, काफ्का, पुल आणि वपु !"

"' वेटिंग फॉर गोदो ', ' सिक्स कॅरॅक्टर्स -- ', ' हॅम्लेट ' यांच्याबरोबर आपली -- ' लग्नाची बेडी ', ' वाहतो हो दुर्वांची जुडी ' आणि ' अश्रूंची झाली फुले ' -- ही नाटके ? आणि मराठीतले दोन सर्वोत्कृष्ट लेखक कोणते -- पुल आणि वपु ? व्यक्तिगत असूया, मत्सर हेही असेल काहींना असे समजू -- पण असे काही नसलेल्यांचे काय आहे म्हणणे ?"

"जगातल्या जास्तीत जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांत मराठीचा १५ वा नंबर आहे. प्रत्येक भाषेतली तीन सर्वोत्तम नाटके सांगावीत, असे ठरले तर मराठीतली कुठली सांगणार -- जास्तात जास्त प्रयोग झालेली ? ' एक शून्य बाजीराव ' सारखे नाटक तर १०-१२ प्रयोगांत आटोपले होते !"

"जे शहाणे आहेत त्यांनाच शहाणे राहणे भागही पडते, ते असे !"

"एक ढोबळ ( यालाच सूक्ष्म म्हटले तरी चालेल ) उदाहरण -- फलाशा न धरता कर्म करावे !"

"काही मानलेले असणे आणि प्रत्यक्ष वागताना त्याच्याशी जुळवून घेत राहणे हा संघर्ष सतत सुरू असतो -- दोन्ही पूर्ण एकरूप कधी होत नाहीत. खूप सवयीने आणि सततच्या दडपणाने समजा ते दोन्ही एकरूप झाले तर त्याचा अर्थ मनाचा तो भाग डेडच झालेला असतो. अशा डेड मनाच्या ' पूर्ण ' नैतिक व्यक्ती मग इतर जिवंत मनांच्या ( म्हणजे वरील संघर्षवाल्या ) व्यक्तींवर संतापत राहतात. ' मानलेले ' बरेच जण ' मानतो ' असे दाखवत असल्याने, या संतापावर कुणीच फारशी प्रतिक्रिया देत नाहीत, उलट, पाठिंबाही दाखवून मोकळे होतात !"

"माझी वरची कॉमेंट इथे जरा दुरून आणि थोड्या प्रमाणात लागू पडतेय -- पण मन, वागणूक, नीतीअनीतीचे गोंधळ वगैरे प्रकारचे प्रश्न असलेल्या बऱ्याच ठिकाणी ती फिरवता येऊ शकेल."

"आपले वागणे ठरण्यासाठी मनाशिवाय दुसरा स्रोत नाही, असे असल्यावर, खरे, खोटे, प्रामाणिक, अप्रामाणिक, निष्ठावान, व्यभिचारी, सांस्कृतिक, असांस्कृतिक, सभ्य, असभ्य -- हे सगळे गुण-अवगुण जगण्यात असणार -- या ना त्या नात्यात -- या ना त्या क्षेत्रात. या गोंधळातून मार्ग काढत, आपल्या अपेक्षेप्रमाणे आपले जगणे घडवण्याचा प्रयत्न करणेही त्यातच आले. एका व्यक्तीला जे बरोबर वाटते तेच तसेच बरोबर वाटणारी दुसरी व्यक्ती असू शकत नाही. शक्य तो यातून सावरत चालणे, हे सर्वांनाच करावे लागते. एकाला वा अनेकांना मान्य असलेली कोणतीच पद्धत एकाच्या वा कुणाच्याही जगण्यात असू शकत नाही. मन द्वंद्वात्मकच असणार -- त्यासहच जगावे लागणार. एक सर्वमान्य पद्धत अशक्य."

"स्वतःचे मरण पाहिल्याशिवाय जगणे समजत नाही, हा मला तुकारामाच्या ' आपुले मरण ' चा अर्थ वाटतो. जगणे न समजणे म्हणजे आपल्या किरकोळ व्यक्तिमत्वाच्या सुखदुःखांत आणि क्रियाप्रतिक्रियांत आयुष्य संपवणे. सखोल साहित्य जगण्याचा मोठा आवाका देते."

"पुनःप्रत्ययात त्याचे आहे ते व्यक्तिमत्व घट्ट करून मिळते, उलट सखोल साहित्य त्याचे व्यक्तिमत्व डळमळीत करते ! या अर्थाने, सखोल साहित्याच्या नादी लागणे म्हणजे मृत्यूलाच सामोरे जाणे ठरावे !"

"नकोशा, नावडत्या किंवा टाळायच्या विषयावर सतत विचार, मुख्यतः काल्पनिक विचार, करणे, हे याला कारणीभूत असावे, असे दिसते."

"पण सगळी रावणाचीच ना ? आणि त्याचे एक सेंटर असल्याची नोंद नाही !"

"एक मेंदू माणसाला इतका भ्रमिष्ट आणि वेडा करू शकतो तर रावणाचे काय होत असेल ?"

"लोक मेले पाहिजेत -- मर्डर होण्याचे त्यांना समाधान वाटले पाहिजे -- अशा उत्सवात कवट्या फोडणे कायद्यात बसले पाहिजे --"

"बऱ्याच गोष्टी जनुकनियंत्रित असतात असे म्हणतात -- तसे असेल तर अमुकतमुक जन्मावा लागतो, हे खरे म्हणता येईल. पण कारण-परिणामांची हीच प्रक्रिया व्यापकपणे पाहिली आणि प्रत्येक गोष्ट सगळ्या गोष्टींवर आणि सगळ्या गोष्टी एकमेकींवर परिणाम करतात, असे पाहिले तर सगळे जन्महीन आणि मृत्युहीन एकत्रच जगते, असे म्हणावे लागेल !"

"इथेही समग्रावधानी तत्त्व -- या निमित्ताने या बाबतीतले अनेक मुद्दे समोर आले ! या अर्थाने ही चर्चा फलद्रुप झाली असे म्हणू. "

"प्रत्यक्ष निर्मितीच्या वेळी कलावंत समग्रावधानी आहे का, हे महत्त्वाचे. तो सतत तसाच जगतो का, हा वेगळा प्रश्न आहे. कधी अस्मितेचे जगणे, कधी समग्रावधान, असे शक्य आहे पण एकाच क्षणी मन अस्मिताकेंद्री आणि समग्रावधानी -- असे दोन्ही असणे शक्य नाही."

"मी या तीनच रत्नांचा उल्लेख केला म्हणजे आणखी नसतील असे नाही. मीही खूप कविता लिहिलेल्या असून एक रत्न मीही असू शकतो. आणखी कुणी असतील. ते ठीक आहे. स्वतःच्या आवडीनिवडी, रागलोभ, विचारसरण्या, अस्मिता यांच्या मर्यादेत लिहिणारा समग्रावधानी नसतो, असे इथे म्हणायचे आहे. समग्रावधान म्हणजे अंतराळयानात बसून मंगळावरही जाण्याचे अवधान, असे नाही. अस्मिताकेंद्र नसलेले भान म्हणजे समग्रावधान आणि तेच फक्त मूल्यात्मक असते, असे म्हणायचे आहे. चांगली मौल्यवान कला माणसाला या समग्रावधानाची शक्यता दाखवून देते."

"नाही, अविनाश, त्या मेंदू आणि काळीज यांच्या जुन्या रोमँटिक मार्गाचा फारसा उपयोग नाही. तांबे म्हणतायत तो शौकीनमधला उथळपणाचा टच जरा योग्यच वाटतोय --"

"तांबे म्हणतायत ते बरोबर आहे -- भाषिक कृतीचे शौकीन आणि आशयाचे प्रतिनिधी -- हे शब्दसमुच्चय मला इथे बोलता बोलताच सुचले आणि ते बरोबर आहेत, हे नंतर लक्षात आले. कुणा अभ्यासकाला हे पटले तर हे पुढे डेव्हलप करायचे त्याने पाहावे. आपण सगळे एकत्र जगतो -- असेच या कामाकडे पाहिले जावे."

"अविनाश , होय, तुम्ही मांडलेले गणित माझ्या म्हणण्याशी मिळतेजुळते आहे. ज्यांची मूल्यव्यवस्था गटनिहाय -- टोळीनिहाय असते ते स्टेटस को वाले -- आहे ते चालू ठेवण्याचे पुरस्कर्ते असतात. त्यांचा विषमता-विरोध बेगडी असतो."

"अजिंक्य, माझ्या ग्रेसफुल पण ( भगवानभरोसे ) सीमापार बॅटिंगला दाद दिल्याबद्दल धन्यवाद !"

"एकविध मन आणि अनेकविध ( विदीर्ण ) मन यांचे मिश्रण म्हणजे काय ? किंवा वेगळ्या भाषेत -- सत्य आणि असत्य यांचे मिश्रण केल्यावर काय तयार होईल ?"

"आमचे घराणेच शिक्षकी पेशाचे आहे -- त्या ब्रीदाला जागून, आपल्याला समजत नसलेलेही दडपून खात्रीने बोलणे, हे मी करत असतो -- सावध राहावे, ही विनंती !"

"अविनाश, मिश्रण शक्य नाही, असे मी वर म्हटलेले आहे -- वेगळी मतेही असतील --"

"हाच तर तुम्हा मंडळींचा प्रॉब्लेम आहे -- आकलन म्हणजे फक्त बुद्धी, असे समजणे !"

"आपापल्या आकलनाशी गद्दारी करणारे आम्ही नाही, हाच तर आमच्या मैत्रीचा पक्का पाया आहे !"

"तुम्ही स्वीकारलीत की माझी विनंती ! ते काम झालेले आहे ! आता तुम्ही मला फ्रेंड म्हणून दाखवले जात आहात !"

"असे काही नाही हो सर ! तुम्ही ? प्रचंड बिघडलेले ? असे मी म्हणायचे ? शक्य नाही. आपण आपापल्या परीने एकूण भल्याचाच विचार करतो आहोत -- पोचूही कदाचित दोन विरुद्ध ध्रुवांवर ! पण एकमेकांबद्दल फिक्स मते न बनवता संवाद साधत राहू. तुम्ही इथे सर्वांशी संवाद साधणे खरोखर समृद्धीदायक आहे !"

प्रत्येक कवी हा विशिष्ट कवी असतो, हे मी नाकारतच नाही. तुकारामही विशिष्ट कवीच होता. पण त्याने सांगितलेला एकविध मनाचा आशय ( मी धर्म वा अध्यात्म हे शब्द वापरत नाहीय ) डावलून, आपण इतरांबरोबरच आहोत असे

भासवण्यासाठी, दुसऱ्याच कुठल्यातरी कारणांनी तुकाराम महत्त्वाचा होता, असे म्हणणे, हे बुद्धिनिष्ठांना आणि बुद्धिबांधीलांना भाग पडते -- तसे होऊ नये. कारण ' एकविध मन ' हा आशय त्यांना कळू वा पटू शकत नाही. बुद्धिबांधील मन हे फक्त विश्लेषणात्मक आणि गटहिताचाच विचार करू शकते, याला हवे तर दुर्दैव म्हणावे, पण हे खरे आहे. जगण्याचा एकात्म आवाका असूच शकत नाही, असे मानणे हे सर्व हिंसा मान्य करणारे आणि अति-निराशावादी निष्कर्ष स्वीकारणे असते. हे तीन कवी असा एकात्म आवाका घेण्याची प्रक्रिया व्यक्त करत असल्याने मला महत्त्वाचे वाटतात.

"सर, ज्या अर्थी मराठी कवीपरंपरेतून हे तीन कवी काही समान कारणामुळे, वेगळे आणि महत्त्वाचे असल्याचे आपण मान्य करतोय, त्या अर्थी आपण दोन ध्रुवांवर उभे असण्याची शक्यता मला कमी वाटते. कदाचित एकमेकांत काही मुद्दे स्पष्ट झालेले नसावेत."

"माझे सेंट्रलाईट मित्रवर्य ! रोज भेटणारा चांगला मित्र !"

"माझे म्हणणे जे आहे त्यावरच आधी बोलावे -- काल्पनिक नकोच -- सगळेच विदीर्ण-- फ्रॅगमेंटरी असते हे मान्य असेल तर मूल्याची भाषा ढगात जाते --"

"योग्य काय हा नेहमी नंतरचा प्रश्न असतो -- नाकारायला काय हवेय ते आधी ठरवावे -- अध्यात्म नको, चिद्वाद नको, अद्वैत नको -- हे ठीक -- आधी तुम्ही जे मान्य करताय ते नाकारायची गरज पाहायला हवीय --"

"मी सर्जक लेखनाला महत्त्व देणार -- आयुष्यभर नोकरी वेगळी करत इथे जगणे भाग होते -- मी प्रश्न उपस्थित करणार -- तेही इंप्रेशन्सवर -- खूप विद्वत्ता, नोटस हे माझ्याकडे नाही -- सैद्धांतिक मांडणीही मीच का करावी ? आपण सगळे मिळून एकत्र जगतो आहे ना ? मग माझे काम मी करत राहीन --"

"नेमके कशाचे अवधान -- या प्रश्नातच एक बौद्धिक / मर्यादित अपेक्षा व्यक्त होते आहे. मन आणि बुद्धी किती प्रकारे नुसती अपुरीच नव्हे तर निरुपयोगी असते, हे अनेकदा मी इथे दाखवून दिलेले आहे -- एक साधा प्रश्न आहे -- मानवी मूल्य हे समावेशक असते की गटनिहाय वेगवेगळे असते ? कंडिशनिंगवाल्यांची तरफदरी करणारा तुमचा प्रकार दुसरा असावा. यात सर्व हिंसा, अत्याचार, अन्याय, विषमता - हे मान्य करावे लागेल ! मग कसले दगडाचे परिवर्तन आणि कसली मूल्यात्मता !"

शौकीन आणि प्रतिनिधी असे वाचकांचेही प्रकार असू शकतील -- पण या प्रश्नात एक मेख अशी आहे की हे प्रकार मानल्यामुळे हे दोघेही तुकडे ठरतील आणि मुख्यतः प्रतिनिधी आपला अर्थ गमावून बसतील. शौकीनमध्ये आणखीही तुकडे शक्य आहेत -- जसे -- स्त्रीवादी, दलितवादी, समसंभोगवादी, विषमताविरोधी, शिवाय प्रेमकविता आवडणारे, अतिवास्तववादी कविता आवडणारे, वगैरे. शौकीन-विभाग हा कंडिशनिंग प्रक्षेपणाला महत्त्व देणारा असल्यामुळे ढोबळ मानाने कंडिशनिंगचे जितके विभाग करता येतील तितकेच विभाग वाचकांचेही असतील. प्रतिनिधी-विभाग हा तसा तुकडा मानता येत नाही कारण व्यक्तिगत आवडी वा मूल्ये यांचे ओझे तो घेत नाही. तो ओपन, समावेशक -- समग्रावधानी असतो. या अंगाने कवितेकडेच काय, एकूणच कलेकडेही पाहणे टाळण्यात आलेले आहे -- त्यामुळे भलतेच तुकडे युगपुरुष म्हणून मराठीत माथी मारले गेलेले आहेत. गटांच्या, टोळ्यांच्या आरक्षणातून आलेले असे हे युगपुरुष आहेत.

"आपले तथाकथित अमर कवी तरी किती कवितांवर टिकून आहेत ?”

"नमस्कार, सर ! आपल्या इथल्या भेटीचा आनंद आहे ! माझी आपल्याला पाठवलेली फ्रेंडरिक्वेस्ट अनिर्णित आहे -- तिचा स्वीकार व्हावा, ही विनंती ! आपण आस्थेने ( कौतुकाने म्हटले तरी मला चालेल ) उपस्थित केलेल्या प्रश्नांबद्दल लौकरच मी माझी क्लॅरिटी मांडेन. इथे माझा काहींना धाक वाटतो, असे काही फ्रेंडस म्हणतात -- मला तुमचा धाक वाटतो, हे नम्रपणे कबूल करायला मला संकोच वाटत नाही. धाक आहे पण भीती नाही, अशा आपुलकीतून बोलणे छानच होईल."

"बीज भाजून केली लाही । जन्ममरण आम्हा नाही ।। -- तुकाराम. -- हे सोपे आहे की प्रतिमांनी माखलेले आहे, ते सांगा."

"स्वतःच्या अनुभवाचे, विचारसरणीचे स्तोम माजवणारी / उदात्तीकरण करणारी कविता ती शौकीन कविता. ती कविता माणूस-विमुख, आत्मकेंद्री असते."

"रममाण होणे, गुंतून पडणे, मर्यादित / संकुचित असणे -- असे कुठे असते ते बघा, म्हणजे कोणती मांडणी शक्य आहे, ते दिसेल --"

"**आशयाचा प्रतिनिधी** म्हणायचे कारण तो व्यक्तिगत प्रतिक्रिया देत नसतो -- आता तुमच्या लक्षात येईल की मिश्रण शक्य नाही --"

"आता विचार करा -- याहून जास्त काही नाही -- शौकीन हा शब्द रममाण होणाऱ्यांसाठी असतो, एवढे पाहा --"

"अनुभवाच्या क्षेत्रात फिरणारे, प्रतिक्रिया देणारे, भूमिकावाले, मूल्य अथवा श्रेयस ही बौद्धिक आणि मतमतांतरांची गोष्ट असते, असे समजणारे आणि या सगळ्याला अभिव्यक्ती देण्यासाठी भाषा कमावलेले -- ते भाषिक कृतींचे शौकीन, आणि स्वतःसह सगळी रचनाच आवाक्यात घेऊ पाहणारे, काहीही गृहीत न धरणारे, निष्कर्ष नसलेले, जगण्याचे भान हेच मूल्य मानणारे -- ते सगळे आशयाचे प्रतिनिधी !"

"भाषिक कृतीचे शौकीन वेगळे आणि आशयाचे प्रतिनिधी वेगळे !"

"वेडपट म्हणालात तरी मला फरक पडत नाही -- माझे मत सांगतो -- केशवसुत, आरती प्रभू आणि रा. वा. कदम असे तीन मला महत्त्वाचे वाटतात. मी हे, सुर्वे, चित्रे, ढसाळ, कोलटकर आदींना लक्षात घेऊन म्हणतोय !"

"' कवितेतील अ-भाव ' या, माझ्या, पूर्वी ' सत्यकथे ' त आलेल्या लेखात मी ही कविता पूर्ण उद्धृत केली होती."

"या कवीकडे दुर्लक्ष होणे हा मराठीच्या सांस्कृतिक करंटेपणाचा पुरावा आहे."

"मन निर्बुद्ध असल्याचे कळणे फार महत्त्वाचे आहे. नाही तर, हे समजून घेण्याचे मन हे साधन नसूनही तेच सतत हाणत बसून रक्तबंबाळ होण्याचा कार्यक्रम चालू राहतो. मन नाही -- तर काय ? याला बौद्धिक उत्तर संभवत नाही. मनाचे प्रयत्न क्षणभर थांबू शकले तरच काही कळू शकेल."

"मानवी जगण्यातल्या प्रश्नांबाबतची कुठलीही -- ही चाललीय अशी -- नीट चर्चा, ही शेवटी ॲब्सर्डिटीकडे जाते, हे निर्बुद्ध बुद्धिप्रामाण्यवाद्यांना कधी कळणार, कोण जाणे !"

"दारू प्यायला लागेलच, पण मापात प्या -- किंवा मानसोपचारतज्ञ सांगतात तसे -- टेन्शन हवेच पण ते मापात ठेवा -- असे होतेय हे ! जणू काही सगळे आपण ठरवण्यावरच असते !"

"निर्देश फक्त, संबंधाचे स्वरूप -- इकडेच आहे."

"दोष वगैरे नाही रे, आपण यातच कसे आणि का अडकून पडायला तयार होतो, हा प्रश्न आहे."

"अनाकलनीयता आणि अपरिहार्यता गृहीत धरायला तयार असणे, म्हणजे काय ?"

"अजिंक्य, फक्त शब्द बदलतोयस, नीट बघ."

"अजिंक्यच्या मते या गोंधळातच कसे जगायचे, एवढाच प्रश्न दिसतोय. आणि संजय कदाचित स्वतःला बधीर, डेड करून घेणाऱ्या माणसाबद्दल बोलतोय."

"मिथिला, ' इंटुक ' हा शब्द मला भूषणावह वाटत नाही -- ' लै भारी ' म्हणताय त्यावरून तुम्हाला काही चांगले बोलायचेय, हे कळतेय -- पण, प्लीज, ' इंटुक ' ऐवजी दुसरा एखादा वापरा ना शब्द !"

"कालच गणेशबरोबर थोडा वेळ प्रत्यक्ष भेट झाली ! मानसशास्त्रज्ञांनी शिक्के न मारलेले असे जे काही वेडे मराठीत असतील त्यांतला हा नंबर एकचा वेडा माणूस आहे ! भन्नाट कल्पना ! मीही त्या वेड्यांत गणेशबरोबर आहेच !"

"रवी, त्या नाटकाचे थोडेफार पुनर्लेखन केलेले असून आता त्याचे नाव ' गोळ्या काढलेले पिस्तूल ' असे आहे."

पन्नास कविता

"त्या पन्नास पोचल्या की नाही, ते माहीत नाही आणि ही तरी पोचेल का, हाही प्रश्नच आहे ! स्वतःमध्ये स्थापन केलेल्या प्रतिमेशीच संवाद जणू ! -- हे आभासी असेल तर सत्य काय ?"

"समजुतदारांकडून धोका नसतो, भय डासांचेच असते पण डासांनाही दोष देता येत नाही, ही त्यातली मेख समजायची ! या गंमतीसह शुभेच्छा !"

"वाचन सुरू केले ना ? हे सुधारणेचे बिनचूक लक्षण आहे --"

"म्हणजे सुधारणा होते आहे -- शुभेच्छा सांगा !"

"अरे, ते काही लिहिताहेत असे इथेच कळले होते -- हे काय मधेच ! ' लौकर बरे व्हा ' -- हा माझा निरोप कृपया कुणीतरी त्यांना द्या !"

"रोकडेजी, लाख प्रकारांनी जग चालत राहणार -- मी किंवा तुम्ही म्हणता त्याला काय महत्त्व आहे ? आपल्याला महत्त्वाचे वाटणारे काम आपण करत राहायचे. आज एखाद्याला एखादी गोष्ट कळत नाही म्हणून कुणाला कंडेम करावे, हे मला मुळीच पटत नाही. तसे तर हजारो गोष्टी मलाही कळत नाहीत. तुम्हाला नेमके काय खटकतेय ?"

"सुनील, -- कालच्या माझ्या ‘ निरोपा ‘ नंतर बऱ्याच फ्रेंडसची मते-सूचना मिळाल्या. त्या लक्षात घेऊन ही पुरवणी -- ही पहिली ओळ जर तुम्ही वाचली असतीत तर बरे झाले असते. पण या विश्वात आपण नगण्य आहोत, हे तुमचे म्हणणे मला मान्यच आहे. तरीही आपण जगतो, मते मांडतो, प्रेम करतो, रागावतो आणि मुख्य म्हणजे समजून घ्यायचा प्रयत्न करतो की, काय आहे ही जगण्याची भानगड ! -- त्य सगळ्यासारखेच, त्याचाच भाग असे, हे आहे. पण हे निरर्थक असण्याची तुम्ही व्यक्त केलेली शक्यता मला मान्य आहे."

"स्वाती, ही बरी माहिती दिलीत -- अकौंट एक्सपायर होऊ देणार नाही -- आणि इतक्या फ्रेंडसची संपत्ती मी बरा सोडून देईन !"

"दीपक, सलील हा आजचा एक महत्त्वाचा कवी आहे -- तो नक्कीच तुम्हाला सांगेल तो असे का म्हणतोय --"

"टोकाच्या गुंतागुंतीच्या अति-त्रासदायक मानसिक अवस्था म्हणजे वेडच ! चांगल्या लेखकाला मानसिक गुंताडे आणि मनोव्यापारांची भयानकता अनुभवाने माहीत असते, असे म्हणायचे आहे."

"थत्तेजी, पांढरा रंगही काळाच असतो, असे म्हणण्यासारखे तुमचे बोलणे वाटते !"

"भटक्या मी, तुमच्या कॉमेंटला मनःपूर्वक दाद !"

"अशांत मनाला शांत करण्याच्या प्रत्यक्ष ऐच्छिक प्रयत्नाबद्दल मी बोलतोय."

"स्वातंत्र्य म्हणजे मी माझ्या इच्छेने मनाला पकडून, जखडून सक्तीने शांत करायचा प्रयत्न न करणे --"

"सर्व फ्रेंडस, या उत्तम चर्चेबद्दल धन्यवाद !"

"युसुफजी, तसे झाले असेल तर दिलगीर आहे. माणसाला खूप त्रास देणारी ही एक अवस्था आहे आणि त्यातली हमखास होणारी एक चूक निदर्शनाला आणवी, या हेतूने हे स्टेटस दिले आहे."

"अजिंक्य, अगदी बरोबर. सगळी कारणे-परिणाम -- सगळे एकत्रच असते -- मन मात्र विश्लेषणात्मकतेने एकेक प्रश्न सोडवू पाहते. एका क्षणात हा गोंधळ मिटू शकतो का, हा प्रश्न समोर यावा पण मनाने -- बुद्धीने ताडकन ' नाही ' म्हणणे स्वीकारू नये."

"निराकरण म्हणजे -- आता प्रश्न अस्तित्वात नाही -- असे होणे."
"पण, मनाचा निर्णय या स्वरूपातली कृती का ?"

"आभास, इथे, कृती म्हणजे काय, हेही यायला हवे."

"मते, विचारसरण्या, आदर्श -- अशा बाबतींत हेकटपणा करणे हे हिंसकच असते !"

"चित्रा जोशी, तुमचे म्हणणे मुळीच कळले नाही --"

"शब्दकोशात ' विश्वास ' म्हणजे भरवसा, खात्री -- असे आहे. आणि ' विश्वासघात ' म्हणजे विश्वास दाखवून फसवणे."

"की या त्रासातून सुटका असूच शकत नाही, असा निष्कर्ष काढावा ?"

"संतपदाला न हेटाळता एक वस्तुस्थिती म्हणून हे कसे पाहावे ?"

"एखाद्याची जगणे समजण्याची प्रक्रिया चालू आहे पण तो ती एखाद्या फॉर्ममधून व्यक्त करत नाहीय -- म्हणजे कॅलिबर आहे -- बास झाले !"

"Awareness is all !"

"पहिल्या ओळीत चुकून ' सुमार ' प्रतिभेचे -- झाले आहे. मुग्धा  यांच्यासारख्या, कविता आत्मीयतेने समजून घेणाऱ्या व्यक्ती निश्चितच मराठी भाषेचा जीवनस्रोत आहेत ! भाषेच्या अंतरंगात शिरण्याची अशी आवड असणारेच भाषेची शक्ती वाढवतात. अभिनंदन आणि शुभेच्छा !"

"माझा सात्त्विक की काय तो राग तुमच्यावर व्यक्त करायचा मला हक्क आहे, असे मी समजतो -- आणि फटाफट नकोत प्रयोग पण प्रचंड गॅप न पडता तरी व्हावेत ना प्रयोग -- आणि व्हावेत तरी !"

"मागे वरती एक विचारवंताचे चित्र दिसते आहे, तो कोण आहे ?"

"शाल्मली, आपण द्वंद्वात असतो -- एक कुठली तरी बाजू प्रभावी होते आणि त्याप्रमाणे वागणे घडते -- त्याच्या परिणामांतून जावे लागते -- ' माझे एक मन नको म्हणत होते ' हे बाहेर कुणाला सांगून उपयोग होईल वा न होईल !"

"इथेच लाख्यांनाही एक मित्रत्वाचा सल्ला देतो -- तुमची सर्जकता आणि वेळ तुम्ही या रद्दडपणाकडे चाललेल्या संस्थेत वाया घालवू नये, असे मला वाटते. दुसरा काही मार्ग नसेल तर तुमचे वाचन-लेखन बघा. हेच सगळे मला खाजगीतही बोलता आले असते, पण विचारपूर्वक इथे बोललो आहे."

"भूतकाळ जाऊ द्या, वर्तमानात जगू या -- असे ठरवून काही होत नाही. मनाच्या दुभंग अवस्थेला ते शक्यच नाही -- ते ' वर्तमानात जगू या ' असे म्हणण्याची फक्त एक ट्रिक करते !"

"मकरंद, जरा मनातली खरी कॉमेंट देतो -- रागावू नकोस ! तुम्ही सगळे ढेपाळलेले लोक वाटायला लागले आहात. ' पगला घोडा ' हे नाटक बसवून, त्याचा पहिला प्रयोग होऊन काही महिने होऊन गेले असतील ! मीही त्याचा पुण्यात प्रयोग होण्याची वाट पाहतोय. ' वस्तू ' चेही तसेच झाले. ' लोकसत्ते 'त एवढे मोठे परीक्षण येऊन गेल्यावर एकही प्रयोग होऊ शकलेला नाही. तुमची कारणे सगळी बरोबर आहेत, पण महिनो न महिने तालमी करण्याचे कष्ट तुम्ही कशासाठी घेता ? ' मिती चार ' चा अवतार संपत आला आहे, असे मला वाटते. याची खंत करायचा काळही नाही -- किती मोठमोठ्या संस्था बंद पडताहेत !"

"स्वाती, मन त्या धड्याचाही एक आदर्श करून त्याविरुद्धही वागू शकते ! खात्री नाही ! आणि विरुद्ध वागायची इच्छा असून ती दडपून त्या धड्याप्रमाणे वागणे, हेही खरचटवतेच !"

"आणि विनायकजी, सगळे आजारीच आहेत -- मानसशास्त्रज्ञ हे ठराविक मर्यादेपर्यंत सूट देतात --- त्यला आजार म्हणत नाहीत, एवढेच ! कल तिकडेच !"

"भीतीग्रस्त असणे हे त्या बिंदूचे वैशिष्ट्य दिसते -- सुखदुःखांच्या हालचालींनी भीती वाढते --"

"त्या बिंदूच्या अनपेक्षित हालचाली बीपी वाढवू शकतात, ऍटॅकही आणू शकतात."

"अतिरेकी दुःख होऊ शकणारी अशी कोणती रचना वा वस्तू वा बिंदू आपल्यात आहे ? त्याच बिंदूला अतिरेकी सुखही होऊ शकते. तो बिंदू मर्यादित शक्तीचा असतो. सुख भोगायलाही लागणारी शरीर-मन यांची शक्ती मर्यादित असते. त्यामुळे, न पेलणारे दुःखच फक्त असते असे नाही तर न पेलणारे सुखही असते. पेलणाऱ्या सुखदुःखांचे उदात्तीकरण अनेकांना आवडते, त्यामुळे अतिरेकी उदाहरण घेतले आहे. मुख्य मुद्दा सुखदुःखाचा नसून त्या मर्यादित शक्तीच्या बिंदूचा आहे. आणि तथाकथित बॅलन्स्ड जगणे तर शक्य दिसत नाही !"

"मुळात मला पडणाऱ्या सगळ्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे मला शक्य नाही कारण मी सर्जक लेखनालाच महत्त्व देत राहतो. पण प्रश्न असे -- नेमाडे वा त्यांची एखादी कलाकृती अस्तित्ववादी आहे का ? याचे नुसते होकारार्थी उत्तर पुरणार नाही -- अस्तित्ववाद म्हणजे काय, हेही सांगायची जबाबदारी घ्यावी लागेल. अस्तित्ववादी धारणा वा आकलन नेमाड्यांना महत्त्वाचे वाटते का ? की हे नुसते शब्द आहेत ? अस्तित्ववादात कशाला नकार असतो ? ' कोसला ' कशाला नकार देते ?"

"जातकुळी, शैली, वाक्यरचना, सटरफटरपणा, स्फूर्तिस्थान, अनुकरण -- हे सगळे विषय चर्चेत येणार -- हे ठीक. मी ' कॅचर इन द राय ' वाचलेली नाही त्यामुळे तौलनिक बोलू शकणार नाही. ' कोसला ' वाचूनही आता खूप वर्षे झाली. मला ही चर्चा वाचून एक प्रश्न पडला तो मूल्यात्मकतेचा. या दोन्ही कादंबऱ्यांचा ज्यांचा अभ्यास आहे अशांनी या दोन्ही कादंबऱ्यांच्या मूल्यात्मकतेबद्दल कुठे लिहिले आहे का ? मूल्यात्मकतेचे स्थान समीक्षेत सर्वोच्च राहिले पाहिजे, असे वाटते. ते का डावलले जात असावे ? या मुद्यावर समीक्षक बोलू लागला की ज्यालात्याला त्या समीक्षेचीही मूल्यात्मकता जोखता येते. हे घडायला हवे."

"गणेश, चार ओळींत खूप अर्थ कोंबतोयस, असे वाटते -- संपर्क अवघड होतोय --"

"सगळे जगणे -- माणसांचे, पशू, पक्षी, इतर निसर्ग -- असे एकमेकांवर परिणाम करत -- एकत्र चालते, असे म्हटले तर त्या घटना नोंदवायला वेगळे कुणी उरत नाही -- म्हणजेच, काहीही घडतच नाही, असा त्याचा अर्थ होतो !"

"यात भव्य-दिव्य काही नाही -- निसर्गाला कितपत वाव द्यायचा ते जे ते ठरवतील -- नाही तरी दुसरे काय शक्य आहे ?"

"बास -- करेक्ट -- चव्हाट्यावर एवढे ठीक -- पुढे ज्याचात्याचा अंदाज आणि कौशल्य !"

"आभास, आता तुमचं ग्रीव्हन्स सांगा --"

"होय -- पण थोडे इकडे-तिकडे तर होणारच -- खूप टाईट राहणे अवघड असते --"

"चव्हाट्यावर बुरखेधारी असले तरी आडपडदे नाहीत असे समजून मी ' चावट ' या शब्दालाही वाव दिलेला आहे !"

"आणि शून्य फ्रीडमवर मैत्री थोडीच असते ? थोडी छेडछाड -- किंचित -- असणारच !"

"इथे इतक्या मित्रमैत्रिणी आहेत की परवा आपण कुणाला काय म्हणालो, हे लक्षात राहणे अवघड आहे ! म्हणून फक्त !"

"सुजितचे तर म्हणणे आहे की सर्वांनी एकमेकांना अरेतुरेच म्हणावे ! वयनिरपेक्ष !"

"मनाचा एक भाग दुसऱ्या भागावर आणि स्वतःखेरीज असंख्य गोष्टींवर नियंत्रण आणण्याच्या / ठेवण्याच्या प्रयत्नात असतो. हे कधीच पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे, हे अतृप्तीचे दुखणे अटळ !"

"मद्यपाना आधी मराठी माणसाला वाटत असते की त्याला मराठी चांगले येते, मद्यपानानंतर त्याला वाटते की त्याला इंग्रजी चांगले येते ! दोन्ही कसे नीट करावे, ते सांगा !"

"शुक्लाजी, त्याचे कारण तुम्ही इथे विचारू नये, हे बरे ! थोड्या वेळाने एकच दिसेल !"

"--- If we also tend to be bright !"

"( गंमत चालत असेल तर -- ) आत्मज्ञानासाठी !"

"स्वतःची संगत टाळणे तर अध्यात्मिक झाले ! पोचलेले असणार तुम्ही !"

"' आणि मीही बदलत असल्याने माझे जे आज आहे ते उद्या नसेल ! '"

"'अनीह ' चा अर्थ शोधत न बसता, ' अन ' लागून हा विरुद्ध अर्थाचा शब्द तयार झाला आहे, असे पाहिल्यास, या जगातले नसलेले -- अलौकिक -- असा अर्थ दिसतो."

"भास्कर जाधव हे लेखक बहुतेक ॲडवोकेट होते -- मी एफबीवर एकदा या पुस्तकाचा उल्लेख केला होता. मी हे पुस्तक वाचलेले आहे. राम एकपत्नीव्रती नव्हता, मारुती ब्रम्हचारी नव्हता -- असे धक्कादायक सिद्धांत मांडणारे पुस्तक !"

"कंट्रोल प्लस करून पाहण्यासाठी लिहून बघत आहे. जमतेय खरे !"

"स्त्रीस्त्रीगणिक वेगवेगळ्या मर्यादा असल्याने पुरुष सतत कन्फ्यूज्ड जगत असतो !"

"मी हे सगळे न पाहता डिलीट करायची पद्धत पाडलेली आहे !"

"डरना मना है, जो डर गया वो मर गया -- असे पुष्कळ डायलॉग आहेत -- कुठल्याही डायलॉगवर कधीच पूर्ण विश्वास ठेवू नये --"

"अशा प्रश्नांना एकच उत्तर, एकच मेथड -- असे असू शकत नाही !"

"आपल्याला आवडलेले इतके तपशीलवार लक्षात राहणे आणि ते असे भरभरून व्यक्त करता येणे ! या लेखामुळे कौशलच्या या कार्यक्रमाबद्दलची उत्सुकता वाढली, हे निश्चित !"

"मी एक वाक्य म्हणत असतो -- कोणतीही कलाकृती परिपूर्ण असू शकत नाही पण तिचा आशय परिपूर्ण असू शकतो. शास्त्र, तंत्र हे सतत प्रगत होत असल्याने त्याला कधीच परिपूर्ण म्हणता येत नाही. जगण्यातला महत्त्वाचा भाग राहतो तो म्हणजे मानवी संबंधांचा. तिथे बुद्धी, अनुभव सगळे तोकडे, निरुपयोगी ठरते. त्यामुळे तोही सतत अपूर्णत्वग्रस्त असतो. मग, पूर्णत्व शक्य आहे का, असा प्रश्न येतो. इथे, बुद्धी आणि अनुभव घाईने निष्कर्ष काढून देतात की शक्यच नाही ! शोध न

घेता असा निष्कर्ष मान्य करणे ही नुसती मोठी चूकच नव्हे तर गडद निराशावाद आणि हिंसा यांना पोसणारे आहे, हे पाहायला हवे."

को हम ??

"हा प्रश्न पडणारी सोडून तू सर्व काही असतेस !"

भय इथले संपत नाही ( 63 )

"स्मिता, स्त्रीपुरुष भेदांबद्दल तुम्ही दिलेले कॉपी-पेस्ट उद्बोधक आहे. यातले सगळे तंतोतंत खरे असेल-नसेल, पण मनांचे वापरच किती भिन्न असतात, हे लक्षात घ्यायला हवे. समावेशक आकलनाची प्रक्रियाच सर्जक जगणे अस्तित्वात आणू शकेल."

"भ्रष्टाचार निर्मूलन, जागतिक हिंसा, प्रेमाचा अर्थ, नैतिकता, स्त्रियांना कसे आयुष्य हवे आहे, पुरुषाचे चांगले वागणे म्हणजे काय, पालकत्व म्हणजे काय -- हे मला सुचलेले काही विषय -- ज्यांवर मी लिहिणार नाहीय -- फ्रेंडससाठी सुचवलेले."

"या अंकाच्या मजकूरप्राप्तीसाठी एक इमेल आयडी जाहीरच करावा --"

" तो दीर्घांक कोणत्या आयडीवर पाठवू ?"

"सर्वच उत्तम ! १०० टक्के अनुमोदन !"

चव्हाटा दिवाळी अंक

चला तर लागा कामाला . ह्या आवाहनाच्या बरोबरच मी संपादनाची ' सूत्रे सरपंच + कारभारी' ह्यांच्या हाती सुपूर्द करीत आहे. धन्यवाद .

"सर्वच उत्तम ! १०० टक्के अनुमोदन !"

"वस्त्रहीन सत्यकविता ! ( ' सत्यकथा ' प्रमाणे ! )"

"आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाही ऐसा मनी अनुभव ।। -- तुकाराम. याचा अर्थ तुकाराम नास्तिक होता, असे सांगत एक विद्वान फिरत होते ! ' तुकाराम ' या चित्रपटातही या ओळी चुकीच्या अर्थाने वापरलेल्या आहेत."

भय इथले संपत नाही ( 63 )

“या चर्चेत एका महत्त्वाच्या मुद्याला नीट स्थान मिळत नाहीय, असे वाटते. आपण जात असताना नजरा आपल्याकडे वळाव्यात, आपण क्रॉस झाल्यावर माना वळवूनही पाहावे लागावे, असे स्त्रियांना वाटत नाही ? हे सुखाचे वाटते पण त्याचे संभाव्य दुष्परिणाम नको असतात. असेच चांगल्या-वाईटाचे मानसिक द्वंद्व पुरुषांच्याही मनांत असते. आत्मकेंद्रित जगण्याचा अग्नी तर आपण सगळेच फुलवत असतो. हा प्रश्न जणू काही बाहेर, दुसऱ्या माणसांत आहे, असे समजणे सोयीस्कर असते. एका बाजूला स्त्रियांचे कपडे कसे हवेत याचे नियम ठरवणाऱ्यांचा आपण निषेधही करतो आणि त्याच कपड्यांची भीतीही बाळगतो. प्रश्न बाहेर नसून आपल्यात आहे. आपले सतत मानसिक द्वंद्वात जगणे ! सुखासीनतेची बाजू निवडण्याने जसे आयुष्याचे नुकसान होऊ शकते तसेच नैतिकतेचा गंड करून जगणे आणि इतरांना कंडेम करणे यानेही होऊ शकते. अशा प्रश्नांची निर्मिती फक्त काही नराधमांमुळे होते, हा भ्रम आहे. सगळ्यांचे द्वंद्वात जगणे आणि आत्मकेंद्रित जगणे याला कारणीभूत आहे. कुणीतरी स्वतःकडे श्रेष्ठत्व घेऊन इतरांना सुधारण्याचा हा विषय आहे, असे मला मुळीच वाटत नाही.

"आपले व्यक्तिमत्व अशी आपल्याला ओळख देणाऱ्या मानसिक सवयी गळून पडणे हे असावे स्वतःला ओळखणे -- नाही तर माझ्याच एक भाग सोयीने, इच्छेने स्वतःची ओळख घडवत बसणार !"

नाती कशाला लागतात ??

"परफेक्ट !"

स्त्री पुरुष मैत्री ...व्हर्चुअल अथवा भौतिक...एक सुंदर संकल्पना...

"सुरक्षिततेच्या कल्पना, संबंधांचे आकलन, मानसिक गोंधळ -- अशा अनेक गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या वेगवेगळ्या असतात. एकाचे आकलन वा सापडलेली मेथड हे सारे जसेच्या तसे दुसऱ्याला अंमलात आणता येणारे नसते. तरीही, आपली एक मेथड सापडू शकते, हे स्मिताजींनी इथे दाखवून दिले आहे, हे विशेष आहे."

"आपोआप पूरच येतो --"

"म्हणजे स्वतःला त्रास न होता की दुसऱ्याला त्रास न देता ?"

"१०५०३ हा, जणू काही मला सगळे बिनचूक कळते, ही अफवा पसरवण्यासाठी दिलेला आकडा आहे. मनाने / बुद्धीने माणूस अंतर्बाह्य संघर्षमय आहे -- त्यामुळे हा आकडा इतका छोटा नसणारच ! पण, याच गोष्टींवर जग चालले आहे, असे म्हणणे आणि चांगले बदल व्हायला हवेत, असे म्हणणे यांचा मेळ कसा घालायचा, हा प्रश्न आहे !"

"मी ती मूळ जीएचर्चा वाचलेली नाही हे इथे सखेद नमूद करतो."

"अभिनयही करता की ही एक उत्स्फूर्त भावमुद्रा आहे ? खूपच बोलकी !"

"चर्चा ही जिंकण्याहरण्यासाठी नसून त्या त्या विषयाबाबत फ्रेंडसचे अनेकांगी भान वाढण्यासाठी आहे, असे पाहिले तर प्रश्न येऊ नये. नाही तर मग शेवटी विजयी गट उरेल आणि त्यांना आपसात चर्चा करत बसावे लागेल !"

"' अभिजात ' हि मूल्यात्मकता निर्दिष्ट करणारी संकल्पना आहे. प्रश्न हा आहे की ही मूल्यात्मकता भौगोलिक वा वर्गीय सीमांनी मर्यादित असते की नसते ? उत्तर-आधुनिक धारणेप्रमाणे वैश्विक, सार्वकालिक वगैरे काही नसते. म्हणजेच ' अभिजात ' ही एक बोगस संकल्पना आहे, असे त्यांना वाटते."

"युनिकोड -- देवनागरी -- सक्तीचे असावे. चित्रेही असवीत. संपादक मुक्रर होऊन अंकाचे स्वरूप या महिना-अखेर निश्चित व्हावे."

को हम ?
"एक ' अमर्याद ' वस्तू -- म्हणजे वस्तू नव्हेच ! त्याहून जास्त असे काही --"

"गोंधळ हा भूतकाळ आणि परिपक्वता वर्तमान ! -- हाच प्रवास !"

"आपण गोंधळलेले आहोत, हे समजणे, हेच तर परिपक्वतेचे प्रमुख लक्षण !"

"जायजांटिक अनुभव !"

"या याद्या प्रकरणामुळे झालेय असे की माणूस त्याच्या एकूण जगण्यात त्याची ९० टक्के शक्ती, आभास म्हणतात त्याप्रमाणे, तुंबड्या लावण्यात तर खर्च करत नाही -- ही शंकाच जोर पकडायला लागलीय !"

"सगळ्यांच्या याद्या एकत्र केल्या तर सगळ्याच व्यक्ती यांत समाविष्ट असण्याचा धोका दिसतोय ! एक सूचना अशी आलीय की बाकीचे जमेल तेव्हा जमो, आधी या याद्याच नष्ट केल्या पाहिजेत !"

"निरनिराळ्या व्यक्ती हा एकच आयटेम धरलाय -- तीही यादी काही हजारांत असली तरी जगाच्या मानाने छोटीच आहे !"

समजून घेणे....गीताई अध्याय सोळावा !!!

"Yes, I had read it."

"There are only bad people in the world -- more violent and less violent. The duality of good and bad in human mind makes all bad."

"अकाली वारलेला उदय म्हैसकरही होता."

"होय -- ते नाटक व्यावसायिकवर नेण्यात विनायक होता आणि माझ्या आठवणीप्रमाणे अरुण घाडीगावकरही होते. माधव वाटवे आणि आत्माराम भेंडे होते त्या नाटकात !"

" माझी माहिती दुरुस्त केल्याबद्दल धन्यवाद !"

"Satish Tambe, ' टवाळकी ' त मीही लिहिले होते. विनायक पडवळ हा माझा जिगरी दोस्त होता. त्यानेच माझी ' इतिहास ' ही एकांकिका गाजवली !"

"तुम्ही म्हणताय ते सगळे बरोबर आहे -- करून टाका, पुढचे पुढे बघता येईल --"

इंटीमसी कंट्रोल

"दोन्ही व्यक्तींच्या विस्कळिततेत सापडणारी अनकंट्रोलेबल संगती !"

समजून घेणे....गीताई अध्याय सोळावा !!!

"' हे अशक्य आहे ' असा शिक्का मारून हे रद्द करू नये, विचारात तरी घ्यावे --"

"माझ्या माहितीप्रमाणे मराठीत या आधी कोणताही इ-दिवाळी अंक निघालेला नाही -- याच वर्षी हा अंक काढला तर अशा पहिल्या अंकाचा मान ' चव्हाटा ' ला मिळू शकेल."

"नाव रजिस्टर करणेच योग्य होईल, म्हणजे दुसरे कुणी ते वापरू शकणार नाही."

"आपला इ-अंक असणार आहे का ?"

"किंवा तिसरा पर्याय -- मुलाखत कुठे आणि दीर्घांक कुठे या बाबतीत सतीश तांबे यांनी काळ्यांशी बोलून ठरवावे -- जे ठरेल ते चालेल -- ( मी तो मजकूर पाठवून बसल्यामुळे सध्या तेवढ्यापुरतेच बोलतो आहे. )"

"' वस्तू ' नावाचा माझा एक दीर्घांक आहे -- ज्याचे लाख्यांच्या ' मिती चार ' या संस्थेने प्रयोग केले -- तो इकडे छापता येईल -- तो कुठेही प्रसिद्ध झालेला नाही -- विचार व्हावा --"

"मित्रांनो, या अंकाची कल्पना नसल्याने मी माझ्या त्या मुलाखतीचा मजकूर फायनल झाल्यावर ' खेळ ' दिवाळी अंकासाठी पाठवून दिला आहे. काय करावे ?"

"विनायक, आभस बरोबर सांगताहेत --"

"असतीलही -- पण हे अध्यात्मिक -- हे काल्पनिक -- हे अशक्य -- हा वेडेपणा -- अशी हेटाळणी होते त्याचे काय ?"

"ठीक, आभास, तुम्ही म्हणता ते सत्य मानले, तर काय काय रद्द होईल ? मग मूल्याची भाषा कोणती बोलणार ?"

"अगदी बरोबर, आभास -- हे सार्त्रलाही माहीत होते -- तरीही तो बोलतोय कारण -- समजून घ्यायचे की नाही -- हा तथाकथित व्यक्तिगत प्रश्न आहे --"

"सर्वसामान्य तो, जो असे भेदभाव असू शकत नाहीत, हे समजून घ्यायला नकार देतो !"

"सात्रे जे सांगतो आहे ते समजून घेण्याच्या प्रक्रियेतही न जाता आपण जर ते निकालात काढणार असलो तर आपण विषमता, अन्याय, छळ, भ्रष्टाचार -- हे मानवी जीवनातून जाऊच शकणार नाहीत, असे मानणारे आहोत !
कितीही ' पुरोगामी ' म्हणून आपला डंका वाजत असू दे !"

"सात्रे काहीतरी काल्पनिक बोलतो आहे, असा निष्कर्ष आपण झटक्यात काढू नये, असे इथे नोंदवावेसे वाटते."

"स्वतःला अलग न काढता जगण्याची एक अद्भूत सत्यता हे वाक्य सांगते -- पोप्याजींनी पुन्हा एकदा हे वाक्य वाचले तर त्यांचे प्रश्न वितळून जातील."

"आज शेंगदाणे विकणारा उद्या मिलमालक झालेला दिसतो, वगैरे. व्यावहारिक मर्यादा बऱ्याचदा ओलांडल्या जातात. किंवा कोणत्याही मर्यादा वा कौशल्ये कळली तर यशाच्या बाबतीत काही फरक पडतील असे समजू. पण त्याच्या आयुष्यातली सुखदुःख-निर्मिती, मानापमान, आपल्याला त्रास देणाऱ्या व्यक्तीचा छळ करावासा वाटणे -- यांत काय फरक पडू शकेल ? जगण्याच्या क्वालिटीचे काय ?"

"आजच्या आपल्या आकलनाप्रमाणे, स्टेटसमधल्या सर्व मुद्यांवर बोलले गेले तर अधिक बरे होईल."

"काही गलबला काही निवळ । ऐसा कंठीत जावा काळ ।। -- असे आहे ते."

"काही गलबला काही निवांत -- रामदास."

"व्हर्च्युअल मागण्या काय आहेत आणि कोणत्या व्हर्च्युअल व्यक्ती / शसनाकडून ?"

"देवनागरीचा आग्रह धरत राहू ! तुमच्या प्रोफाईलवरचे घोषवाक्य मान्य !"

"लाली काही जोडत असेल तर अवश्य जोडू दे -- त्यात काही सखोल असणारच !"

"मोरपीस जास्त सुंदर दिसते -- हा आहे कृष्णाच्या बाबतीत प्रॉब्लेम !"

"ही चर्चा खूपच मूलभूत चिंतनात घुसली आहे ! प्रत्येकाचे वास्तव जर वगळे असेल तर त्या वास्तवालाही आभासी का म्हणू नये, हा एक प्रश्नच आहे."

"प्रत्येकाचे वास्तव वेगवेगळे असेल तर वास्तव आणि भ्रम ( किंवा काल्पनिक ) यांत काय फरक असू शकेल ?"

"अशा मूल्यात्मक अंगाने शिक्षणाचा विचार क्वचितच कुठे होत असेल !"

पाटलांचा पोप्या
"सर्वस्व देणे / त्यागणे या अत्यानंदाच्या क्षणासाठी तर धडपड !"

"अनेकांनी मांडलेले मुद्दे हे या संभाषणाचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारची चर्चा करायची संधी एखाद्या लेखकाला मिळणे हे केवळ या नव्या एफबी माध्यमामुळे आणि सतीश तांबे यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे शक्य झालेले आहे. अशा प्रकारचे एखाद्या लेखकाशी संभाषण हे मराठीत तरी पहिलेच असावे, असे वाटते. या कारणासाठीही हे असेच्या असे छापले जाणे योग्य होईल. एखादे नियतकालिक याला तयार झाल्यास सर्व सहभागी व्यक्तींच्या नावांसह हे छापले जावे, असे वाटते. अशा लेखनाला मानधन वा कोणतेही अधिकार वगैरे प्रश्न नसतात, हे मान्य करून, इथे कुणी हरकत न नोंदवल्यास, हे असे छापायला सर्व सहभागी व्यक्तींची संमती आहे, असे गृहीत धरतो. धन्यवाद !"

"आता मात्र अवधूत परेळकरांनी समारोप करावाच, ही विनंती --"

"गिरीशच्या चर्चानाट्यविषयक प्रश्नाला थोडक्यात उत्तर देऊन ठेवतो. मानसिक संघर्ष आणि बहु-आयामी संवाद हे माझे आवडीचे नाट्यक्षेत्र असल्याने घटनात्मकता कमी, संवाद-नाट्यावर भर -- असे माझ्या नाटकांचे स्वरूप असते. त्या संवादांतून समोर नाट्य घडत असतेच -- पण या धाटणीमुळे त्याला वैचारिकता जरा जास्त असते. ' संवादनाट्य ' हा कसा वाटतो शब्द ?"

"आई-बहीण यांच्याशी लहानपणापासून एकरूपत्व असल्याने त्या नात्यांचा अपमान झाला की पुरुषाची प्रतिमा हमखास भंग पावते -- हे कारण असावे. बाकी इतर विषय स्त्रियांच्या प्रांतातले असल्याने त्या काय सांगतात याबद्दल अत्यंत उत्सुकता आहे."

"व्यक्तिगत सुखदुःखांचा कच्चा माल घेऊनसुद्धा कंडिशनिंगच्या रचनांचे भान घेता येईल पण नुसतेच माझे दुःख दुसऱ्याच्या डोक्यात घालणे याला मी कमी दर्जाची, मूल्यहीन कला समजतो. नुसते दुसऱ्याचे अनुभव माझ्या आयुष्यात प्रस्तुत वा अर्थपूर्ण नसतात -- त्यांचे भान हे माझेही माझ्या अनुभवांचे भान होऊ शकते. भान अनुभवनिरपेक्ष असते."

"मग बटाट्यापेक्षा दगड वा लोखंड का नको ? या असल्या बोलण्यातून काही कळत नाही."

"लाली, तुझे हे विचार पाहून, मला तुझी बिनबुरख्याची ओळख लागणारच आहे !"

"अच्छा, आभास, म्हणजे तुम्हाला प्रश्नाचे निराकारण वा उत्तर सापडले पाहिजे, असे म्हणायचे आहे का ? आणि -- आणि हे 'त्या' नाटककाराला कळले नव्हते ! -- हे कशाबद्दल आहे ?"

"आभास, हे तुमचे शेवटचे दोन मुद्दे कळले नाहीत --"

"व्यक्तिमत्व-मर्यादा, तंत्रकौशल्य-मर्यादा, कच्चा माल-मर्यादा, अभिव्यक्ति-मर्यादा -- अशा कोणत्या ना कोणत्या मर्यादा प्रत्येक कलाकृतीला असतातच -- याच अर्थाने, कोणतीच कलाकृती ही परिपूर्ण नसते, असे मी म्हणतो."

"चर्चानाट्य हा शब्द रूढ करणाऱ्याने हा एक गुन्हाच केला आहे, असे मलाही वाटते. हा शब्द एक मानसिक प्रतिकारच तयार करतो. ' नको ' असे होते. तो शब्द लौकरात लौकर रद्द व्हायला हवाय. पण गिरीशने सुचवलेला ' संवादनाट्य ' हा शब्द -- सगळ्याच नाटकांत संवाद असतात -- या आपत्तीला कसे तोंड देणार ? इथे सहभागी असलेल्यांनी आणखी शब्द सुचवावेत -- न जाणो एखादा चांगला शब्द सापडून जाईल."

"मला वाटते, आता बरीचशी घुसळण झाली आहे -- सतीश तांब्यांमुळे ही एक मॅरॅथॉन चर्चा घडून आली. सर्वच सहभागी व्यक्ती आपापल्या पद्धतीने आणि आस्थेने कलाक्षेत्राशी संबंधित असल्यामुळे ही एक समृद्ध चर्चा झाली. आता याचा समारोप अवधूत परेळकरांनी करायचे मान्य केलेले आहे. त्यांनी तो कराव ही विनंती. एक मुद्दा, सर्वांना विचारून ठेवणे आवश्यक आहे -- समजा ही पूर्ण चर्चा एखादे मासिक छापायला तयार असेल तर, आहे अशी, सर्वांच्या नावांसह छापायला कुणाची हरकत नाही ना ? ' असल्या ' मजकूराला मानधन मिळत नाही, हे लक्षात घेऊन सर्वांची संमती असावी, ही विनंती."

"नाटक हे कधी लेखनात फसू शकते, कधी टीमच्या मर्यादांमुळे फसू शकते, वर्तमानपत्रांतील वाईट परीक्षणांमुळे फसू शकते, स्पर्धेत अपयशी झाले म्हणजे फसले -- असे फसू शकते -- असे खूप प्रकारे फसू शकते."

"घटना-प्रसंगांचे नाट्य हा गिरीशचा मुद्दा अजिंक्यच्याही काही मुद्यांवर प्रकाश टाकणारा आहे. पात्रांचे अंतर्बाह्य दर्शन हा अजिंक्यचा मुद्दा त्याला स्वभावचित्रणाबद्दल मी काय म्हणालेलो आहे त्या संदर्भात ( माझ्या नाटकांचा विचार करताना ) पाहावा लागेल. माझ्या नाटकांत काही वेळी पात्रांची स्वभाव-संगती वा घड्याळाच्या काळाचे परिमाणही विस्कटले जाते. त्यामुळे प्लॉट म्हणजे अभिव्यक्तीसाठी लेखकाने निवडलेला मार्ग -- हे अजिंक्यने केलेले व्यापक वर्णन मला पटते. अरिस्टॉटलचे सुरुवात, मध्य, शेवट -- याला आताचे सर्जक नाटककार फारसे महत्त्व देतील, असे मला वाटत नाही."

अहो, नाटकात नाट्याची गरज नाही, असे मी म्हणत नाहीय, फक्त तेवढ्यासाठी सर्जक नाटक जन्मत नाही, असे म्हणतोय. सर्जक नसलेल्या व्यावसायिक नाटकांना कमी लेखायचे नाही म्हणजे या चर्चेत त्यांच्याबद्दल काय बोलायचे ? नाट्य हवेच हे निर्विवाद, या बाबतीत गैरसमज नसावा. बाकी बदल, लेखकाचे सहकार्य या विषयांवर गिरीश सविस्तर बोललेला आहे. माझे आणखी एक नेहमीचे म्हणणे, इथे पुन्हा मांडतो -- कोणतीही कलाकृती ही कधीच परिपूर्ण नसते, पण तिच्यातून येणारे आकलन मात्र परिपूर्ण असू शकते. इथे लाख्यांचा एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. मुख्यतः लेखक-दिग्दर्शक व एकूण टीमने नाटक आपल्या क्लॅरिटीने सादर केले तर पुष्कळदा नाटक ' आवडले पण नीट कळले नाही ' असे म्हणणारेही प्रेक्षक भेटतात. त्यांची, ते ' कळण्याची ' प्रक्रिया पुढेही चालू राहू शकते. जमल्यास, वाटल्यास ते पुन्हा एखादा प्रयोगही पाहू शकतात."

"मी काय विश्वनाथन आनंद थोडाच आहे की पन्नास बुद्धिबळपटूंशी एका वेळी फाटाफट खेळू शकेन ? खेळणार, पण जरा धीरे धीरे --"

"आता प्रिय मित्र अजिंक्य यांच्या मुद्यांवर लिहीन."

"आभास आनंदांचा दुसरा मुद्दा ' स्वतःची सुखदुःखे व्यक्त करणारे नाटककार ' नसतात, हा आहे. त्यांचे म्हणणे नाट्य लुभावते, म्हणून तो लिहितो. इथे आधी एक लक्षात घ्यायला हवे की व्यावसायिक कारणांसाठी ' रचलेल्या ' नाटकांबद्दल आपण बोलत नाही आहोत. ज्याला आपण सर्जक अभिव्यक्ती म्हणतो, त्या नाटकांबद्दल आपण बोलत आहोत. त्यामुळे मराठीतली ९८ टक्के नाटके आधी बाजूला टाकावी लागतात. नाटकच काय, सर्वच कलाप्रकारांत, साहित्यप्रकारांत, सर्जक विभागात, स्वतःची सुखदुःखे मांडणारी, स्वतःच्या जगण्याला प्रतिक्रिया देणारी, स्वतःची मते व्यक्त करणारी -- थोडक्यात, स्वतःच्या कंडिशनिंगचे परावर्तन करणारी निर्मितीच जास्त असते. अगदी अलीकडचे, धर्मकीर्ती सुमंतचे नाटक

' गेली एकवीस वर्षे ' घ्या. स्वतःच्या डोक्यातला गोंधळ, मूल्यहीनता मांडणारे ते नाटक नाही ? यालाच मी स्वतःची सुखदुःखे व्यक्त करणे, म्हणतो. "

"प्रथम आभास आनंदांचा, सामान्य प्रेक्षकाला समजण्याचा मुद्दा घेऊ. बेकेटचे ' वेटिंग फॉर गोदो ' हे नाटक त्याच्या अर्थवत्तेबाबत जगभर मान्यताप्राप्त असून त्यावर हजारो पाने लिहिली गेली आहेत. आपल्या नेमाड्यांना बेकेट हा टोटल लेखकच दुय्यम दर्जाचा वाटतो. आणि नेमाड्यांना सामान्यांपेक्षा तरी जास्त कळत असावे. आता इथे नेमाडे ते नाटक समजून घ्यायला कमी पडले म्हणावे की बेकेट नाटक लिहिण्यात कमी पडला म्हणावे ? किमान नेमाड्यांपर्यंत तरी पोचले पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा काही कुठल्या नाटककाराची नसते. सारांश, या प्रकारात ' आदर्श ' असा बिंदू दाखवता येणार नाही. प्रेक्षक, लेखक दोन्ही बाजूंनी समजून घेत, बदल करत अशीच ही प्रक्रिया चालणार. कुणाला तरी दोषी धरावे, हा आग्रह पटत नाही।"

"अजिंक्य आणि आभास यांच्या काही मुद्यांवर बोलायचे राहिले आहे -- ते पूर्ण करेन, मग, आणखी काही मुद्दे नसतील तर, अवधूत परेळकरांनी समारोप करायला हरकत नाही --"

"तो नाही प्रश्न, समजून घेणे हे एकत्रच घडणार -- एक श्रेष्ठ एक कनिष्ट -- असे नाही -- म्हणून म्हणतोय -- या प्रक्रियेत तू सामील हवी आहेस --"

"त्यातल्याच एका भागावर बोलतोय -- तो भाग महत्त्वाचा नसता तर तुमच्या पोस्टमध्ये कशाला आला असता ? तुम्ही कशाच्या तरी तुलनेत बोलत आहात, हे तुम्ही तरी विसरू नये !"

"गौरी, असे बोलू नकोस, आपण सगळे मिळून काही समजून घेत आहोत --"

"आमचाही नाही विश्वास, पण आहे मुलीला मंगळ -- मुलाला नाहीय का ? मुलगा मंगळाचाच पाहिजे, असे नाही, पण आपला कशावरच विश्वास नाही तर नकोच हे !"

"सुनील, अगदी बरोबर -- शरीरच ! तेच तडफडते -- दुःख का, ताण का, हे प्रश्न विचारते -- हे सगळे जर वस्तुमात्राच्या कार्यकारण शास्त्राने होत असेल तर कुणीच कशावरच काहीच बोलायची गरज नाही -- जे घडतेय ते मरू दे, हे एकच तत्त्वज्ञान असायला हवे ! शरीराला !"

"ती जगण्याच्या शाळेत शिकलेली असणार -- तिने आपल्याला भारी पडणे कुणाला आवडणार नाही, सांगा !"

"बुद्धीने मानवी संबंधांच्या राज्यात बोंब होते -- हा उघड अध्यात्मिक प्रश्न आहे !"

"पण खरोखरची लाली चायवाली इथे आली तर काय बहार येईल ! ही कल्पना ग्रेटच आहे ! कोणती ? लालीने सगळ्यांबरोबर सामील होणे !"

"पेसोआ या पोर्तुगीज कवीने असंख्य बुरखे घेऊन कविता लिहिल्या !"

"लाली, तुला कौतुक आवडत नाही, हे पाहून, तू स्त्री असल्याबद्दलचा डाऊट बळावतो !"

"लालीने वर जी बॅटिंग केलीय ती पाहिल्यावर तिला कुणीही अडाणी म्हणणे शक्य नाही --"

"जरा बाहेर चाललोय --"

"मी एका अभिनेत्रीबद्दल असे वाचले होते की ती ए बी सी डी असे झेडला जाईपर्यंत लोकांच्या डोळ्यांतून पाणी काढायची !"

"लिहिण्याच्या कारणाच्या बाबतीत एक नकारार्थीही सांगायला हवे -- माझ्या जगण्यात येणारे सुखदुःखाचे व्यक्तिगत अनुभव वाचकाच्या वा प्रेक्षकाच्या मनात परावर्तित करण्यासाठी मी लिहीत नाही --"

"आभास, तुमच्या पुढच्या प्रश्नांबद्दल म्हणजे -- तात्त्विक वा आकलनाच्या गरजेतून मांडणीच्या पद्धती बदलत राहतात -- चांगल्या वाचकाने वा प्रेक्षकाने ते आत्मसात करत सामील होत गेले पाहिजे -- तसे न होणे हे अडथळ्याचेच होणार -- पण याचा अर्थ, कलावंताने आपल्या आकलनाबरोबर वा ते मांडण्याच्या स्वातंत्र्याबरोबर राहू नये, असे कुणीच म्हणणार नाही --"

"का लिहितो ? जगताना आपल्या लक्षात आलेले, आपल्याबरोबर जगणाऱ्यांनाही सांगावेसे वाटते, म्हणून --"

"आभास कथेतल्या घटनांना कारणपरंपरेची एक लिंक असते -- तोही लिहिण्याचा एक प्रकार असू शकतो आणि त्यातूनही खूप मोठा आशय येऊ शकतो, हे मान्य करूनही -- कोणतीही कारणपरंपरा ही पूर्ण पकडणे शक्यच नाही, हे काही लेखकांना वाटू शकते -- आणि मग ते कथेऐवजी वर्तमानातल्या भानाला आवाक्यात घेऊ पाहतात --"

"Plot - a plan or scheme to accomplish a purpose. In literature, this is the arrangement of events to achieve an intended effect consisting of a series of carefully devised and interrelated actions that progresses through a struggle of opposing forces, called conflict, to a climax and a denouement. This is different from story or story line which is the order of events as they occur.

The term is taken from the French complot, meaning "conspiracy. "

Aristotle insisted plot must have a beginning, a middle, and an end, and that its events constitute a whole entity. -- अजिंक्यने दिलेल्या मुद्यांबरोबरच हेही विचारात घेण्यासारखे आहे, म्हणून इथे दिले आहे."

"धन्यवाद !"

"या चर्चेचा हा पहिला भाग समजून मला वाटते, इथे थांबू -- पुन्हा उद्या आजच्याच वेळी भेटावे का ? आणि मधल्या काळात कुणाला काही वाटले तर इथे देऊन ठेवता येईलच --"

"अजिंक्यने खूपच सखोल मुद्दे मांडलेले आहेत. प्लॉट या विषयावर इंग्रजीत खूपच लेखन उपलब्ध आहे, पण आपण इथे आपापले आकलन व्यक्त करत जातो, हे फारच चांगले आहे. अजिंक्यचे मुद्दे एकूणच विचारात घेण्यासारखेही आहेत -- माझ्या नाटकांच्या संदर्भात मी त्या मुद्यांबद्दल बोलेनच --"

"काही प्रेक्षक तसे करतात, हे खरे आहे, पण लेखक वा ती कलाकृती म्हणू, अमुक एक वैचारिक बाजू वा हीच न्याय्य बाजू -- असे म्हणत नसेल तर काय सांगतेय ही कलाकृती यात प्रेक्षकांनी इंटरेस्ट घेणे अभिप्रेत आहे --"

"आभास, होय, तो नाट्य खुलवतो, पण चांगले-वाईट याचे सत्य काही असते का -- हा प्रश्न राहतोच -- त्यामुळे ग्रे एरिया तरी कशाला म्हणणार, असा प्रश्न येतो --"

"म्हटले तर सगळीच माणसे दुष्ट म्हणता येतील पण लेखकाला अपेक्षित नसलेले ' बाजू घेणे ' हे कधी कधी प्रेक्षकांकडून घडताना दिसते ! ' ढोलताशे ' चा प्रयोग पाहताना त्यातल्या काकूच्या बाजूला असलेले काही प्रेक्षक असतातच !"

"' ढोलताशे ' हे बऱ्याच प्रमाणात सामाजिक समस्येचे नाटक या अंगानेच पाहिले गेल्याने, लाखे तसे म्हणताहेत, असे वाटते. धर्माबाबत सवयीच्या कल्पना असणाऱ्यांची अधार्मिकता आणि हिंसा हाही यातला एक महत्त्वाचा विषय आहे -- आणि मग धर्म म्हणजे काय ? -- हेही --"

"अमुक पात्र दुष्ट, अमुक चांगले असे भेद माझ्या नाटकांत नसतात --"

"आभास, तो शोध त्या प्रक्रियेतच अंतर्भूत असतो -- यालाच आतली रचनेची जाणीव म्हणा हवे तर -- एक पात्र किंवा लेखक असे कुणी निर्णायक नसतात, पण हे सगळेच फेल होतेय तर मग काय ? -- इथपर्यंत ती प्रक्रियाच येते --"

"जगता जगता अनेक कारणांनी असणारा आकलनाचा मर्यादितपणा आणि ' विशिष्टता ' म्हणजे स्वभावबद्धता -- आणि मघाशी सांगितल्याप्रमाणे प्रश्नाला बौद्धिक निराकरण न सापडणे -- किंवा दोन पात्रांना दोन वेगळी निराकारणे ' सापडणे ' आणि ती मॅच न होणे !"

"लाली, खूप तपशीलवार स्वभावचित्रणाची मी फारशी काळजी करत नाही -- माझी पात्र कोणत्या ना कोणत्या स्वभावबद्धतेत असतात -- ते आले की मला पुरते -- पुढे त्या प्रश्नाच्या बाबतीतला बौद्धिक बिनतोडपणा हीच थीम असते --"

"याची बांधणी म्हणायची झाल्यास पहिल्या भागत पत्नीचा पतीवर हल्ला आणि नंतर सगळेच उलटेपालटे होत जाणे -- अशी होती --"

"योगेश सोमण आणि सोनाली कुलकर्णी ( सीनियर ) यांनी याचे बरेच प्रयोग केले -- त्या वेळी फर्ग्युसनतर्फे त्यांनी केलेल्या प्रयोगाला पुरुषोत्तम करंडकच मिळाला होता --"

"स्वतःच्या मरणाच्या भीतीने पत्नीचे रक्षण करायला चुकलेला नवरा -- हा विषय होता --"

"लालीने उल्लेख केलेला ' नातं ' हा माझा दीर्घांक मराठीत एकमताने मान्यताप्राप्त आहे -- प्रकाश बुद्धिसागरने काही काटछाट करून ही एकांकिका दूरदर्शन स्पर्धेत सादर केली होती -- ८५ प्रयोगांतून ती निर्विवाद पहिली आली होती --"

"मी लिहिताना त्या त्या प्रश्नाचे भान व्यक्त होणे हेच त्या कलाकृतीचे अस्तित्वसमर्थन असते -- नुसती करमणूक करण्यासाठी मी लिहीत नाही -- त्यामुळे, बऱ्याच वेळी रूढ अर्थाने कथा नसूनही नाटक बांधीव वाटू शकते -- त्याला ती आतली समजून घेण्याच्या प्रक्रियेची संगती असते --"

"होय -- ते भान असते --"

"प्रत्येक वेळी मला हे जमलेच, असे नाही, काही नाटके मी पूर्णपणे पुन्हा लिहिली --"

"मुख्य प्रश्न डोक्यात असणे, वाचनातून, अभ्यासातून असणारी ( जी काय असेल ती ) रचनेची जाण आणि इंटरेस्टिंग असण्याचे महत्त्व -- यांतून माझे नाटक लिहिता लिहिता घडत जाते --"

"' धागेदोरे ' या नाटकाचा विषय असा होता की मी इथे माझ्या काही कारणांनी जे काय वागतो त्याचा कुठेही, काहीही परिणाम होऊ शकतो -- पूर्ण मानवजात ही एकत्रितपणे जगत असते, हे आकलन त्यात व्यक्त करायचे होते --"

"पण मुख्य गोष्ट मला अशी वाटते की जगण्यातली ॲब्सर्डिटी नेहमी जाणवत असल्याने, समोरच्या प्रश्नांचे भान न सोडताही मला ' घटनांचे ' स्वातंत्र्य खूप राहते --"

"मी सौंदर्यशास्त्र, समीक्षा हेही आस्थेने वाचत आलेलो आहे -- माझ्या कलाकृतींच्या रचना घडण्यात त्याचाही उपयोग झालेला असू शकतो --"

"सध्या तो एका हिंदी नाटकात काम करतो आहे -- त्याने बऱ्याच मराठी चित्रपटांत, मालिकांतही काम केलेले आहे --"

"आनंद अलकुंटे याने माझ्या ' धागेदोरे ' या नाटकात काम केले होते आणि नंतर पुणे विद्यापीठाने बसवलेल्या ' साक्ष मावळत्य सूर्याची ' या एकांकिकेतही काम केले होते -- तीत दोनच पात्रे होती -- ती एकांकिका पुरुषोत्तममध्ये सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली होती --"

"माणूस थोडा करप्टच असतो बघा -- आनंदशी बोलायला मी वेळ मागून घेतला आणि त्याला जोडून जेवणही उरकून आलो !"

"जरा त्याच्याशी बोलतो -- त्याच्या आयुष्यात काही महत्त्वाचे घडते आहे --"

"माझा एक नट मित्र दिल्लीत एका म्युझिकल कॉमेडीत काम करण्यासाठी गेला आहे -- तिथून तो बोलतोय -- आपली चर्चा चालल्याचे त्याला माहीत नाही -- आनंद आलकुंटे --"

"लाली चायवाली यांनी मानवी स्वातंत्र्याचा उल्लेख केला आहे. हा खरोखरच माझ्य अति-तीव्र इंटरेस्टचा वषय आहे -- याला होणारे अडथळे दाखवणे, हे जवळ जवळ प्रत्येक नाटकात घडते --"

"गोखले म्हणतात ते बरोबर आहे -- नाटक लिहिताना मला ते इंटरेस्टिंग वाटत राहिलेच पाहिजे ! काही वेळी लिहिताना अचानक सुचलेल्या / आलेल्या विनोदावर मीच मनसोक्त हसतो !"

"नाटक लिहायला सुरुवात करताना माझ्याकडे कोणताही आराखडा नसतो -- दारव्हेकरांचे असे सांगतात की त्यांचा आराखडा एवढा पक्का असे की ते तिसरा अंक आधी लिहू शकत -- माझे तसे नाही -- माझा प्रत्येक संवाद उत्स्फूर्तपणे त्या त्या वेळी लिहिला जातो -- अपवादात्मक असे काही महत्त्वाचे असे कधीही सुचलेले संवाद बाजूला लिहून ठेवलेले असतात ते नंतर ओघात योग्य पद्धतीने अंतर्भूत होतात --"

"माझ्या आकलणाप्रमाणे, अनेक मूल्ये -- ही खोटी कल्पना आहे -- श्रेय-मूल्य एकच आहे --"

"माझे कोणतेही नाटक वा एकांकिका यात ' परदेशी हात ' मुळीच नसतो. तेंडुलकरांच्या नाटकांतले परदेशी हात शोधून काढणाऱ्या माधव मनोहरांसारखा आज कुणी असेल तर त्याने जरूर प्रयत्न करून पाहावे -- असे मी म्हणू शकेन --"

"मग, लग्नानंतर पहिल्या रात्री नववधूचा उपभोग तिथल्या जमानदाराने घेण्याची प्रथा आणि गोदावरी परुळेकरांच्या

' जेव्हा माणूस जागा होतो ' या पुस्तकात आलेली एक हकीगत -- हे माझ्या मनात क्लब होते -- आणि, म्हटले तर पूर्ण काल्पनिक असा एक प्लॉट आकाराला येऊ लागतो --"

"उदाहरणार्थ श्रेय म्हणून नीती, न्याय अशी अनेक मूल्ये असतात का -- असा मला प्रश्न पडला -- अनेक मूल्ये म्हटले की मर्यादितता आली -- म्हणजेच त्यांचीही टक्कर होऊ शकणार ! -- मग त्यांची टक्कर घडण्याच्या शक्यतांचा विचार मनात सुरू होतो --"

"माझे बहुतेक सगळे नाट्यलेखन जगण्यातले असे प्रश्न हाताळते की ज्यांना बौद्धिक निराकारणे नाहीत --"

"या चर्चेत मीच पुन्हा एक लेख लिहायचा, असे होऊ नये, याची काळजी घेईन -- जयंत पवारांनी ' ढोलताशे ' संदर्भात माझी एक मुलाखत घेतली होती -- त्यात ते म्हणाले होती की नाटकाच्या आधी एक प्रमेय तुमच्या मनात असते, असे वाटते -- ते बरेचसे खरे आहे --"

"' अक्षरवाङ्मय ' च्या प्रायोगिक-नाटक विशेषांकात माझा ' माझी नाट्यलेखन प्रक्रिया ' हा एक बऱ्यापैकी मोठा लेख येतो आहे, त्यात याही गोष्टी अंतर्भूत आहेत -- पण इथे थोडक्यात बोलता येईल --"

"स्वतः साहित्यक्षेत्रात भरीव आणि अर्थपूर्ण कामगिरी केलेल्या थोड्याच लोकांनी माझ्या नाटकांबद्दल बोलायची तसदी घेतलेली आहे. सतीश तांबे यांनी हा विषय इथे चर्चेला घेण्याने त्यात भर पडत आहे, त्याबद्दल आधी धन्यवाद !"

"आपल्या कामाला टाळ्या वाजवायला कुणी आहेत की नाहीत याकडे अजिबात लक्ष न देता आपापले काम करत राहणारे काही वेडे या जगात आहेत, ही या जगातली सर्वोत्कृष्ट बाब !"

"१५-२० तरी असतील --"

"सॉरी, यात कदाचित चर्चेचा आत्ता तरी प्रश्न नाहीय -- पण चव्हाट्यावर हे सांगायलाच हवे, असे वाटले !"

"त्या प्रयोगापूर्वी आपण भेटलो होतोच. तोच प्रयोग अर्थात मीही पाहिला. अप्रतिम !!! असा प्रयोग वारंवार पाहायला मिळत नाही. नाववाल्या कलाकारांनी तोंडात बोटे घालून पाहावा असा अभिनय ! नंदू माधवांचे दिग्दर्शन लाजवाब ! राजकुमार तांगडे यांचे लेखनही अभ्यासपूर्ण आणि शिवाय आवश्यक ती मजा आणणारे ! मस्ट सी, असे नाटक !"

"मनःपूर्वक शुभेच्छा !"

"टाळाटाळी सुचते आणि त्याचा परिणाम म्हणून आळस असतो !"

"धन्यवाद आणि शुभेच्छा !"

"धन्यवाद अपूर्वा ! तुला आणि तुम्हा सर्व कुटुंबियांना शुभेच्छा !"

"आळसाचे !"

"मुळात हे असले विक्रम करायची गरज वाटणे, ही मानसिक विकृती का म्हणू नये ?"

"यालाच म्हणजे साच्यात बसणाऱ्याला की न बसणाऱ्याला ?"

"आळस आणि कृती यांतला हा फरक आहे !"

"जरूर ! मलाही आवडेल !"

"गाठोडे !"

"मतमतांतरे या गाठोड्यात ठेवून देऊ या हे !"

"सॉरी, आपण फारच सैलपणे बोलतोय -- चर्चा अवघड आहे --"

"ती कशासारखी आहे ?"

"अशा आशयाची ? कोणती ?"

"मी थोडक्यात वर वैशिष्ट्य सांगितले आहे -- इथे निबंध लिहिणे शक्य नाही -- मुख्य प्रयोग हा आशयात असतो, नुसता तंत्रात नव्हे --"

"व्यावसायिक कला ही प्रेक्षकांच्या मानसिक अवस्था फारशा विचलित न करता कथा, तंत्र, ग्लॅमर, नेपथ्य अशा प्रकारे टाईमपास करण्यावर भर देते -- प्रायोगिक कला असे तुमच्या सवयींचे कोडकौतुक करत नाही -- ती आपले भान, आकलन मांडण्यावर भर देते -- मराठीत ' एक शून्य बाजीराव ', ' वाडा चिरेबंदी ', ' महापूर ', ' साठेचं काय करायचं ' , ' भूमितीचा फार्स ' -- अशी बरीच नाटके आहेत."

"मिलिंद, तुम्ही जगातले विचारताय की मराठीतले ?"

"म्हणून मी आधी खूप आळशी होण्याच्या प्रयत्नात आहे !"

"या विधानालासुद्धा दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रिया शक्य !"

"www.champralekhan.com -- यात लेख विभागात बघा. तो लेख साहित्य संमेलनाच्या ' अक्षरयात्रा ' या प्रायोगिक नाटकावरील विशेषांकात आला होता."

"मिलिंद, एवढी मोठी चर्चा इथे अवघड आहे -- प्रायोगिक नाटकाबाबत माझा एक लेख माझ्या वेबसाईटवर आहे -- जमल्यास वाचा -- जे जगभर मान्य आहे, ते असे उडवून लावता येणार नाही --"

"जसे संगीताचे औरंगजेब असतात तसे कवितेचेही असतात -- आपल्या मित्रांत काही तसे दिसताहेत.मित्रांनो, इथे फेसबुकवर खरोखरच काही चांगले कवी आहेत -- कुणी चुकून राहून जायला नको म्हणून नावे देत नाहीय -- पण, तुम्हाला कविता हा प्रकारच आवडत नाही म्हणून असा अन्याय करू नका, ही नम्र विनंती."

"सुंदर ! तिला आणि तुम्हा सर्व कुटुंबियांना शुभेच्छा !"

"उत्सुकांनी व इच्छुकांनी आपली प्रत मिळवण्याची व्यवस्था करावी तसेच, असे त्रैमासिक मराठीत असणे महत्त्वाचे वाटणाऱ्यांनी वर्गणीदारही व्हावे, असे इथे सुचवत आहे."

"उत्सुकांनी व इच्छुकांनी आपली प्रत मिळवण्याची व्यवस्था करावी तसेच, असे त्रैमासिक मराठीत असणे महत्त्वाचे वाटणाऱ्यांनी वर्गणीदारही व्हावे, असे इथे सुचवत आहे."

"जे. कृष्णमूर्तींच्या ' द फर्स्ट अँड लास्ट फ्रीडम ' या पुस्तकाला आल्डस हक्सले यांनी लिहिलेली प्रस्तावना ग्रेट आहे ! जमल्यास जरूर वाचा. ते पुस्तक नेटवर फ्री उपलब्ध आहे."

"याच संदर्भात आणखी एक -- मेंदूचा वैचारिक-भाषिक वापर चांगला करणाऱ्यांचे तारुण्य अधिक टिकते, असे संशोधन आहे ! माझी नाटके पाहात जा, असे मी लोकांना याच कारणासाठी सांगत असतो !"

"पहिला पाठ मी फुकट देतो -- तुम्हाला तुमचे बरोबर वाटत असले तरीही चूक कबूल करून त्या चुकीबद्दल दुःख दाखवता आले पाहिजे !"

"मैत्रिणींचे मानसशास्त्र यावर मी कोचिंग क्लासेस सुरू करतोय ! एकच आठवड्याचा कोर्स -- फी फक्त ---- ज्यांना वाटतेय की होऊ शकेल याचा काही उपयोग त्यांनी नावे नोंदवा !"

भिणे

"कुटुंबवत्सल, सर्वनीतीमान, सर्वकायदेपाळू, अशक्तमन, सदोदित भित्रा येत आहे हो !!!"

"टगे आणि टग्या एकत्र असण्यातली अद्वितीय मजा, हे इथे एक खास वैशिष्ट्य ठरावे !"

"टगेगिरीत टारगटपणा, थोडा ( की कमीजास्त ? ) चावटपणा, विनोद, चेष्टामस्करी -- हे सर्व असावे पण मित्रमैत्रीण भावनेचा पाया पक्का ठेवून !"

" आपण काळजी घ्यायची, एवढेच -- पुढे जे होईल ते होईल !"

"तांब्यांनी उपहास / उपरोध बंद करू या, असे म्हटलेले नाही -- ' बेतानेच ' -- म्हटले आहे -- व्यक्तिगत कुणी दुखावले जाणार नाही, याची काळजी घ्यावी, एवढेच त्यांना म्हणायचे असावे --"

"कुठल्याही सणाबिणात माझा फार वेळ जाऊ नये याची फार चांगली व्यवस्था नियतीने माझ्यासाठी केलेली आहे ! धन्यवाद नियती ! आणि हो नियतीलाही मी बहीण मानणार नाही !"

"' अकेला हूँ मै ' हे तर माझे अत्यंत आवडते गाणे ! इलाज नाही !"

" मान्य -- कमलेश वालावलकर !"

"व्यक्तिगत रागलोभ असे नको पाहायला -- इथल्या मर्यादेत सकारण बोलतोय आपण --हे काही न्यायालयाचे निकाल नव्हेत --पण बोलले जाऊ द्या ना --"

"स्वतःच्या संकुचित बौद्धिक रचनेत बद्ध असलेले आणि काही कलाकृतींत तरी तसे नसलेले -- यांतला हा फरक आहे. नेमाडे कायमच संकुचित राहतात -- विद्वत्ता आणि मजकूराची पाने कितीही असोत."

"चिं. त्र्यं. खानोलकर, रंगनाथ पठारे, राजन खान, विश्राम बेडेकर, मधू साबणे, सतीश तांबे आणि मेघना पेठे यांचे काम मला महत्त्वाचे वाटते ( कदाचित सगळेच नसेल -- तसे कुणाचेच नसते )."

"इथे व्यक्तिगत काही नाही -- मराठीत नेमाड्यांनी खूप महत्त्वाचे काम केलेले आहे, हेही मान्य -- पण लेखक वा समीक्षक म्हणून ' हा आमचा ग्रेट ' असे काही नाही --"

"बेकेट, एलियट दुय्यम दर्जाचे, खानोलकर फालतू , पु. शि. रेगे छापून छापून वाढवलेले -- हे गंभीरपणे वाचण्याच्या तरी लायकीचे आहे का ?"

"कलावंत जेव्हा समीक्षक असतो तेव्हा तो आपली मूल्यकल्पना पायाभूत धरत असतो -- ' टीकास्वयंवर ' मधल्या नेमाड्यांच्या मूल्यकल्पना काय लायकीच्या आहेत ?"

"वरील सगळेच विचार अर्थपूर्ण म्हणून मान्य -- या बाबतीत देशीवाद फालतू आहे -- माणसाचा अनुभव, भाषेची रचना, नीतीकल्पना कशा घडतात -- यांबाबतचे संशोधन असेल तर देशीवादाचा काय संबंध ( घंटा ) ? या चर्चेत सतीश तांब्यांनी सिक्सरच मारलेली आहे --"

"एकीला खूप कष्ट करून १०० गुण मिळतात, एकीला फारसे कष्ट न करता १०० गुण मिळतात -- असे असते तेव्हा ती परीक्षा पेपर सोडवण्याची नसून पेपर घडवण्याची असते !"

"हे पटले ! आपले आयुष्य -- आपण बोलू --"

"जगण्यातल्या ॲब्सर्डिटीचे आणखी एक परिमाण !"

"पीड -- म्हणजे, पीडा दे -- हे बघा जमतेय का --"

"भाषिक अलंकाराचे उत्तम उदाहरण ! शालेय अभ्यासक्रमात घ्यावे -- अंधश्रद्धा निर्मूलनही होईल आणि औषधी उपयोगही कळतील !"

"सुनील तांब्यांनी सूचित केलेले स्पष्टच बोलायचे झाले तर, अजिंक्य, तू दिलेल्या यादीत पूर्ण मानवजात कव्हर होते ! बचा हुआ कौन है, बोलो ! त्यामुळे, रागावू नकोस, सुरुवात स्वतःची भीती घालवण्यापासूनच करावी लागणार ! त्या आधी आपणच आपल्याला भितोय का -- हा प्रश्न पटावर घ्यायला लागणार !"

"धुक्यात लपेटलेले सौंदर्य !"

"अजिंक्य, तुझे वैतागणे साहजिक आहे --"

"तसे नाही -- स्टेटस बिनचावट रखो रे ! -- एवढेच !"

"ते खोटे की हे खोटे, असे घोटाळ्यात पाडू नका म्हणजे झाले !"

"कंटाळून ' विषय ' सोडून देतो शेवटी माणूस !"

"म्हणजे माझे स्टेटस कसे बरोबर आहे, आले ना लक्षात ?"

"विनोदबुद्धी सगळ्यांना सारखीच असते, हे आपण हजारदा कबूल करूनही, त्या इथे सहभागी होतायत का बघा !"

"हे बघा, अवधूतजींनी मला नाउमेद करून टाकले !"

"लाली चायवाली बाई आहे की बुवा, माहीत नाही, पण तिचा इथला चाय मस्त !"

"खरे आहे -- हेच मी तिकडे एफबीवरही टाकले आहे -- तिकडे भरभरून चालले आहे !"

"ग्रेट, मिलिंद, हा विचार आहेच, पण एखादा विषय एकदम निकालात काढण्यापेक्षा ' सुधाराय ' ची संधी देत राहावे, असे वाटते --"

"लैंगिक हे मला आवडत नाही - चीप वाटते -- दुसरा सांगा शब्द --"

"मराठीतल्या एक नंबरच्या सेक्स-नाटकाचा मी लेखक आहे ( नंबर अर्थात मीच दिलेला ) हे विसरू नका !"

"जातिवंत चावट स्टेटस हाडाचे साहित्यिकच लिहू शकतात -- सगळे मार्कस साहित्यालाच !"

"योग्य ठिकाणी तोडलेल्या शब्दांनी माणसे जोडणे !"

"जशी तुमची मर'जी' ! त्यापेक्षा तुम्हाला ' एजी ' म्हणावे का ? म्हणजे आम्हाला ' जी ' म्हटल्याचे समाधान आणि तुम्हाला तसे न म्हटल्याचे !"

"मित्रांनो, माझ्याकडे आहे देवनागरीची सोय -- त्या कामात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मी इतरांसाठी ही विनंती केली होती."

"आता हा एपिक ब्राऊजर हा मला नवीन प्रकार आहे --"

"तिथेच आम्ही नेमाड्यांशीही वाद घातला होता -- ते देशीवादी आणि देशी आणि आम्ही ( देशीवाद कळत नसल्याने ) फक्त देशी !"

"अभिजित, आमचा कोल्हापूरला एक ग्रुप होता -- देशीशिवाय बोलत नव्हतो आम्ही -- म्हणजे बोलायचो, पण देशीसह जास्त बोलायचो !"

"सतीश तांबे ' चव्हाटा ' ने एवढा खर्च करून आणलेली चॉकलेटे ( एक विस्वासू म्हणून ) तुमच्या ताब्यात आहेत -- त्यांतले एक गायकवाडांनी जिंकलेले आहे !"

"अजिंक्य, ये समझमे नही आता है । जरा एक्सप्लेन करो ।"

"कोल्डब्लडेड शांतता !"

"सह्याद्री चालला हिमालय सर करायला ! हिमालयाला निदान जाणीव तरी व्हावी की बाबा सह्याद्री करतोय प्रयत्न !"

"साहित्यावर मत देण्यासाठी वाचन लागते, असे तुम्ही म्हणताय, त्या अर्थी, खरोखरच तुमचे वाचन कमी असावे ! ( गंमतखोरी हो ! )"

"अनंतजी, साहित्यिक जर आवडला नाही तर ' इथल्या मातीतला नाही ' म्हणायचे आणि तरीही लिहीत राहिला तर त्याला ( इथल्या ) मातीत घालायचे -- या कामाला कोल्हापूरची माणसे लागणारच आहेत !"

"अहो, ' राशोमान ' पिक्चरसारखी अवस्था ! दोघांकडेही काही फॅक्टस आहेत, लॉजिक आहे आणि सत्य दाखवता येत नाहीय ! जो स्पष्टीकरण स्वीकारत नाहीय तो हर्ट झालेला असू शकतो -- पटवण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती अर्थात जवळचीच असणार ! बिनतोड अवस्था !"

" दातकण्यावालाही समजून अथवा प्रामाणिकपणे असत्य बोलू शकतो !"

"अगदी प्रियकर-प्रेयसीतही हे घडते !"

"तरीही मला पटत नाहीय -- माझेही लॉजिक आहे --"

"मला उलट दिसते -- दातकण्यावाल्यासाठी, काहीही न समजता, मी मन बदलायचे ठरवतो ! सत्याबित्याचा प्रश्नच नाही !"

"अशा प्रश्नांत संबंधांची आणि आयुष्यांची वाट लागते मित्रांनो --"

"मन का बदलायचे ? आणि मनोरचना बदलून सत्य गवसेल ?"

"गंमत म्हणजे यांतला कुणीही एक खोटा असू शकतो किंवा दोघेही खरे असू शकतात ! बोंबला !"

"एक कम्युनिस्ट समूह आहे, एक धर्मवादी समूह आहे -- पॉवर कुणाचीही वाढू शकते -- त्यातून विध्वंस, ताण, संधीची वाट पाहणे -- हे चालू राहते -- हे मूल्यात्मक जगणे ? की सर्जक जगणे ?"

" फोटो बदलला की जरा घोटाळा होतो -- ही कोण अचानक नवी मैत्रीण , असा सुखद धक्का बसतो पण अरे, ही तर आपली जुनी मैत्रीण, हा त्याहून सुखद धक्का बसून बरे वाटते ! स्वप्नात, सत्यात कशीही राहा पण मजेत राहा !"

"सगळ्याच कलाप्रकारांत काव्य असते, यातले काव्य सोडून बोलायचे झाल्यास, कविता म्हणजे अमर्याद सूचकतेचा हरघडी नवनवा प्रवाह !"

"' सौंदर्याचा आस्वाद नजरेने ' -- इथे मन थांबत नाही आणि प्रॉब्लेम सुरू होतात. बाहेरून सारखे काही ना काही मिळवत राहण्याची मनाची एकूणच सवय, हा दिसतो मला प्रॉब्लेम. मनाला आत्मपूर्ण म्हणावा असा क्षण का नसतो ?"

"आपण नको म्हणून मतभेद थांबणार आहेत थोडेच ! मी एका वेगळ्या दिशेने हा प्रश्न समोर आणला आहे --"

"मनातली इच्छा पूर्ण झाली तर मी तसे मानायला तयार होईन -- काम व्हायला पाहिजे पण !"

" तो नाही प्रश्न -- सर्जकता म्हणून किंवा मूल्यात्मकता म्हणून किंवा माणसाच्या प्रश्नांवर उपाय म्हणून -- कितपत अर्थपूर्ण असतात मतभेद ?"

"ते एक केले पाहिजे आणि ख्रिश्चन धर्माचेही काहीतरी करावे लागणार आहे, कारण हल्ली रोज सकाळी माझा मोबाईल वाजतो आणि त्यावर येशूचा फोटो आलेला असतो ! मी हिंदू धर्माचेही काही करत नाही तरी हे लोक माझी कसली खात्री पटवू पाहताहेत, कोण जाणे !"

“तुमचा सल्ला मानायचे ठरवलेय. मी स्टेटस देत नव्हतो पण तुमच्या आणि इतरही स्टेटसवर, तुम्हा सर्वांच्या सौजन्याने, मनसोक्त खेळत होतोच !"

"जो काही मूल्ये मानतो पण त्यांच्या आचरणाच्या बाबतीत नेहमी आंतरविरोधात असतो, सतत ताणतणावात राहणे हे शरीराला आणि आयुष्यालाच हानिकारक आहे, हे माहीत असूनही, यातून बाहेर पडणे शक्य आहे का -- असा प्रश्नही ज्याला पडत नाही, आपली मते आणि चांगले जगण्याबाबतच्या कल्पना याच मानवजातीच्या हिताच्या आहेत, असे ज्याला वाटते, दुसऱ्यांचे भ्रष्टाचार, दुसऱ्यांची युद्धे फक्त वाईट असे ज्याला वाटते, आणि जगण्यातले गोंधळ समजून घेण्याच्या बाबतीत जो बऱ्यापैकी आळशी असतो -- त्याला मिडिऑकर म्हणावे, म्हणजे कुणीच कुणाला मिडिऑकर म्हणायचा प्रश्न येणार नाही !"

"म्हणजे विषयच संपला ! या अर्थाचे निश्चित असे काही नाहीच आहे !"

"कधी जिनियस, कधी मिडिऑकर -- हे मान्य -- पण प्रासंगिक मिडिऑकर म्हणजे तरी काय ? मी माझा अर्थ आधीच दिलेला आहे -- ज्यांना वेगळे वाटत असेल त्यांनी सांगायला हवे --"

"असे हे मोघमात संपू नये -- प्रत्येकाच्या मते काय -- मिडिऑकर म्हणजे काय ?"

"average standard किंवा जे काय शब्दकोशात असेल ते, त्याचा अर्थ समोर यावा, नुसत्या प्रतिशब्दांचा काही उपयोग नाही."

"म्हणजे एखाद्या क्षेत्रात जिनियस आणि इतरत्र मिडिऑकर असे काही सुचवताय का घोटगळकर ? की once bearer is always bearer हे जसे बेअरर चेकबद्दल म्हणतात, तसे जिनियस म्हणजे सदोदित जिनियस ? आणि एखाद्या क्षेत्रातले प्रावीण्य, बौद्धिक असामान्यता यांमुळे माणूस मिडिऑकर या शब्दापासून वेगळा होतो का ?"

"average standard म्हणजे काय ? कमी शिकलेला ? हुशारी कमी असलेला ? कमी यश मिळवणारा ? की कारकून, मजूर, वर्कर ?"

"अहो, मी तर दुसऱ्यांना तसे म्हणायच्या विरुद्ध आहे --"

"म्हणून, देवा, न वाचणारे वाढव !"

"निरनिराळ्या क्षेत्रांतले प्रभुत्व ठीक पण -- सुखदुःखांत व्यग्र असणारे, कुणाचा तरी सूड घेऊ इच्छिणारे, यशासाठी हपापलेले आणि स्वतःचे वर्चस्व ठेवू इच्छिणारे -- असे सगळे mediocre च की ! उघड्याने नागड्याला हिणवण्यात काय अर्थ आहे ?"

"सगळ्यांनी शौर्य दाखवण्याची नेहमी गरज पडत राहावी, असा सगळ्यांनी आपापल्या मनांचा वापर करत राहावे -- हे मानवजातीचे वैगुण्य वाटते !"

"या विषयावर आम्ही डोके नाही चालवणार डॉक्टर, तुमचे ऐकणार !"

"सगळ्याच कलाप्रकारांत काव्य असते, यातले काव्य सोडून बोलायचे झाल्यास, कविता म्हणजे अमर्याद सूचकतेचा हरघडी नवनवा प्रवाह !"

" माझे व्यक्तिमत्व अनेक अनुभव घेत, सुखदुःखे भोगत, तडजोडी करत वा न करत, या प्रक्रियेत पडणाऱ्या प्रश्नांचा विचार करत, मार्ग काढत चाललेले असते. सगळ्यांचे हेच चालू असते. यात शोध कसला घेतला जातो ?"

“शेक्सपियर, पिरांदेल्लो, काफ्का, तुकाराम -- याच्यांतले कोणते विषय आता कुठे प्रस्तुत आहेत ? आणि तसे नसूनही त्यांच्या कलाकृती का प्रस्तुत आहेत ?"

"आयुष्यात घडणाऱ्या घटना हेच फक्त आयुष्य, असा गैरसमज पक्का होत जाण्याचे हे लक्षण दिसते --"

"विषय अप्रस्तुत होणे सध्या बाजूला ठेवू -- कलाकृती कधी अप्रस्तुत होते, हे पाहू --"

"तुझी पोस्ट अत्यंत अवघड आहे, असे म्हणायच्या ऐवजी, ' कित्ती सोप्पे ' असे मी म्हणतोय !"

"गिरीश, तेंडुलकरांची नाटके, एक ' सखाराम बाइंडर ' सोडता, बौद्धिक वास्तवात बद्ध आहेत. त्यामुळे, ते वास्तव अप्रस्तुत झाले की नाटकही अप्रस्तुत होते. ' शोध घेणाऱ्या ' नाटकांचे आहे हे लक्षण ?"

"प्रश्न पडणे हे तर जिवंतपणाचे लक्षण ! अभिनंदन !"

“याचा अर्थ, मी शोध घेतो वगैरे बोलण्यात फारसे तथ्य नाही !"

"मी शोध घेतो -- असे अनेक लेखक म्हणतात -- म्हणजे काय ? -- एवढाच विषय घेऊ --"

"आभास, तुम्हाला विषय नक्कीच कळलेला असणारच -- त्यावर बोला --"

"( परंपरागत कल्पनांवर आधारित असे सुभाषिते तयार करणारे लिहिणे म्हणजे जगणे समजून घेणे, असे समजणाऱ्यांना इथे विचारातच घेतलेले नाही. )"

"जगणे समजणे म्हणजे काय ? ते प्रत्येकाचे वेगवेगळे असेल तर त्याला ' जगणे समजणे ' का म्हणावे ? -- हाही प्रश्न यात आहे."

"अमुक एक नाटक करणे आव्हानात्मक आहे, हे महत्त्वाचे आहे, म्हणून केले पाहिजे -- असे मुद्दे आता अस्तित्वात नाहीत. त्यामुळे खाज, पॅशन, आच सगळे रद्द झालेले आहे. स्वतःची किंवा कलेची सुटका अशी होत नाही -- तुम्ही ज्या वातावरणाबद्दल बोलताय ते वातावरणच करते ही सुटका. मला किंवा तुम्हाला लाख काही करावेसे वाटले तरी योग्य टीमच नसेल किंवा ' शेवटी नाटक ' वाले लोक असतील तर काय घडणार ?"

"अभिव्यक्तीसाठी कुणाकडे काही आशयबिशय नाही आहे, हे आता सर्वमान्य आहे. मग मला ' मिळणार ' काय, हेच महत्त्वाचे ठरणार. शिवाय स्पर्धा खूप आहे -- त्यात मी खास स्पेशल ठरायची गॅरंटी कुठे आहे ? मग बाकीची मौजमजा तरी चालू द्या -- इथे सगळे येते ! कलेतून जगणे समजून घेणे हा मुद्दा रद्दच झालेला आहे. महत्त्वाकांक्षा आहे पण आच नाही, पॅशन नाही. अर्थ, आशय, दर्जाबिर्जा असे काही नसतेच म्हटल्यावर, हे घडणे अटळच की !"

"मी जर शहाणा नसेन तर मला शहाणा माणूस ओळखता येईल ?"

"सगळ्या सापांना मराठी सक्तीची केली पाहिजे -- म्हणजे मग ' माझा तसा हेतू नाही-- माझा तसा हेतू नाही ' असे म्हणत शेतांतून फिरता येईल !"

नीती व तत्वे यांची व्यवस्था...

"आदर्श आणि जगण्याची वस्तुस्थिती यांच्यातला झगडा हे माणसाचे वैशिष्ट्य आहे. ' फलाशा न धरता कर्म करावे ' हा आदर्श सगळ्यांना पाठ असतो पण त्याच्या विरोधातच जगणे चालते ! सुखशोध हेच मानवी मनाचे खरे ध्येय असल्याने 'आदर्श ' जगण्यात खूप फरक पडतात आणि नुसते एकाने दुसऱ्याचे दोष काढणे चालते --"

"आपल्या स्वामित्वाधिकारात असलेली स्त्री दुसऱ्या पुरुषाकडे पाहून हसली आणि त्यामुळे त्याला सुख वाटले, नुसते तिचे स्त्रीत्व बघूनही दुसरे कुणी सुखावले किंवा सगळ्यात भयानक म्हणजे तिच्याच मनाचा एक पार्ट क्षणभरच का असेना, दुसऱ्या पुरुषाकडे आकर्षित झाला तर या सगळ्याचा अर्थ त्या त्या प्रमाणात त्या प्रॉपर्टीची चोरीच झाली ! आपण ती प्रॉपर्टी नीट संभाळू शकलो नाही म्हणून आपले छुपे हसूच झाले ! -- हा प्रश्न खूप पुरुषांच्या डोक्यात असतोच ! तो कसा सुटू शकेल यावर बोलले गेले पाहिजे -- नुसता निषेध करून आहे ते चालू -- याचा उपयोग नाही --"

"पुरुषाचा मानापमान हा स्त्री-प्रॉपर्टी मिळवणे आणि टिकवणे यावर अवलंबून असलेल्या समाजात हे कुलूप लावण्याला वाईट वा विकृत कोण, कसे म्हणू शकणार ? डोक्यावर पदर, बुरखा हे का, तर तिच्याकडे नुसते पाहूनही कुणी सुख मिळवले तर ? तिच्या नुसत्या असण्यानेही कुणी तिऱ्हाईत सुखी होऊ शकेल -- मग यावर काय उपाय -- मारूनच टाकणे ?"

"काल-आज-उद्या मिळून असणारा आपला मानसिक काळ स्थितिशील होत त्याचेच व्यक्तिमत्व तयार होते. हे होण्यात हजारो वर्षांची उत्क्रांती, जनुकरचना, भाषा, संस्कार, संस्कृती वगैरेंचा सहभाग असतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तिमत्व मर्यादित -- समग्रतेचे भान नसलेले असते. त्याचे आकलन चुकणे भागच असते. काल-आज-उद्या असे करत बसण्यापेक्षा यांसह असणाऱ्या मानसिक काळात आपण जगतो -- असे पाहावे."

"माहिती, तंत्रज्ञान यांत विचारच हवा. अर्थ लावणे, मत बनवणे, न्याय-अन्यायाचे निष्कर्ष काढणे -- अशा बाबतीत ही गुरुंची पोस्ट आहे. विचार हे साधनच अपुरे आणि सदोष आहे. ते विचारकर्त्याच्या मर्यादांनी बद्ध असते."

"कुठल्याही घटनेचे कुठल्याही विचारक्रियेने केलेले विश्लेषण मिसगाईडच करते !"

"आपले मन, विचार या अर्धवट, मर्यादित गोष्टी आहेत -- यात विवाद्य काय आहे ? यांनी काढलेले निष्कर्ष कितपत अर्थपूर्ण असणार ?"

"' मी ' स्वतःच स्वतःचे समर्थन करू शकतो आणि जगण्यातले अत्याचार, भ्रष्टाचार, विषमता, युद्धे हे सर्व कसे वाईट आहे यावर बोलतही राहू शकतो ! इतकी ' भयानक ' विनोदी गोष्ट जगात दुसरी नाही !"

"याचे मात्र सध्या माझ्याकडे उत्तर नाही -- आळस कमी झाल्यावर सुचले तर बघतो !"

"आत्ता सुचले म्हणून सांगतोय -- याला उद्गारप्रश्न म्हणावे ( rhetoric प्रश्नाला. अन्यथा अलंकारिक प्रश्न वा वक्तृत्वप्रश्न -- हे आहे. )"

"हा एक मानवी आंतरविरोध म्हणून माफ करावा, ही विनंती !"

"आसक्तीच्या प्रेमात प्रतिसाद हवाही असतो पण अनाग्रहीही राहायचे असते -- हे द्वंद्व सुखदायकही असू शकते आणि त्रासदायकही --"

"यातली दुष्ट / अनैतिक माणसे त्या कार्यक्रमात, त्यातली तशी माणसे इकडे, असे केले असते तरी प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी येणे वगैरे ( ते अगदी खरे धरूनही ) आत्ता आहे असेच छान जमले असते -- कारण टोटल नैतिक माणूस म्हणजे काय, हे सांगताच येणार नसते !"

"तो कसा वाईट आहे हे आज आपण सगळे मान्य करू, उद्या तुम्ही-मी कसे वाईट आहोत हे आणखी कुणी मान्य करतील -- प्रत्येक वेळी आमीरखान कॉमन -- नैतिक बाजूला -- हे जरा खटकत नाही ? ( हा एखाद्या व्यक्तीबद्दलचा प्रश्न म्हणून पाहू नये )."

"वाईट वागण्याचे नमूने दाखवण्याच्या ज्या असंख्य क्लिप्स शक्य आहेत, त्यांतल्या एकाही क्लिपमध्ये वाईट वागणारी व्यक्ती म्हणून दाखवता येणार नाही, अशी एक तरी व्यक्ती ( स्वतः आमीरखान धरून ) त्या कार्यक्रमात वा कुठेही, का नाही असू शकत ? की असू शकते ?"

"प्रत्येक वेळी एखादी क्लिप दाखवून झाल्यावर -- ' बघा किती वाईट वागतात लोक, चांगले वागणे अगदी सोपे असून ' -- अशा अर्थाचा एक सुस्कारा आमीरखान टाकतो -- नैतिक श्रेष्ठत्वाचा आव न आणता समस्या समजून घेता याव्यात -- ते सुस्काऱ्याचे एक्स्प्रेशन बास आता, असे वाटते --"

"' अभी तो मै जवान हूँ ' असे म्हणण्यात न्यूनगंडाचा एक केविलवाणेपणा दिसतो -- त्याची मुळीच गरज नाही – "

वाचन-लिखाण....

"कळत-नकळत या उत्तर-आधुनिक धारणा व्यक्त झालेल्या असून, लेखन आणि वाचन यांबाबतच्या विचारांत संगतीही दिसते. मूळ कलाकृती वा मूळ लेखक असे काही नसते, वाचक कसे वाचतो तेच महत्त्वाचे, अशी ही धारणा आहे. स्वतःच्या लेखनाच्या बाबतीतही हाच खुलेपणा दिसतो. हे योग्य-अयोग्य म्हणण्याच्या आता पलिकडे गेलेले असून कलावंतांच्या अहंकारावर एक जालीम उतारा, असेही स्वरूप त्याला आलेले आहे. जसे आपले जगणे, आजूबाजूची परिस्थिती तशीच कलाकृती. ग्रेट, मास्टरपीस वगैरे काही नसते. कलाच काय, सगळ्याच क्षेत्रांत हे व्यक्तिमाहात्म्य खालसा होऊ शकले तर फारच छान होईल. कलावंतांनी विशेषतः, हे समजून घेऊन शहाणे होण्याच्या मार्गाला लागावे, असा काळ आलेला आहे. या पोस्टबद्दल चित्रा जोशी यांचे अभिनंदन !"

"मुळात अस्तित्ववाद म्हणजे एखादी विचारसरणी किंवा दृष्टिकोण नव्हे, हे आधी लक्षात घ्यायला हवे. ' वाद ' जोडला गेला की ' बंद ' पणा येतो."

"अहो, विचारसरणीसुद्धा जनुकनियंत्रित असते, असे संशोधन आहे ! मेंदूतल्या पेशी, रसायने जर जहालपणा पेलणारी नसतील तर ?"

"हे सगळे जनुकनियंत्रित !"

"म्हणजे मला प्रश्न तरी बरोबर पडला म्हणायचा !"

"मानाची असो, अपमानाची असो, त्या घटनेवर मन थांबले की ते बळी पडतेच !"

"आपण खरे काय आहोत हे समजले तरच बहाणा करता येईल -- असा असेल अर्थ ?"

"नुसताच एखादा नैतिक वा कायद्याचा एक पवित्रा म्हणून ही पोस्ट दिलेली नाही --"

"निष्कर्ष काढून असे विषय हातावेगळे होत नाहीत !"

"अस्तित्व म्हणजे असणे असू शकेल पण अस्तित्ववाद म्हणजे गळ्यात घालून मिरवण्याचे पदक !"

"आधी, जे आहे ते तर समजून घेऊ --"

"सर्व शेडसच्या सर्व मूडसची माणसे !"

"मनुष्यस्वभावाचे भान, गैर अर्थ होण्याच्या शक्यता, आपण लिहीत असलेल्या विषयाबद्दल आस्था -- यांमुळे आपली वाक्ये आपण रचणे शक्य होत असावे."

"ठीक ! आता पुढे पुन्हा हेच प्रश्न येणार ! नेमाड्यांना अस्तित्ववादी म्हणयचे का, यात ! मी एक दिवशी माझे आकलन मांडून टाकीन -- बघू --"

"आणि आता सांगतो -- ही माझी बोलायची पद्धत नव्हती आणि नाही -- कुणीही कुणाला क्षुद्र लेखायचे नाही, हाच चर्चेचा पाया हवा. जेके, तुकाराम हेसुद्धा असे करत नाहीत. कुणीही त्या आकलनाचा असू शकतो, हे मी नाकारत नाही.तुम्ही सांगता ते चर्चेचे नियम, शिस्त आणि तुम्ही सांगता ते शब्दांचे अर्थ मान्य करायचे, तर चर्चा कशाला ? आकलनाच्या अनेक पद्धतींना वाव ठेवा -- तुम्हाला सोयीची असलेली बौद्धिक पद्धत हीच फायनल, असे मी मानत नाही. त्यामुळे तुमच्यामाझ्यात संवाद होऊ शकत नाही, सध्या तरी, हे मान्य करू या आणि मुख्य म्हणजे, मैत्री कायमच ठेवू या रे !"

"तुम्ही मला विचारता, जेकेंकडून हेच शिकलात का ? -- हा कुजकेपणा नाही तर काय आहे ? तुम्हाला वाटेल ते फ्रीडम आणि दुसऱ्यांना मर्यादा , असे होत नसते. आणि तुम्ही मानता ती शिस्त, तेच शब्दार्थ या अटींवर कसली चर्चा होणार ? तुम्ही डिकंडिशनिंगच्या मुद्यावर बोलायाचे का टाळता ? आणि माफ करा, खूप अभ्यास केलेल्यांचे बौद्धिक विचकेही वेगवेगळे असतात, तुमचाच फायनल , असे काही नाही !"

"मिलिंद, एरवी जरी मी माझ्या परीने लाईट बोलत असलो तरी इथे तसे करत नाही. समाजात एकूणच ही टक्केवारी असावी ! उपचार न घेता फिरणाऱ्यांत कोणकोण असेल, हे सांगणे अवघड आहे !"

"लाखे म्हणताहेत त्याप्रमाणे डायरेक्ट जगणे समजण्याची प्रक्रिया, आपल्या आकलनाप्रमाणे, असे पाहता आले तर फारच छान होईल. पण नेमाडे हे मराठीतले अस्तित्ववादी लेखक आहेत, अशी तरफदारी अस्तित्ववाद न मानणारे तथाकथित विवेकवादी करू लागले तर त्याचे काय करायचे ?"

"प्रत्येक गोष्ट माहिती आणि बौद्धिक विचका यांतूनच समजते ही बुद्धिवाद्यांची पक्की धारणा असल्याने ते तसे करत बसतात. तुम्ही विवेकवादाची महती गाऊ लागलात म्हणून ठिकठिकाणी एकाच आकलनाला कशी अभिव्यक्ती मिळते, हे दाखवले. फेसबुकवरची माणसे असोत वा मी असो, सर्वांना काही कळत नाही असे म्हणत सुटण्यातही काही अर्थ नसतो. प्रत्यक्ष आकलनाला भिडायची वेळ आली की विवेकवादी लोक दुसऱ्यांना मूर्ख म्हणू लागतात. मी मांडलेले डिकंडिशनिंगच्या अभिव्यक्तीचे हे वैविध्य निश्चितच अर्थपूर्ण आहे. जे काही असते ते बौद्धिकच असते ही मर्यादा स्वीकारल्यावर जेके तरी काय समजणार ? पण जेकेंकडून काय शिकायचे ते मी सांगणार, असे म्हणणे हेच मुळात जेकेंशी सुसंगत नाही."

"खरे तर क्षण न क्षण असा छेद देणाराच आहे -- " रात्रंदिन आम्हा ... ' चा हाच अर्थ वाटतो --"

"

नीत्शेचे हे वाक्य अस्तित्ववादी उद्धृतांत समाविष्ट आहे. विवेकवाद हे काही मानवी प्रश्नांना अंतिम उत्तर नाही आणि विवेकवाद नाकारणे म्हणजे मुळातच काही वैगुण्य आहे, अशी मांडणी सदोष आहे. कोणतीही ठाम मते, दृष्टिकोण, विचारसरण्या हे सगळे कन्व्हिक्शन्समध्ये येते. ( माणसाच्या धारणा, विचारसरण्या वगैरे सगळे जनुकनियंत्रित असते, असेही आता संशोधन आहे. ) कृष्णमूर्ती ज्याला कंडिशनिंग म्हणतात तेच. अस्तित्ववादातही विवेकवादाला महत्त्व नाही, यामुळे कुणी तो नाकारू शकतो पण हेटाळण्यात अर्थ नसतो. सार्त्रने मांडलेली अस्तित्वाची वा स्वातंत्र्याची पायाभूत कल्पना विवेकवादाला छेद देणारीच आहे.अस्तित्व हे पायाभूत असून त्या स्वातंत्र्यातून ( जे कंडिशन्ड नसते, कन्व्हिक्शनविरहित असते ) कृती घडते, असे सार्त्र म्हणतो. याच अर्थाच्या ‘ रिकामे ‘ पणावर तुकारामाचेही बरेच अभंग आहेत. सारांश ‘ सत्य ‘ समजणे हे पूर्वग्रहयुक्त मनाला शक्य नाही, असा या वाक्याचा अर्थ आहे. इथे सत्य म्हणजे तुकारामाने ज्या ‘ सत्यअसत्यासी मन केले ग्वाही ‘ ते सत्य. अनुभवाच्या साठ्यातून, अनेक प्रकारच्या प्रचारांतून आणि प्रभावांतून तयार होणाऱ्या गोष्टींना हे सत्य म्हणत नाहीत, उलट सत्य समजण्यातले अडथळे समजतात. बुद्धिवाद, विवेकवाद यातून पूर्ण मानवाला महत्त्वाचे ठरावे, असे काय सापडले आहे ? तथाकथित विवेक हा कंडिशन्ड मनातून येत

असल्यामुळे कसाही वळवता, वाकवता येतो आणि माणसांचे आयुष्य आहे तसे विदीर्ण आणि संघर्षमयच राहते. त्यामुळे, हे लोक काय म्हणताहेत, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते."

"आख्खा नीत्शे आधी समजून घ्यायचा ( त्यातले मतभेद, हा भाग वेगळा ), मग तो इथे समजावून द्यायचा, मग त्या संदर्भात हे वाक्य देऊन त्याचा अर्थ सांगायचा आणि त्यावर पुढे चर्चा करायची ! इथे एफबीवर ! आहे का कुणी हरीचा लाल असा ?"

"हे एक कोटेशन आहे -- नीत्शेचा अर्थ काय होता, हा फारच वेगळा आणि अनादि-अनंत विषय होईल -- आपण बोलतोय या वाक्यावर -- ते बोलू या -- नाही तर मग अशा वाक्यांवर बोलणे, त्यांचा अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करणे, यात काही अर्थच नाही, असे म्हणू --"

"हे झाले मला समजलेले -- नाही तर मग , तुम्ही सांगा कन्विक्शन, ट्रुथ आणि लाय -- या शब्दांचे या वाक्यातले अर्थ -"

"मानवी प्रश्नांबाबत घट्ट स्थितिशील मते असणे आणि त्याप्रमाणे वागणे !"

"थोडे डायव्हर्शन चालेल असे गृहीत धरतो आणि एक काही वर्षांपूर्वीची ऐकीव गोष्ट सांगतो. एक म्हातारे समीक्षक पलिकडच्या फूटपाथवरून चालले होते आणि इकडून एक नवीनांची टोळी. या टोळीतल्या एकाने त्यांना शुक शुक करून इकडे बोलावले. नवीन कवी बोलावताहेत म्हणून तेही आले. टोळीतला एकजण म्हणाला की तुम्ही गांडू आहात. ते पुन्हा तिकडे जाऊन त्यांच्या मार्गाने गेले. हे म्हणाले, साल्यांचे असेच बुरखे फाडले पाहिजेत ! समजा ते म्हातारे गृहस्थ म्हणाले असते की, च्यूतमारीच्यांनो, तुम्ही काय बिनबुरख्यांचे फिरताय - बोलायचे का यावर ? काय झाले असते ? आपण दुसऱ्यांना नव्हे, फक्त स्वतःला सुधारायचे आहे ( कुणाला सुधारायचेच असेल तर ) हा एक महत्त्वाचा मुद्दा ठरावा."

"याचा अर्थ, माझे म्हणणे पोचवायला मी कमी पडतोय -- दुसऱ्या कुणी, शक्य तर, मदत करावी --"

"मग त्याला काय ठामपणे न बोलणे म्हणावे की संबंध संभाळणे म्हणावे ?"

"म्हणजे प्रगती एक्प्रेस कधी सुटते -- हेच ना ? ते ठामच हवे --"

"मानवी प्रश्न, मानवी संबंधांचे प्रश्न -- ठामपणाची निश्चित गरज ? मुळीच सहमत नाही --"

"सानेजींची विधाने मला खूपच संशयास्पद वाटतात --"

"कशाला सारखे तेच शब्द -- पुढे जाऊ --"

"क्लॅरिटीने बोलणे -- आपल्या आकलनाप्रमाणे बोलणे -- हे पर्याय ठीक होतील ( असे वाटते -- कारण, तुम्हाला अधिक चांगला पर्याय सुचू शकतो -- )"

"ठोस म्हणजे ठोसा नव्हे, हे तुमचे बरोबरच आहे सतीश -- पण समजा, शिवाय शक्यतो आक्रमक न होता बोलायचा प्रयत्न असणे, निदान मानवी प्रश्नांच्या बाबतीत आवश्यक वाटते -- इथल्या चर्चेतल्या अभिनिवेषामुळे मते आधिक घट्ट होऊ नयेत -- ठीक, आपण एकमेकांना वाव ठेवू --"

"जिंकणे-हरणे नव्हे हो, संवाद बंद पडू नये -- हेही नकोय ?"

"मित्रांनो, मैत्रीबैत्री गेली खड्ड्यात असे सगळ्यांचेच मत असेल तर माझीही हरकत नाही, मी दाखवू का माझा बेफिकीर ठोसपणा ? मला न पटणारा ?"

"कसली दगडाची ठोस मते ? कशाबद्दल ?"

"खूप अर्वाच्य आणि आक्रमकपणे बोलता येईल हो, पण बोलायचे का आपण असे ? आणि ठोस बोलणारे तरी काय साधताहेत ?"

"मानवी प्रश्नांच्या बाबतीतली ठोस मते चुलीत घाला पटकन ! माझ्या मुलीने परधर्मीयाशी वा परजातीत प्रेम करता कामा नये, असे ठोस मत असलेल्याच्या आयुष्यात नेमका तोच प्रसंग येतो ! जगण्याचा संगणक आपण कल्पनाही करू शकत नाही, इतका भारी असतो ! मग काय करायचे ? मुलीचा मर्डर नाही तर आत्महत्या ? प्रगती एक्स्प्रेस पुण्याहून किती वाजता सुटते, एवढेच ठाम वा ठोस सांगा -- बाकीचे ठोस विसरा !"

"ऑनर किलिंगवाले, तालिबानी कायदावाले, हिंदुत्ववादी किंवा कुठलेही धर्मवादी, साम्यवादी, असे कुणीही घ्या, मला वाटते, हे वाक्य अर्थपूर्ण असल्याचे निकराने सिद्ध करतात --"

एक मुठ्ठी आसमा

"बाहेरचे मूठभर सुख माझ्या आतले सगळे तप्त दुःख नष्ट करेल, हे माझ्या अनुभवातले नाही, पण माणसाला वाटते खरे असे !"

" विजय वगैरे नाही पण ही व्यक्ती म्हणजे हे, असे काही नसते, प्रत्येक संबंधात आणि रोजच्या रोज ते बदलत असते की नसते, हा प्रश्न आहे."

"कोणता तरी शनि-रविवार गाठू -- पाऊस जोरात लागला तर हॉट कॉफी पिऊ ! दोन्ही पैलवान आणि अंपायर एकत्र हवेत !"

"आता एकमेकांची मते कळलेली आहेत, यापुढे तोच तोपणा येत राहील, त्यामुळे कृपया इथे समारोप समजावा. एकजण मला ठोस बोलण्याच्या विरुद्ध आणि दुसरे ठोस न बोलण्याच्या बाजूचे समजले, हे दुर्दैव ! निदान इथे तरी मला, ठोसबीस जाऊ द्या, बोलताच आले नसावे, बहुतेक ! पण, असो ! हा दि एण्ड समजावा आणि शांत व्हावे, हे मी ठोसपणे सांगून थांबत आहे ! धन्यवाद !"

"हे नुसते नाव समजू -- जसे कोल्हापुरात सगळेच असणार, तसे --"

" या विषयांवर सविस्तर, अभ्यासपूर्वक लिहावेसे वाटते -- पण मी सर्जक लेखनाला महत्त्व देत असल्यामुळे ते मागे पडते -- तरीही मी या अंगाने बरेच लेख लिहिले आहेत -- पण अग्रक्रमांच्या मर्यादा येणारच --"

"चालेल -- नेमाडे, तेंडुलकर हे अस्तित्ववादी आहेत का ? -- हा प्रश्न घेऊ --"

"अगदी बरोबर -- तसे जरूर करू -- इथे अस्तित्ववाद, अतिवास्तववाद, वगैरे सगळ्या याद्यांत तेच तेच लेखक सापडतात -- परवा एका समीक्षकाचे एक वाक्य वाचले -- ही कलाकृती अस्तित्ववादाशी नाते सांगणारी आहे ! -- हे काय लफडे आहे ? अस्तित्ववादाशी नाते ?"

"नेमाडे हे मला व्यक्तिगत ' मत ' या स्तरावरचे संकुचित लेखक वाटतात -- म्हणून ' अस्तित्ववादी ? ' -- असे म्हटले."

" तुम्ही म्हणता ते सगळे मी वाचलेले नाही, पण नेमाड्यांचे थोडेफार मी वाचलेले आहे -- त्यांचे लेखन -- टीकास्वयंवरमध्ये दिसणारे आकलन मुळीच अस्तित्ववादी नाही -- मानवी मनाच्या विश्लेषणात्मक अंगापलीकडे नेमाडे जात नाहीत --"

" तुमच्या वागण्याबोलण्याच्या पद्धती आणि माझ्या यांत फरक असणारच -- तुम्ही कसे बोलावे, हे मी तुम्हाला सांगत नाही --"

"नेमाडे ? अस्तित्ववादी ?"

"मी मोघमपणा करत नाही -- अस्तित्ववाद ही नुसती बौद्धिक, भल्याबुऱ्या अनुभवाची चीज आहे का, याचा विचार करावा --"

" अस्तित्ववादी परंपरा आपल्याकडे लिटल मॅगेझिनने वा शहाणे-नेमाडे-भाऊ पाध्ये यांनी आणली. -- हे वाक्य संशयास्पद आहे -- हा तो प्रश्न --"

"करेक्ट ! आणि कोण मी ! -- हेही आहेच !"

"माझ्यामुळे कुणी दुखावले गेले की मी हलकट असतो, माझा त्या व्यक्तीला दुखावण्याचा हेतू नसला तरीही -- ( हेतू असला तरीही प्रतिमाच ! )"

"नुसती गंमत नाही -- एकच व्यक्ती, त्या व्यक्तीला ग्रेट समजते, दुसरी त्याच व्यक्तीला हलकट !"

"मी धूर्त प्रतिमा आहे -- त्यामुळेच आधी तुमच्याशी करार करून टाकला !"

"अनंतजी, ग्रेटपणाचे सिंहासन आपण वाटून घेऊ या !"

"अनंतजी खरे बोलत आहेत ! पण --"

"किंवा कुरूप ! प्रत्यक्ष हे स्वतःकडेही उपलब्ध नसते आणि दुसऱ्यांकडेही !"

"मित्रांनो, या विषयावर माझे बोलून झाले आहे -- आता मुख्य कार्यक्रम असेल तर प्रेक्षक, वाचक म्हणून मी इथे असेन."

"होय ! पण जाऊ द्या, माझा नको विषय -- दुसरे बोलू --"

"कधीकधी मला गंभीर आणि लाईट एकच वाटते ! खूप आक्रस्ताळेपणाने मी कधी बोललो तर क्षणात मला ते लाईट म्हणजे बिनमहत्त्वाचे असल्याचे कळते ! हा वेडेपणा असेल का ? आणि दुसरी विचित्र गोष्ट म्हणजे खूप गंभीर असताना मला जितके लाईट वाटते तसे एरवी कधीच वाटत नाही !"

"अशा मानवी प्रश्नांवर बोलतानाही आपण ठोस मतांच्या अंगाने जाणार असू तर ईर्षा, डावपेच, गटबाजी हेच मार्ग स्वीकारले जातील. मला हे मार्ग इथे मैत्रीचे वातावरण टिकू देणार नाहीत असे वाटते. मी स्वतः हे करणार नाही पण तसेच इथे खूपजणांना आवडते, असे झाले तर मला इंटरेस्ट राहणार नाही. मला इंटरेस्ट वाटते की नाही ही एक नगण्य गोष्ट आहे, याचीही मला जाणीव आहे."

"मी चर्चेची एक चांगली शक्यता सांगतोय -- ठोस मते मनात ठेवायची आणि ती बोलणे टाळायचे, असे मी म्हणत नाहीय. चर्चा म्हणजे ठोस मते, निष्कर्ष मांडणे ही एकच पद्धत, असे समजल्याने ' संवाद ' होत नाही, नुसतीच एकमेकांची मते कळतात. मानवी प्रश्नांवरच्या अशा चर्चा निष्फळ ठरतात, असे मी म्हणतोय. ठोस आणि बिन-ठोस असे एकच धरून बसल्यामुळे कसलेतरी ' समर्थन ' वाटतेय. तसे मुळीच नाही. नुसती ठोस मतांची देवाणघेवाण कंटाळवाणीही होईल. एकदा मी हिंदुत्ववादी आहे आणि तसेच सगळे पाहणार म्हटले की खूपजणांचे इंटरेस्टच संपेल. उलट मोकळेपणा ठेवून, हमरीतुमरीवर न येता होणारी चर्चा अधिक फलदायी असेल. आपण इथे चर्चा करतो त्यातले बरेच प्रश्न बौद्धिक उत्तरांनी शमणारे नसतात, म्हणून अशा चर्चा ओपन ठेवणे जास्त चांगले."

"मी आता तेच पुन्हा ठोसपणे म्हणत नाही ! आणि इथे मित्र म्हणून एकमेकांशी बोलताना प्रत्येकाचे ( आपल्या मते असणारे ) मूल्यमापन मनात ठेवून बोलणे शक्यही वाटत नाही."

"नुसती मतमतांतरेच असतात आणि आकलनाची प्रक्रिया असूच शकत नाही, असे म्हटले की विनर कोण, एवढेच उरते !"

"एखाद्या वेळी कशाला महत्त्व द्यावे याबाबतच्या दृष्टीत खूप फरक असल्याचे लक्षात येते, त्याच्या पुढे बोलत राहणे हे चर्चेपेक्षा वादाकडे आणि भांडणाकडेही जाते. माझेच वाक्य अंतिम असले पाहिजे, याची गरज नाही."

"नम्रपणा कसा, किती असावा-नसावा याबाबतची मतमतांतरे ठीक, मला दुसऱ्याच एका मुद्याकडे लक्ष वेधायचे आहे. इथे आपण बऱ्याचदा मानवी जगण्यातले प्रश्न किंवा कला-प्रक्रियेतले प्रश्न यांची चर्चा करतो. अशा ठिकाणी ठोसपणापेक्षा तो विषय ओपन ठेवत थोड्या अनिश्चित पद्धतीने ( hesitantly ), सर्वांनी मिळून समजून घेण्याच्या रीतीने हाताळला जाणे जास्त चांगले, असे मला वाटते. कारण नुसतीच जर निष्कर्षांची गर्दी होणार असेल तर ती चर्चा न होता निरर्थक बडबड होईल. इथे ठोस बोलण्याने नुसतेच अभिनिवेष माजतील आणि या वाटेला जाऊन काही उपयोगच नाही, हे लक्षात आल्याने असल्या ' चर्चा ' बंदच पडतील."

"एक मित्र मला उद्देशून म्हणाले, ' हा तुमचा पॉईंट ऑफ व्ह्यू आहे असे म्हणता येईल असे वाटते ' यावर दुसरे मित्र पहिल्याला म्हणाले की ' म्हणता येईल असे वाटते ' असे गुळमुळीत बोलू नकोस, ठोस बोल ' , त्यावर पहिले मित्र म्हणाले, ' असे वाटते, असे मी चंप्रंबद्दलच्या आदरामुळे म्हणालो आहे, माझे म्हणणे मी सांगितलेलेच आहे. ' --- यावरून सुरू झाली ती घनघोर लढाई ! शेवटी, या लढाईसाठी स्वतंत्र मैदान उपलब्ध करून देणे आणि मीही त्या चर्चेत ( लढाईत नव्हे ) भाग घेणे अशी दोन आश्वासने देऊन ती लढाई तात्पुरती थांबवली. तेच हे स्वतंत्र मैदान !"

"" वाद विजयासाठी लढविले न जाता सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी लढविले जाऊ लागले तर त्यांतल्या वादी-प्रतिवादींना वाद वाढविण्याचे तसेही कारण उरत नाही हाही या क्षेत्रातला वैचारिक विशेष आहे. " -- ' मन्वंतर ', सुरेश द्वादशीवार."

"हेही ते नव्हेत --"

"आपले ते दोन मित्र अजून मैदानात यायचे आहेत -- तोवर आपले हे पोवाडे वगैरे चालवू --"

"आपल्या दोन मित्रांची माझ्या एका पोस्टवर या विषयावरून दुपारी मैत्रीपूर्ण लढत झाली, ती या पोस्टला पार्श्वभूमी आहे."

"अरे, ' ठोस बोलणे ' यात ते सगळे गृहीत असणार -- ठोस म्हणजे उद्धट नव्हे, हे तुला म्हणता येणार -- मिलिंदही या विषयाच्या बाजू मांडू शकेल -- आणि मुख्य म्हणजे, आता हाच विषय असल्याने इतरही अनेक इच्छुक फ्रेंडस यात त्यांच्या पद्धतीने सहभागी होऊ शकतील. चला तर !"

"तुम्ही दोघांनी एकमेकांवर रोखलेले भाले आता तुम्ही माझ्यावर रोखून उभे आहात, असे चित्र मला दिसतेय -- मी असे करतो -- ' ठोस बोलणे ' ही एक नवी पोस्ट देतो -- तिथे हा सामना रंगवू -- मीही भाग घेईन -- म्हणजे इथे भाग घेणारे जे आणखी लोक आहेत त्यांना उगीचच थांबायला नको -- त्यांना त्यांच्या कामांना जाऊ देत -- यावर तुम्हा दोघांची ठोस ( पण सौम्यपणे मांडता येतील अशी ) मते सांगा --"

"( कधी असलेल्या आणि कधी नसलेल्या ) बुद्धीमुळेच !"

"बरे, माझ्यातर्फे कोल्ड कॉफी ! चला !!"

"संध्याकाळी भरतवर भेटायचे का, मी अंपायर व्हायला तयार आहे आणि कुणाच्याही कुस्त्या ड्रॉ करून देण्याचे कौशल्य माझ्याकडे आहे !"

"बरे, मित्रांनो, तुम्ही दोघेही मला माहीत आहात, आपापल्या पद्धतीने काही कामे करत आहात आणि तुमची कामे किरकोळ वा नगण्य मुळीच नाहीत. पण असे फार भिडल्यामुळे उगीचच एकमेकांना कमी लेखले जाणे घडते आहे. तसे प्लीज करू नका."

"आपण सगळेच आपापली मते,विचार घेऊनच इथे येतो, हे गृहीत आहे -- पण चर्चेसाठी आपण ओपन राहू शकलो तर बरे. गंमतीजंमतीत वेगळे पण गंभीर चर्चेत दुखावले जाण्याचा धोका असतो, तो धोका टाळता येऊ शकतो."

"आकलनाअभावी विद्वत्ता कुचकामी ठरणे हे समीक्षेत अनेकदा होते याउलट आकलन आणि विद्वत्ता दोन्ही असलेले मार्टिन एस्लिनचे ॲब्सर्ड ड्रामावरचे पुस्तक ग्रेट म्हणावे लागते."

"भरपू sssss र !"

"आकलन आहे पण विद्वत्ता नाही, हे शक्य आहे."

"झालेय आता चालू आपोआप -- धन्यवाद मित्रांनो !"

"एखाद्या विषयाच्या अनेक बाजू, कंगोरे समोर येणे हे एफबी चर्चेत घडू शकते -- त्याहून जास्त हिरीरीचे इथे काही नाही -- धन्यवाद !"

"हा ' रिवाज ' जगण्यात येण्यात -- स्त्रियांनी स्वतःला कमी समजणे, पुरुषाला खुश करत राहणे हेच अति-महत्त्वाचे समजणे, वाढत्या वयामुळे सुरक्षितता कमी होते, असे समजणे -- अशा गोष्टी कारणीभूत आहेत. समानतेमुळे ही कारणे जातील. इतर कोणत्याही विश्लेषणाप्रमाणेच हेही विश्लेषण अपुरे असू शकते."

"" तसेच बायकांनी वय लपवण्याचा रिवाज पुढील काही वर्षांमध्ये इतिहासजमा होणार आहे. . " आणि ते समानता प्रस्थापित होत गेल्यामुळे होईल."

"ही सगळी चर्चा अंदाजांवरच भागवावी लागणारसे दिसतेय -- स्त्रियांचा सहभागच नगण्य !"

"मला वाटते, हा महत्त्वाचा विषय आहे -- स्त्री-पुरुषांनी खुलेपणाने बोलायला हवे --"

"सेक्स अपील हाच विषय घेतला तरी ते फक्त शारीरिक असते का ?"

"फक्त तारुण्यामुळेच स्त्रिया आकर्षक असतात ?"

"एफबीवरच्या जन्मतारखा तपासा म्हणजे फरक लक्षात येईल !"

"असे करणाऱ्या स्त्रिया तुलनेने अधिक लिंगभान असलेल्या आणि स्वतःचा आकर्षकपणा फक्त कमी वयातच आहे, असे समजणाऱ्या असतात का ?"

"धन्यवाद ! या शोधाचा काय उपयोग होऊ शकेल याची मजेदार कल्पना आजच्या लोकसत्तेतील ' अन्वयार्थ ' वाचून करता येते. समजा अ हा भारतीय प्रियकर मुंबईत आहे आणि त्याची प्रेयसी ब पॅरीसमध्ये आहे. अ चे वस्तुमान इथे काढून घेतले की इथून तो अंतर्धान पावणार आणि पाव सेकंदात तो पॅरीसला पोचणार आणि तिथे त्याला पुन्हा वस्तुमान दिले की तो तिथे प्रगट होणार ! ब च्या जवळ ! वाहन नको वा विमान नको !"

"नीलेशना इथे भांडणाचा कुठे वास आला ? मला असे काही जाणवले नाही. फेसबुकवर एकाच ठिकाणी मला असे दिसले -- ' धर्म -- मराठी ' नामक एक ग्रुप आहे, तिथे मी सभासद कसा झालो, कोण जाणे ( मी विनंती पाठवली नव्हती, पण स्वीकारली असू शकेल ) तिथे जातीय, धार्मिक अशा सर्व भेदांवरून लढाया चाललेल्या दिसल्या ! तो ग्रुप सौहार्दासाठी काढला आहे, असे त्यांनी म्हटले आहे ! नीलेश, गैरसमज नको, परत या --"

"अवधूतजी, नीतीकल्पना, ' चांगल्या ' च्या कल्पना या समूहागणिक आणि व्यक्तिगणिकही वेगवेगळ्या असतात याची कारणे परंपरा, सवयी, सत्ताधाऱ्यांनी सक्तीने गळी उतरवलेली तत्त्वे -- अशीच असतात. म्हणून पूर्वग्रहदूषित म्हणायचे. यात क्लॅरिटी म्हणजे काय असू शकेल ?"

"विवेकवादाला मर्यादा आहेत, तो सदोदित अबाधित असू शकत नाही, असे सुचवण्यासाठीच ती शब्दयोजना केलेली आहे. तेही सश्रद्ध लोकांसारखेच हेकट असतात, असे अनेकदा दिसते."

"एखाद्या गोष्टीवर मला माहिती कमी असू शकते, समजही कमी असू शकते -- ती भरपाई करणारी जी व्यक्ती ती तज्ञ ! ती इथे कुणीही असू शकेल -- विशेषतः विज्ञान क्षेत्रातला अभ्यास असलेली वा तथाकथित विवेकवादी / बुद्धिनिष्ठ, वगैरे. ' मला हे समजत नाही ' हे प्रामाणिकपणे म्हणणे, ही पाळवाट नाही, एवढेच मी म्हणू शकतो."

"रूढी, प्रथा, परंपरा, सवयी, प्रेरणा यांबद्दल इथे वारंवार बोलले जातेय -- या सगळ्याला आपण कंडिशनिंग म्हणू. सतीची चाल, ऑनर किलिंग, तालिबान्यांचे कायदे -- हे सगळे त्या त्या वेळचे सत्ताधारी कंडिशनिंग असल्याने समर्थनीय ठरू शकते का ? एका प्रकारचे कंडिशनिंग असलेल्या व्यक्तीने दुसऱ्या प्रकारचे कंडिशनिंग असलेल्या व्यक्तीबद्दल तीव्र नैतिक भूमिका घेणे कितपत अर्थपूर्ण असते ? ' मी खूप नैतिक आहे ' अशा प्रखर आत्मविश्वासाने, ताठ मानेने दुसऱ्यांकडे पाहात फिरणे, याचा अर्थ काय समजावा ?"

"प्रत्येक माणूस, इतरांच्या दृष्टीने कुठेतरी घसरलेला असू शकतोच ( अगदीच खून आणि बलात्कार हे विषय सोडूनही यात अगणित छटा असू शकतात ) तर त्या टोटल माणसाला निकालात काढले जाणे, हा महत्त्वाचा प्रश्न वाटतो."

"अनंतजी, तुम्ही काय म्हणताय ते खरेच मला समजले नाही -- मी कुणाचा मावळा नाही आणि माझे कुणी मावळे नाहीत -- या पद्धतीने मी इथे आहे -- मला आपल्या चर्चा खुलेपणाने चालतात, असे वाटते -- मला प्रॉब्लेम नाही -- इथे काय जिंकायचेय ?"

"' अनिष्टाचे समर्थन ' हाच तर प्रश्न आहे -- मान्य -- त्याचे निराकरण सांगता येत नाही, हा आहे प्रॉब्लेम !"

"सगळ्यांचीच मते आपापल्या पूर्वग्रहांनी दूषित असतात आणि बहुमत म्हणजे सत्य नव्हे !"

"तुम्ही स्वतःबद्दल खरे बोलल्यामुळे माझ्यावरही स्वतःबद्दल खरे बोलण्याचे जे संकट येते, ते मी टाळत असल्यामुळे माझ्यात अपराधी भाव येतो !"

"लाखेजी, हे शब्द देव असण्यानसण्यापेक्षा मानण्या न मानण्याशी संबंधित दिसतात."

कविता कशाशी खातात

"कविता अनेक प्रकारची असते, मान्य. ती मूल्यात्मक कधी होते, त्याबद्दल इथे काही नाही."

"अजिंक्य कुणीही काहीही सांगून उपयोग काय ? क्षणभर का असे ना, एकात्मता असेल किंवा नसेल --"

"Integrity या विषयावर जेकेंचे बरेच आहे, ठिकठिकाणी. आपल्या सगळ्या कृती या दुभंगलेल्या मनाने चालतात हे आपल्याला अनुभवताही येते. मन हे हजारो प्रश्न, आकर्षणे इत्यादींत विभागलेले, विदीर्ण झालेले आणि सतत घर्षणमय अवस्थेत असते, हेही जाणवू शकते. ही सततची त्रस्त, बंदिस्त आणि हिंसक अवस्था असते. या अवस्थेतली माणसे देवाबद्दल बोलत आहेत -- असे इथे दिसते."

"माफ करा, पुन्हा मला तुकारामाच्या मदतीनेच बोलावे लागेल. त्याच्या मते देव म्हणजे एकात्म मन. नास्तिक म्हणेल एकात्म मन असू शकत नाही, आस्तिक म्हणेल, असू शकते आणि तिसरा या दोघांचा अर्थ लावणारा. तिघेही बौद्धिक बोलत एकात्म मनाचा शोध टाळणारे !"

"तिन्ही भूमिका पलायनवादीच आहेत."

"मर्यादित कण सापडू शकतो -- अमर्याद देव कसा सापडणार ?"

फेसबुक जुमांजी....

"मित्रवर्य अमरजी, तुम्हाला वाटतो तसा मी खरेच असेन-नसेन, पण इथे माझी उपस्थिती असेल, हे नक्की. आपण निश्चितच एकमेकांचे हितचिंतक आहोत."

फेसबुक जुमांजी....

"अमर गंधर्वांचे फेसबुक अधिकाधिक समृद्ध होवो ! म्हणजे आपलेच एफबी !"

"सगळ्यांचे सगळे वाचणे शक्य नसतेच विवेकजी ! निवड कशीही केली तरी ती पूर्ण बरोबर असूही शकत नाही. मी बापटांचे काही नियतकालिकांतून आलेले लेख वाचले आहेत, तेही त्या त्या वेळी समजून घेणे, असे."

"विजय तेंडुलकरांवर निघालेल्या माहितीपटाच्या वेळी प्रा. बापटांनी खूप सविस्तर विचार मांडले होते पण ते सगळे त्या माहितीपटात समाविष्ट होऊ शकले नाहीत, असे कळले होते. नंतर ते कुठे आले का ते माहिती नाही, पण लेखरूपात तरी ते विचार उपलब्ध असावे, असे वाटते. त्यात मार्मिक मुद्दे असणार, हे निश्चित !"

काकू, मी वेडी नाही ना हो !

"प्रश्नच नाही -- माझा पाठिंबा !"

"आणि जन्मसाल देण्याचे धाडस तुमच्यात आहे जे बहुसंख्य स्त्रियांत नसते ! जन्मसाल देण्याची हिंमत ठेवल्याशिवाय स्त्रियांचे समानतेचे दावे खोटे आहेत !"

"स्वातीजी, तुम्ही तांत्रिक क्षेत्रातल्या आहात असे माझ्या लक्षात आहे -- पुन्हा पाहीन तुमचे प्रोफाईल -- पण तुम्ही वेगळ्या आहात !"

"कुठल्याच माणसाची कुठलीच कृती बिनमहत्त्वाची नाही, जर सगळे एकत्र असेल आणि सगळ्याच कृतींचे एकमेकांवर परिणाम होत असतील --"

"प्रश्न न पडणारा माणूस दुःखात रमतो ! विकृत दिसेल, पण खरे आहे की नाही ते तपासा --"

"संतोष, तुमचे म्हणणे बरोबर आहे पण माणूस दुःखातही रमतो हे तुमच्या पाहण्यात नाही ?"

"मी त्या कथेचे मजेदार वाचन ऐकलेले आहे ! अभिनंदन ! मिलिंद, रक्कम किती असते बक्षिसाची ? मी धरून चार जवळचे मित्र बोलवा. पहिली मीटिंग फक्त खर्चाची पद्धत काय असावी, यावर घेऊ. त्या मीटिंगनंतर मग काळजीच नाही ! पहिली मीटिंग अर्थात रक्कम हातात पडल्यावर, पैसे खिशात ठेवून आणि ते खर्च करायच्या तयारीनेच घ्या !"

"इथे बोलताना शक्यतो माझ्या समजुतीतून मी बोलतो, पुस्तके, व्याख्या टाळतो. विद्वत्ता म्हणजे विशिष्ट अभ्यासातून जमवलेला माहितीसाठा आणि तो वेळोवेळी वापरण्याची कुवत. आकलन ही गोष्ट मला शहाणपण / विजडम या अर्थी वापरावी असे वाटते. आकलन हे विद्वत्तेवर अवलंबून नाही, असे मला दिसते. आकलन म्हणजे परिपक्वता, जगण्याची समज -- आणि ही एकच गोष्ट, सापेक्ष नाही, असे माला वाटते."

"तांबे म्हणतात त्याबरोबरच, कुणाच्याही अधिकारवाणीशिवाय सर्वांच्या सहभागातून ज्ञानाची प्रक्रिया घडणे हे इथे सर्वोच्च महत्त्वाचे ' जगणे ' घडू शकते. लाखे म्हणतात त्याप्रमाणे तांब्यांनी उल्लेखिलेली इतरही अंगे असणे हे त्याज्य मानायचे कारण नाही. आपणही कधीकधी इथे गंमती, मजा, हास्यविनोद करतो -- त्यात वाईट काय आहे ? आपले तेवढेच अंग पाहून एखादा आपल्याला टोटल निकालात काढू शकेल. पण आपण तेवढेच नसतो. तसेच फेसबुक म्हणजेही फक्त अमुकच, असे नाही. नुसत्या स्ट्राँग प्रतिक्रिया, काही समजायला मदत करत नाहीत."

"दुःख भोगणे पण दुःखातच जगायला हवे का, असा प्रश्न न पडणे, याला कोण हरकत घेणार ? पण ते शहाणपणाचे जगणे नाही असे वाटणाऱ्यांपैकी मी एक आहे, इतकेच --"

"माहितीतून होणारे ज्ञान हे आपण उपयुक्त ज्ञान म्हणू, नवनिर्मिती म्हणजे नक्कीच उपयुक्त ज्ञानाच्या कक्षा ओलांडणारी गोष्ट आहे. आपण इथे, मला वाटते, मुख्यतः जगण्यातले प्रश्न आणि कलाव्यवहारातले प्रश्न यांची चर्चा करतो. एखाद्या प्रश्नाचे समग्र भान येणे, त्याची रचना समजणे, त्याच्या बौद्धिक निराकरणाची शक्यता जोखता येणे -- याला मी ज्ञान म्हणतो. ते इथे चर्चारूपातून व्यक्त होत राहू शकते, हे मला महत्त्वाचे वाटते.( विद्वत्ता भरपूर असूनही मूल्यभान नसल्याने आणि फक्त बौद्धिक कसरतींतच ज्ञान असते, असे समजल्याने सगळी विद्वत्ता कुचकामी होण्याचे उदाहरण म्हणून नेमाड्यांचे ' टीकास्वयंवर ' पाहता येते.)"

"मूळ पोस्टमधला उपरोध वर स्पष्ट केला आहे -- प्रश्नच न पडणे --"

"मुळात तांबेच फेसबुक-कृपेने बऱ्याच दिवसांनी भेटले आहेत आणि आपण सगळेही भेटत असतो. या माध्यमाच्या बाजूने सांगण्यासारखे मुद्दे बरेच आहेत, पण संक्षिप्त स्वरूपात संवाद साधला जाणे, हे आजच्या काळाला अत्यावश्यक असे

महत्त्वाचे वैशिष्ट्य इथे आहे. ' विद्वत्तेशिवाय आकलन शक्य असते की नसते ' हा एक महत्त्वाचा विषय या निमित्ताने चर्चिला जाऊ शकतो. इथे त्याची उपपोस्ट करून गोंधळ करण्यापेक्षा ती स्वतंत्र पोस्ट म्हणूनही देत आहे."

"मान्यताप्राप्त नाव ' लोकशाही ' हेच आहे, पराभूत लोक तिला झुंडशाही म्हणतात !"

"हा प्रकार म्हणजे, तुमचा कुणी शत्रू तुम्हाला मराठी-हृदयसम्राट करायच्या प्रयत्नात आहे !"

"प्रश्नच न पडणे ! प्रचंड अजब !"

"खूप सीरीयल्स पाहणे, खूप पदव्या मिळवणे, धंदा -- काहीही घ्या --"

"तीन उद्गारचिन्हे आहेत -- जरा उपरोधिक -- हेही बघावे --"

"' इन्स्टंट यशाची हाव ' -- तू आपल्या गप्पांना दिलेले शीर्षक -- आठवतेय ना ? ' लोकमत ' ?"

"नाही -- रममाण होणे, यावर याव्यात कॉमेंटस --"

"शुभा गोखले यांचा लेख वाचला. या चर्चेत चांगली भर पडली आहे !"

"त्यामुळेच माझे वाक्य लिहिले गेले --"

"आत्ताच्या वाक्याला एक गंमतीशीर अर्थ आहे !"

"अनंतजी, हे छान असले तरी ती वाचून तुम्हाला आवडणे / न आवडणे दोन्ही अधिक योग्य होईल !"

"या सगळ्याला अनेक कारणांनी असणारे अपवाद असतीलच -- शंभर टक्के अशा अर्थाने हा विषय चाललेला नाही --"

"And the ideal means something that is not in existence !"

"सुखतत्त्व हा यातला मूलभूत फोर्स आहे. माझ्या एका नाटकात एका पात्राचा असा संवाद आहे -- " ज्या ज्या गोष्टींचे सातत्य आपल्याला हवेसे वाटते, ते सगळे उपभोग्यच ! आपले स्वतःचे सातत्य आपल्याला हवेसे वाटते, म्हणजे आपण स्वतःही स्वतःला उपभोग्यच ! " सुखतत्त्व हे फक्त शारीरिक घटना घडण्यावरच अवलंबून असते, असे नाही."

"नुसते शारीरिक नाही, मानसिक, लिखित, संवादातील, सिग्नल्समधून, असे खूप --"

"हे द्वंद्व कितपत व्हॅलिड आहे, असा प्रश्न --"

"आज अनेकांच्या मनात असलेले द्वंद्व पायाभूत धरले आहे --"

"सचिन, काहीच गृहीत न धरण्याचा मूळ प्रश्नात प्रयत्न आहे, पण ज्यांना काही गृहीत धरायचे आहे, त्यांनीही बोलावे, हा हेतू आहे -- माझे म्हणाल तर तुम्ही म्हणता तेच माझेही आकलन आहे -- आधीच बंदिस्तपणा नको म्हणून सर्व चर्चा ओपन ठेवलेली आहे --"

"खरे आहे -- आपण आजच्या आपल्या अवस्थेच्या आणि जगण्याच्या संदर्भात, आपल्या आकलनातून बोलणे हेही महत्त्वाचे वाटते -- अर्थात फ्रॉईड सगळीकडे झिरपलेला असणे, ही एक ठळक पार्श्वभूमी असणारच आहे --"

"हं -- अच्छा ! मग तर या प्रश्नाचा प्रचंड आवाकाच उघड होईल !"

"सचिन, होय, मान्य -- तुमचा ' पुरुषा-पुरुषांतील ' तील मैत्रीचा प्रश्न जरा स्पष्ट व्हावा --"

"अविनाशजी, शास्त्रीय दृष्ट्यासुद्धा या विषयाला कधी पूर्णविराम नसतो, हे लक्षात घ्या --"

"सचिन, हाही प्रश्न याच चर्चेत अंतर्भूत करू या, पण या प्रश्नाला थोडे स्पष्टीकरण हवेसे वाटतेय -- हा प्रश्न ' सम ' विषयक आहे की एकाच स्त्रीचे दोघांना आकर्षण वाटणे, अशा अंगाने आहे, ते कळावे --"

"प्रचंड उलथापालथीनंतर साधा परिपूर्ण स्वीकार ! कडेलोट शांतता !"

"गिरीश, फारच छान, हे नीटच वाचायला हवे --"

"खेळाच्या मर्यादा पार करून विशाल आता अंपायर झाला आहे ! अभिनंदन विशाल !"

"चवचाल नदीची धार मिटवून वेडावले बाळसेदार !"

"आणि विशाल, वाक्ये नुसती चुकीच्या अर्थाची नकोत -- निरर्थक हवीत."

"अजून चालू आहे कामकाज -- आणि ही स्पर्धा नसून संमेलन आहे."

"गिरीशच्या कॉमेंटमुळे एक लक्षात येतेय -- आपला हा खेळ, भाषा, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि मेंदूविज्ञान यांच्या अभ्यासकांना पुढेमागे उपयोगी पडण्याची शक्यता आहे. हा पूर्ण निरर्थक वाक्य-साठा आपण फ्री उपलब्ध ठेवू. ( अर्थपूर्ण लेखनाला इथे रॉयल्टी देण्याची पद्धत नाही, अशा निरर्थकतेला काय मिळणार आहे xxx ! ) त्यामुळे सर्वांनी हिरीरीने या मेंदूबंद आंदोलनात सहभागी व्हावे. हा एक अमर खजिना तयार होत असून अशी संधी वारंवार येत नाही !"

"अभिनंदन विशाल, आता तुला निरर्थकतेची शक्ती कळली असेल !"

"गिरीश, सापडली तर दे ना इथे काही --"

"लतिका, बरे झाले, सांगितलेस, मला माहीत नव्हते -- याचा मला सोयीस्कर अर्थ -- मी हे कंटिन्यू करायला हरकत नाही ! -- आणि हे वाक्य मी या संमेलनाबाहेरचे, सार्थ बोलतोय !"

( हे माझ्या अर्थहीन प्रिये
करत राहा माझ्यातले सदोदित
सर्व अर्थ नष्ट
अन
माझ्या म्हणजे सर्वांच्या

सर्व अर्थांच्या सर्व मर्यादा

संपोत

तुझ्या निर्योन संपूर्णतेत ) -- ' कोरी कविता ' या माझ्या कवितेतून.

"( अर्थहीनतेला मर्यादा नसते, अर्थाला मर्यादा असते. )"

"( निरर्थक पाहिलेच नाही तर आयुष्य अर्थबद्ध होऊन जाते. )"

"" ही कादंबरी अस्तित्ववादाशी नाते सांगणारी आहे " --- !!!"

"मोरपिसाच्या मनात उमटे पंचतंत्र हे खासे, उलट्या पानांवरून दिसले पडल्या जळात वासे !"

"ती चाल भयानकच होती. मनातल्या हिंसेची चाल अजूनही चालू असल्याने असंख्य प्रकारे ती व्यक्त होत राहतेच आहे !"

"आता यातली खरी गोष्ट सांगतो -- पुरुष तर्काचे टप्पे वापरत खूप कष्ट करून बहुधा चुकीच्या निर्णयाला जाऊन पोचतो -- त्या ऐवजी स्त्री असल्या तर्काचा वापर करत बसण्यापेक्षा उत्स्फूर्तपणे करेक्ट निर्णयाला पोचते -- याचे वैषम्य वाटल्याने, एक मानसिक समाधान म्हणून आम्ही हा टवाळीचा उद्योग केलेला आहे -- कारण विनोदाचे हत्यार काढले की स्त्रिया हमखास हरतात, हे आम्हाला माहीत आहे !"

"Otherwise waiting till next Sunday !"

"कल्पिता, ज्या गोष्टी एफबीवर तांत्रिक दृष्ट्या शक्य आहेत त्या होत राहणार -- शक्य असूनही काही गोष्टी करू नयेत, असे तुम्ही म्हणताय, हे साध्य होणारे नाही !"

"नुसता तर्क आणि स्त्रियांचा तर्क यांतला फरक ( जो पहिल्या पाच खंडांत सांगायचा राहिला ! ) सांगण्यासाठी आता सहावा खंड येण्याचा अर्थ येतोय ना लक्षात ? पूर्ण खंड लिहावा लागावा, इतका आहे फरक !"

"मी उल्लेख केलेल्या त्या परीक्षणात एक साधी शंका विचारली होती की नुसता तर्क आणि स्त्रियांचा तर्क यांत फरक काय, हा मुद्दा या पाचही खंडांत का वगळलाय, ते कळले नाही, तर त्याचे उत्तर म्हणून आता सहावा खंड येतोय ! पण प्रकाशिकेने आता हात जोडून विनंती केलीय की हे वाचू नका हवे तर पण आता कोणतीही शंका विचारू नका कारण आता काहीच शक्य नाही !"

"मुळात हे पुस्तक पाच खंडांत आहे. हे एका प्रकाशिकेचे स्वप्न होते, म्हणतात. पुरुष लेखक या प्रकल्पात सहभागी न झाल्याने ५०० स्त्रियांच्या योगदानातून हे काम सिद्ध झालेले आहे. याला जागा फार लागते आणि ते कळायला अवघडही असल्याने खपही नाही, त्यामुळे दुकानदार हे विक्रीला ठेवत नाहीत. मी या खंडांवरचे परीक्षण वाचले होते कारण मूळ पुस्तके वाचायला मला पुरेसा वेळ नाही. परीक्षणाचे हेडिंग ' कशाचा कशाला मेळ नाही ' असे होते. नंतर तो परीक्षणकार वेडा झाला असे कळले. त्या वेड्याने सगळे मूळ खंड वाचून ते परीक्षण लिहिले होते, असे म्हणतात !"

"यात अंतर्भूत एक साधा प्रश्न असा आहे की कलेत वा जगण्यात, पुनःप्रत्ययाला आपण इतके महत्त्व का देतो ?"

"काहीच नको असे तर आपले म्हणणे नाही. सगळ्याच गोष्टींचे दोष काढणे हा अर्थातच हेतू नाही."

"औपचारिकपणे किंवा एक ग्रुप म्हणून ग्रेट म्हणणे समजा वगळले तर काय म्हणता येईल ? मोठ्यांच्या कोटसवर साधकबाधक चर्चा झाली तर तेही ठीक वाटते -- निदान ते सवयीतले -- रूटीन तरी नसते."

"जेके म्हणतात, You are the world, तेच आकलन एका वेगळ्या भाषेत या वाक्यात आहे."

"गौतम बुद्धाने सांगितलेली तृष्णा."

"आगीत तेल ओतण्याऐवजी आगीत आगच ओतली तर तेल वाचेल !"

"आपण किस झाडकी पत्ती आहोत, आपण किडामुंगी आहोत, आपण मच्छर आहोत, आपण चिलट आहोत, आपला काहीच उपयोग नाही -- असे पराभूत विचार समस्त पुरुषांच्या मनात उपजवणाऱ्या विक्रमी स्त्रीवादी वीरांगना !"

"सध्या मी गौरी देशपांडे यांचे एक पुस्तक वाचतो आहे, त्याचे नाव आहे -- ' दुस्तर हा घाट ' !"

"माझ्या, वरच्या कॉमेंटमध्ये, आनंदाच्या भरात, गणित चुकले आहे, बघा !"

"या पंचकन्यांचे स्मरण करण्या एवढे मन जर मोठे असेल तर पन्नास कन्यांचे स्मरण केल्याचा आनंद वा पुण्य मिळेल कारण यांतली प्रत्येक फाईव्ह इन वन आहे !"

"तसेही नाही -- देशासाठी त्याग, ध्येयासाठी न्योछावर होणे -- असेही असते -- ते तरी मूल्यात्मक समजावे का ?"

"कलाबिला किरकोळ रे, व्यवहार बघणं महत्त्वाचं -- व्यवहार गेला तेल लावत, मी कलेसाठी जगणार आहे -- देशाचं सोड, आधी आपलं बघणं महत्त्वाचं -- आधी कोंढाणा, मग लग्न -- योग्य वयात लग्न, गाडी-घर बघू पुढे -- मूल किरकोळ, करीअर महत्त्वाची --"

"मूल्यनिश्चिती आणि अधिकारवाणी -- हेही प्रश्न यात आणता येतील --"

"अनेकांनी वेगवेगळे वाचलेले असते, विचार केलेला असतो -- त्याचे एकूण सार इथे मिळते. स्वतःचे जगणे समजून घेण्याची प्रक्रिया मांडणारे काही कवीही इथे आहेत. हे सगळे एकत्र मिळणे आणि अत्यंत कमी कष्टात -- हे एफबीचेच श्रेय !"

"मिलिंद ही स्त्री फिजिकलीच दागिन्यांखाली हरवण्याचा धोका दिसतोय म्हणून स्वतःचा थोडा तरी भाग दिसू द्या, सगळेच दागिन्यांनी झाकू नका, असाही अर्थ सुचवायचा आहे ! शिवाय आध्यात्मिक अर्थ कळला तर ' सोनेपे सुहागा ' !"

"अवधूत, स्वयंचलित क्रियाप्रतिक्रियांच्या चक्राबाहेरचे जगणे असू शकते का, हा अध्यात्मातला एक अति-महत्त्वाचा प्रश्न तुमच्या शंकेत अंतर्भूत आहे. याचा शोध घेणे, वाटले तर, अत्यंत इंटरेस्टिंग होऊ शकते ! हरेकके मर्जीकी बात है।"

"स्वतःचा शोध घ्यायला जागा ठेवा नाही तर स्वतःही हरवून बसाल !"

"आशयघन म्हणजे, आज लिहिणाऱ्या कवींना पडणारे प्रश्न, ते त्यांकडे कसे पाहतात -- यांची करमणूकप्रधान नसलेली चर्चा -- असा अर्थ मान्य असेल तर होतेच ते अंक तसे. आजच्या जगण्याला ते प्रत्यक्ष जगणाऱ्यांच्या येणाऱ्या प्रामाणिक प्रतिक्रिया, या अर्थानेही ते अंक आशयघन होते. असे अंक सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे असतात. टाईमपाससाठी हे अंक काढले जात नाहीत. ' सत्यकथे ' चे अंक तरी आशयघन होते का, हेही विचारले गेले होतेच !"

"या कादंबरीत थोडी काटछाट हवी होती आणि पोझ घेतल्यासारखा एकसुरीपणा टाळायला हवा होता. पण, मेघना इज ग्रेट ! मानवी नात्यांचे विच्छेदन करून पाहण्याची तिची क्षमता अफाट आहे ! मोठ्यांचे वाटणारे अपयशही त्यांच्याबद्दलचा आदर कमी करत नाही. तशी ही मोठी लेखिका !"

"मूळ प्रतच वाचावी म्हणतो ! लागू देत १०-२० वर्षे ! हटायचे नाही !"

"ये हुई ना बात ! हा नुसता विनोद नाही, निरर्थकताही व्यक्त होतेय !"

"आता मात्र मैत्रिणी, आपुलकीचा सल्ला -- स्त्रियांच्या बाजूचे विनोद नसतील तर ते स्वतः तयार करणे हा एकच मार्ग !

"कल्पिता, तुम्हाला सत्याची खूपच आवड दिसतेय !"

"तुमची आपुलकीयुक्त विनोदाची इंजेक्शने मिळत राहोत !"

"कल्पिता, तुम्ही स्त्री असूनही स्त्रियांची इतकी जाण !"

"मिलिंद, तुमच्या फ्रेंडसमध्ये बहुतेक सगळेच रोमन मराठीवालेच आहेत हो ! वाचायला त्रास होतो. देवनागरीचा प्रचार अत्यावश्यक आहे. दिसतायत तर सगळे तडफदार, यांना युनिकोड मराठी शिकणे काय अवघड आहे ?"

"अवधूत, त्यातल्या त्यात आनंदाची नव्हे, एकमेव अत्यानंदाची गोष्ट ! बौद्धिक महत्त्व आणि अर्थ धुळीला मिळताहेत !"

"अनंतजी, ते म्हणजे -- व्यक्तिगत हेतूंच्या मर्यादेत जगणे --"

"चित्रा जोशी म्हणतायत ते खरेच आहे. फक्त, भीतीचे मूळ पाहायला हवे असे न वाटता या निष्कर्षावर थांबणे म्हणजे आपल्या जगण्यातला गोंधळ, धुमाकूळ, हिंसा आणि सडणे हे सगळे पूर्णपणे मान्य करण्यासारखे आहे. भीतीचे उच्चाटन अशक्य असेल तर भ्रष्टाचाराचे उच्चाटनही अशक्यच समजावे लागेल. हा एक बौद्धिक निराशावाद होईल."

"भीतीग्रस्त माणसाचीच दुसऱ्यांना भीती वाटते !"

"माझे ' इराक ' हे नाटक चेतनने ( आणि इरावती कर्णिकने ) दिग्दर्शित केले होते -- ते दिवस, चर्चा, पत्रव्यवहार आठवले. माझ्या ' डावेदार ' या नाटकात त्याने कामही केले होते. तो माझा चांगला मित्र होता. सुस्वभावी, सर्जक आणि मेहनती !"

"बॅलन्स संभाळत राहण्याचे अगाध कौशल्य असलेल्या करोडो भारतीयांना पुनःप्रत्ययाचा आनंद !"

"काल मी अशी एक स्टोरी ऐकली की एकदीड दिवस मृत असलेली व्यक्ती व्हेंटिलेटरवर कोमात आहे असे सांगून त्या व्यक्तीची बायपास करणे आवश्यक असल्याचे पटवले जात होते ! ते वेळीच लक्षात आल्याने ती मृत व्यक्ती ऑपरेशनच्या त्रासातून वाचली !"

"नाही तर मग इच्छामरणाचा कायदा होऊ न देणे ज्यांच्या हातात आहे त्यांनी डॉक्टरांकडून भरपूर लाच तरी खावी ! ' अमुक एवढे द्या नाही तर इच्छामरणाचा कायदा आणतो ' असा आतून सरळ निरोपच द्यावा डॉक्टरांना !"

"त्यामुळे, जनतेच्या आर्थिक प्रश्नांबाबात सहानुभूती म्हणूनही इच्छामरणाला कायद्याने मान्यता देणे हे योग्य ठरणार आहे. शिवाय प्रायोपवेशणाला प्रोत्साहन ( इन्सेंटिव्ह ) म्हणून सरकारतर्फे एक लाखभर रुपये द्यायलाही हरकत नसावी. खूप लोक आनंदाने मरतील आणि देशाच्या भुईवरचा भारही कमी होईल. शिवाय देश कायमच तरुण राहू शकेल !"

"एम्डी होईपर्यंत ७०-७५ लाख लागतात असे ऐकले. चारपाच वर्षांत हा आकडा कोटीच्या पुढे जाईल ! म्हणजे सर्दी झाली म्हणून आपण गेलो तर डॉक्टर मंडळी आपल्या मेंदूचे ऑपरेशन केल्याशिवाय सोडणारच नाहीत -- हाही एक मुद्दा यापुढे लक्षात घ्यावा लागेल !"

"किंवा कितीशा पावसाळ्यांत कितीसे भिजलात -- हेही चालेल !"

"हे लहान वयातल्या अनुभवाचे बोल आहेत की वाढलेल्या ?"

"फक्त ' अतिशहाणा ' चा अर्थ ' मूर्ख ' असा होताना दिसतोय, बाकी सगळीकडे ' अति ' हे जास्त, अधिक अशा अर्थांनी आलेले दिसते. पण हा अभ्यासकांच्या क्षेत्रातला एक पारिभाषिक शब्द दिसतोय. तसाच ' अधिकार ' असलेला कुणी सांगू शकेल."

"एका खांबाभोवती स्थितिशील न होण्यातच तर कवितेचा आवाका वाढू शकतो."

"हळूहळू हुशार होत जाणे आणि कष्टपूर्वक पदवी मिळवणे, असा प्रकार इथे नाही. जगणे आणि त्यातले प्रश्न समजून घेणे हे कोणत्याही स्पेशलायझेशनचे काम नाही. तथाकथित अडाण्यातही ती परिपक्वता असू शकते. त्यामुळे, इथे विभागणी नाही. जगण्यातल्या प्रश्नांबद्दल बोलणारे सगळेच लोक हे कुणालाही कळणे शक्य आहे, असेच म्हणालेले आहेत. नाही तर ' बुडते हे जन ' अर्थहीन म्हणावे लागेल. बहुसंख्य लोक स्वयंचलित जगतात-मरतात, असे असले तरी ती त्यांची निवड आहे. त्यांना कळणार नाही, असे नाही."

"जास्त आत्मविश्वसाने, जास्त ठामपणाने, जास्त ओरडून जो बोलतो तो जास्त कन्फ्यूज्ड आणि जास्त घातक असण्याची शक्यता असते, असेही एक कन्फ्यूज्ड विधान इथे करता येईल !"

"मी योगी आणि बाकी सगळे योगभ्रष्ट म्हटल्यावर, तो मूलभूत पॅटर्नच होणार ना, प्रणव !"

"हे झाले एक छोटेसे डायव्हर्शन. आता वाटल्यास मूळ विषयावर येऊ या --"

"तुलसीदासाने हे स्वतःला पटून लिहिले असेल की तो कुठल्या मान्यतेला बळी पडला असेल ?

"( अमरजी, जरा संदर्भबाह्य विचारतो -- स्त्री आणि जनावर हे ' ताडनके अधिकारी ' हे कुणाचे आहे ? कबीर की तुलसीदास की आणखी कोणी ? आणि त्या नेमक्या ओळी काय आहेत ? )"

"फक्त त्या कन्फ्यूजनलाच स्वतःची क्लॅरिटी आणि नैतिकता म्हण आणि त्याचा हिरीरीने पाठपुरावा कर आणि ज्यांच्या जगण्यात सेम तसेच कन्फ्यूजन नाही, वेगळे आहे, त्यांना कंडेम कर की झाले ' यशस्वी ' जगणे !"

"हे बरे आयते वाचायला मिळाले ! धन्यवाद !"

"निव्वळ टाईमपासची आवड असलेले आणि तशी आवड नसलेले यांच्यांतली मैत्री टिकणे अवघड असते."

"माणसाच्या जगण्यातले सगळे प्रश्न -- अन्याय, विषमता, संघर्ष, छळ -- हे सर्व कंडिशन्ड माईंडची देन असतात."

"तिसरे म्हणजे माईंडलेस असा प्रकार नसून डिकंडिशन्ड माईंड असू शकते. मनाचा वापर कसा होतो त्याचा प्रश्न आहे. एकात्म मनाला आपण मन म्हणणार नसू तर वेगळे नाव येईल, इतकेच."

"काही मतभेद नोंदवतो. एक म्हणजे सगळेच एकमेकांना कंडिशन करत असतात. त्यात कंडिशनिंग करणारे आणि करून घेणारे असे दोन विभाग नाहीत. दुसरे म्हणजे बुद्ध डिकंडिशनिंगचे बोलत होता, त्याच्यामुळे कुणाचे कंडिशनिंग झाले असेल तर तो ते करून घेणाऱ्याचा दोष आहे."

"एक धक्का और दो मॅनेजमेंटको तोड दो ! -- हे आठवले मला !"

"माझे पहिले नाटक ( आधी लिहिलेली बाद होती ) तुझ्या बाबांनी माझ्याकडून लिहून घेतलेले आहे -- सक्तीने !"

"नोकरीत, निरनिराळ्या गावी, आयुष्यात जसे येतील त्यांची फ्रेंडशिप स्वीकारत गेलो तसेच इथेही करत होतो. एकदोन धक्के बसल्यावर आता थोडा सावध झालो आहे. पण हे सगळे फ्रेंडस खरे की बुरखाधारी, कोण जाणे ! मित्र हा आपल्या एफबी खात्याला / प्रायव्हसीला धोका आणणारा नासावा, इतकीच माझी अपेक्षा असते. बाकी फ्री राहावे, असे मला वाटते -- असेना का बुरखाधारी !"

"कोल्हापुरी असल्यास तुझ्या बाबांबरोबर मीही आहेच !"

"जगणे असे अनेक घटक, विचार, भावना यांची गुंतागुंत असल्याने एखादी वैचारिक भूमिका घेणे कलाक्षेत्रात संकुचितपणाचे ठरते."

"व्यक्ती दुःखी असते तेव्हा विजडमची शक्यता नसते -- असा त्याचा अर्थ दिसतो. मज नाही दशा अंतरी दुःखाची । भावना भेदाची समूळ गेली ।। -- या तुकारामाच्या अभंगाचाही यावर प्रकाश पडू शकतो."

"हस्तरेषा म्हणजे मेंदूच्या तयारी / अपेक्षांचा नकाशा -- प्रचंड इंटरेस्टिंग प्रकार वाटायचा तो मला !"

"काही वर्षे मी हस्तरेषांबाबतचा ( शास्त्राचा असे म्हणून नसते हल्ले ओढवून घेणे नको ) अभ्यास केला होता तेव्हा एक पायाभूत तत्त्व माझ्या लक्षात आले होते, ते म्हणजे -- तुम्ही ज्या आयुष्याची अपेक्षा करता ते तुम्हाला मिळते !"

"फारच सखोल आकलनाला प्रवृत्त करणारे वाक्य !"

"माझी कॉमेंट साहित्य-संस्कृती-बुरखेधारी यांबद्दल होती -- व्यक्तीबद्दल नाही --"

"मै समझता था कि अच्छे बच्चे झगडा नही करते -- अब समझ गया हूँ कि झगडा भी करते हैं ।"

"स्त्रीपुरुष सगळ्यांनाच पझेसिव्हनेस पटतो मग हातावर लिहिले, इसमे क्या बडी बात है ?"

"जाऊ दे, नको बोलायला या विषयावर -- असे वाटले !"

"जो लेखनाचा हेतू तोच इथलाही हेतू -- संपर्क. बरे मी प्रायोगिकवाला असल्याने, खूप लाईक्स आले नाहीत म्हणजे संपर्क वाया गेला, असे मला वाटत नाही. फ्रेंडस आणि लाईक्स चालतील कितीही, पण जेव्हा काही कारणाने आपले एफबी खाते सस्पेंड ( स्थगित ) होते तेव्हा ते पुन्हा सुरू करण्यासाठी आपल्याला काही फोटो ओळखावे लागतात -- फ्रेंडस जास्त झाले तर ते काम अवघड होईल, ही मला भीती असते. बरे, मराठीत समजा मी एक बऱ्यापैकी सर्जक लेखक ठरलो तरी पैसे फारसे मिळतच नाहीत आणि प्रसिद्धी ? तिला मारो गोली, हे धोरण ठेवल्यामुळे तर प्रायोगिक ! त्यामुळे, झीरोवर आऊट व्हायची तयारी ! एकूणात, तसा विशेष प्रश्न नाही, पण काही लेखन करायचे असेल तर इथला वेळ आपोआप कमी होईलच. हे असे असूनही, वेळ वाया जातोय असेही कधीकधी वाटतेच !"

"मानवी संबंधात समतोलपणा आणि न्याय या अशक्यच गोष्टी आहेत, असे दिसते. पतिपत्नीहिंसा याच विषयावर माझे ' समतोल ' नामक नाटक आहे."

"स्त्री आणि जनावर दोघेही ताडनके अधिकारी -- हे कबीराचे आहे का ? त्या त्या काळ-परिस्थितीप्रमाणे बोलले जात असते. कारणे कळली म्हणजे प्रश्न सुटतात, असे नाही. प्रयत्नाने त्या प्रश्नांची स्वरूपे काळाच्या ओघात बदलू शकतात. मानापमान, वर्चस्व या बाबतीत जास्त सशक्त व्यक्ती कुरघोडी करत राहते. स्त्रियांकडे असणारी हत्यारेही खूप विध्वंसक

असतात, यात शंकाच नाही. कायदे वा नीतीनियम करून जशी युद्धे थांबत नाहीत, तसेच हेही प्रश्न आहेत. याहून खोलात कुणीच जाऊ इच्छित नाही !"

"पुस्तके, ज्ञान मशीनमधून डायरेक्ट डोक्यात घालण्याची कल्पना मी सुमारे ३५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या ' अस्तित्व ' या एकांकिकेत वापरलेली आहे. तेव्हा डाऊनलोड हा शब्द नव्हता, इतकेच !"

"माणूस ज्या ज्या कल्पना करू शकतो ते ते सगळे शक्य होणार आहे ! लोकसंख्या कमी करायची असली की काही केमिकल्स फुकट !"

"आधी पुस्तके डाऊनलोड हीही जुनी झाली संकल्पना ! आता डायरेक्ट योग्य त्या केमिकल्सना मेंदूत सोडले की आनंद -- असे चाललेय !"

"तो नंदी असून बायकोच्या साड्या घेण्यासाठी शंकराकडून पगारातली उचल मागतोय -- शंकर म्हणतोय, थांब, पार्वती गेलीय साड्या खरेदीला, ती आल्यावर उरले असले तर बघू --"

"बुद्धी -- प्रमाणात कमीजास्त, तथाकथित भलीबुरी, योग्य वा वाममार्गाने जाणारी, वगैरे असणार -- त्यातली ' चांगली ' शोधणे अवघड आहे. ' मन ' सुद्धा, हा शब्द आपण ज्या अर्थाने वापरतो त्या अर्थाने निरनिराळ्या प्रकारे चिंध्या झालेले, वेगवेगळे प्रश्न असलेले, असेच असणार. त्यातही ' चांगले मन ' शक्य नाही. दोन्ही एकेकटे ' चांगले ' असणे वा एकत्रित चांगले असणे अशक्य दिसते."

"दोन्ही प्रतिक्रियाच असल्याने अनेक घटकांवर अवलंबून असणारे वैविध्य शक्य आहे."

"शंभर टक्के अनुमोदन ! ठराव करून लगेच राष्ट्रपतींकडे पाठवा !"

"रवी लाखे, तुम्ही म्हणताय तिकडेच जाईल ही चर्चा -- ' अजून ' वगैरे शब्दांना अर्थ नाही कारण त्यात पुन्हा ' कायमचे ' आणि ' सातत्याचे ' हवे असणे, हे येते -- सर्वच येणेजाणे असणार --"

"माणसची बुद्धी ही आहे ते चालू ठेवण्याचा प्रयत्न करते ! यासाठी शोध टाळणे आणि सोयीचे निष्कर्ष काढणे गरजेचे ठरते !"

"असे असणाराच, असे होणारच, हे तर हवेच -- असे गृहीत धरायला आपण नकार देतो तेव्हाच प्रश्नांना सामोरे जाणे घडते --"

"टोटल गमावून विठ्ठलच फक्त उरेल, याला तुकाराम भक्ती म्हणत असे !"

"आणि समजा युद्धे, अन्याय, विषमता हे सगळे नाहीसे होऊन कलानिर्मितीची गरज संपणार असेल तर काहीही हरकत नाही, असे मला वाटते. कोमट अपुरेपणा ठीकही वाटू शकतो पण पोटेन्शिअली तो विध्वंसकच असतो. अपुरेपणाची, त्याच्या त्रासाची समर्थने का करावीशी वाटतात, हाही प्रश्न विचारला पाहिजे."

"या चर्चेत एका टप्प्यावर, आपण पूर्ण असलो तर कुठेच अपूर्णता नसेल, अशा एका शक्यतेकडे आपण आलो होतो, ती शक्यता काय असेल ?"

"होय, ते बोलण्याच्या ओघात ' गाईचे गोमूत्र ' झाले आहे --"

"संमेलनाध्यक्षपद हे मुळात अनेक तडजोडींशिवाय मिळणार नाही -- ते द्या सोडून -- तुम्ही कुणावर टीका करू इच्छिता, असे डायरेक्टच विचारलेले बरे !"

"म्हणजे आपण पूर्ण असलो तर नात्याचा अपुरेपणा जाणवणार नाही -- असे काही अनपेक्षित येतेय की काय समोर ?"

"म्हणजे नात्यापेक्षा स्वतःच्या अपुरेपणाबद्दल बोलावे, असे दिसतेय --"

"नात्याची कुठलीहि मानसिक रचना पूर्ण असू शकत नाही, स्मूथ असू शकत नाही -- असे दिसते -- म्हणून तर ही पोस्ट --"

"हे काही फक्त परीक्षेतल्या यशाला लागू नाही, सर्वच लौकिक, व्यावहारिक यशाच्या बाबतीत असेच असते."

"विनायकजींनी उपस्थित केलेला स्वतःला ओळाखण्याचा मुद्दा इथे प्रस्तुत दिसतो, पण स्वतःला ओळखणे म्हणजे लौकिक यश, प्रभावी व्यक्तिमत्व, धारदार बुद्धी वगैरे गोष्टी कितपत एनकैश होऊ शकतील, असे तर नव्हे ?"

"मी असे पाहिले आहे की नुसत्या गतीच्या कमीजास्तपणामुळे सगळे फसल्यासारखे वाटते ! छोटीशीच अशी काही सुधारणा हवी असेल -- होईल नीट -- डोंट वरी !"

"मला असले तीन आले पण आधीच्या अनुभवांमुळे थोडा सुधारलो आहे -- तरीही आपल्या माहितीतली नावे बघितली की हात फसायला धावू पाहतातच -- कसून आवरावे लागते --"

"हा आमच्या ' अवकाश कलामंच ' मध्ये होता -- तेव्हा आम्ही त्याला नाट्यतपस्वी म्हणायचो ! त्याचे अभिनंदन आणि शुभेच्छा !"

चरित्र इसापचे ....
"आलेल्या प्रसंगाचा परिणाम करून न घेता, त्यातून बाहेर राहून, जणू जगण्याशी खेळणारा ग्रेट माणूस !"

"जिथे निष्कर्ष ठरलेले आहेत तिथे विचारविनिमय शक्य नाही --"

"ज्यांना जे योग्य वाटते ते त्यांना चालवू द्या -- बुद्धही या गोष्टी थांबवू शकला नाही -- मी एका चांगल्या गैरसमजाने इथे आलो, ही माझी चूक आहे, शिवाय मी जन्माने ब्राम्हण आहे, हीही माझीच चूक आहे आणि पांढरपेशा असून दुःख या विषयावर बोलू या म्हणणे, ही तिसरी चूक -- एवढ्या चुका करणारा माणूस इथे कसा सामावला जाणार, याची जाणीव झाल्याने मी निरोप घेत आहे. मला इथे आपोआप कसे सामील करून घेतले गेले, मला माहीत नाही. असो."

"मी यावर कॉमेंट दिली होती. पुन्हा थोडक्यात देतो. एखाद्या विषयावर, एकमेकांचे राग न बाळगता, काही बोलणे शक्य नसेल तर मी या ग्रुपमधून निरोप घेईन. इथला हेतू ' सौहार्द ' हा आहे, असे समजून मी इथे आलो आणि बोललो. वर उल्लेख केलेल्या गोष्टींना माझा पाठिंबा नसतो आणि मी परंपरावादीही नाही. पण आधीच वाईट पूर्वग्रह बाळगून कसल्या चर्चा होणार ? कसले सौहार्द येणार ? सॉरी, माझ्यामुळे काही त्रास झाला असेल तर दिलगीर आहे. भेटू ! शुभेच्छा !"

"सगळ्यांची मते घेतली तर सगळेच वाईट ठरतील, ते रागलोभ सोडून काही बोलू या, असे मी सुचवतोय. आग्रह नाही. दुसरे कसे वाईट आहेत, हेच बोलत बसायचे असेल तर या ग्रुपचा हेतू पराभूत होईल. तुम्ही वर उल्लेख केलेल्या

प्रकारांना माझाही पाठिंबा नसतो, मी परंपर जोपासणारा नाही. तरीही, सगळ्यांनी एकत्र बोलणे हे इथे होणार नसेल तर अर्थातच खेदखंत न बाळगता मी निरोप घेईन."

"मला दिसते त्याप्रमाणे आस्तिक आणि नास्तिक यांत काहीही फरक नाही -- फक्त बडबड वेगवेगळी असते इतकेच. दोन्ही भंगलेल्या मनांच्या सतत संघर्षमय जगणाऱ्या आणि एकमेकांना जगणे मुश्किल करणाऱ्या व्यक्ती असतात."

"मीही काहीसा असाच व्यासंगसंगी असल्याने माझा तुमच्या व्यासंगाला पाठिंबा आहे -- आणि जेके म्हणतात, व्यक्ती ही कल्पनाच खोटी आहे -- मग नाव हे काय आणि ते काय !"

"नाही मिळणार, कारण असे वाचले होते एवढेच आठवतेय ! माझाही व्यासंगसंग हा असाच आहे !"

"पूर्वी ' फिजिक्स अँड रिलिजन ' नामक एक पुस्तक वाचले होते -- त्यात एका बाजूला शास्त्रज्ञांच्या लेखनातले उतारे आणि समोर विवेकानंद, अरविंद यांच्या लेखनातले उतारे, असे देऊन साम्य दाखवले होते."

"ओबामा पुन्हा येईल का निवडून, याचा विचार करत निवांत गाढ झोपी जाणे, हा एक सुचतोय उपाय !"

"आणि ' वाचले पण पटलेही नाही आणि आवडलेही नाही आणि विचार करावा असेही वाटले नाही आणि त्यामुळे प्रतिक्रियेचा प्रश्नच नाही ' -- असाही अर्थ ?"

"एकूणच पुस्तकांच्या निर्मितीचे प्रमाण बघून थोडा उलटा विचार करावा, असेही हल्ली वाटते --खरेच काय, कितपत वाचायची गरज आहे ?"

"इतके सगळे परफेक्ट नसेल पण यातल्या बऱ्याच कंडिशन्स फुलफिल होत असतील त्यांनी काय करावे, तेही सांगा हो !"

"हुशारीचे डाऊनलोडीय सॉफ्टवेअर तयार करून विकण्याच्या कंपनीत आधी एमबीए लागतील !"

"बांधून ठेवलीयत तेच बरे आहे, त्या दोऱ्या सोडू नका -- वाचावी लागतील म्हणून नव्हे, पडतील धपधप, म्हणून सांगतोय !"

"आपण पापी असल्याचे कुणाला कळू नये, याची मीही सगळ्यांसारखीच काळजी घेतो, म्हणून हो !"

"येतोय पण काय दिसले होते ते विचारायचे नाही !"

"ती बिनविषारी शोधतेय ! भोळी बिचारी !"

"अहो, पण मतभेदांना वाव ठेवत नाही ती मैत्री कसली ? कुठल्याही दोन व्यक्तींची सगळी मते जुळू शकत नाहीत. मग तर मैत्री हा शब्दच रद्द करावा लागेल. आणि आपली पोस्ट देताना काय करायचे ? तीही नावडू शकते."

"किंवा मग ' सत्य असत्यासी मन केले ग्वाही ' ही पद्धत ! तुकाराम झिंदाबाद, मंबाजीची मैत्री तुटली तर तुटली !"

"मंबाजी आणि कंपनी धर्माचा धंदा करत होते, त्याविरुद्ध तुकाराम उभा राहिला हा विषय घ्यायचा आणि तुकारामाचा धंदा करायचा, हा दैवदुर्विलास म्हणावा की ' मंबाजी धंदा झिंदाबाद ' म्हणावे ? तुकारामाची नुसती एक अस्मिता झाल्यामुळे हे असे होते आहे."

"वस्तुतः याचे दिग्दर्शक, कलाकार माझे मित्र आहेत, काहींनी माझ्या नाटकांतून कामेही केलेली आहेत, पण तुकाराम हे आपल्या सांस्कृतिक जगण्यातले एक अत्युच्च शिखर आहे -- त्यामुळे, काही किरकोळ अपेक्षापूर्ती होते, एवढ्यावर न थांबता, अशाही चर्चेला वाव राहिला पाहिजे, असे मला निश्चितच वाटते. आणि मराठी सिनेमाकडून मोठ्या अपेक्षा ठेवायचा एक प्रवाहही चालत राहावाच."

"आकलनाची अंतर्गत सलगता / संगती नसल्यामुळे हा चित्रपट तुकड्यांची गोधडी झाला आहे. याची सिनेमाकर्त्यांना जाणीव असावी. म्हणूनच त्यांनी तुकारामाला माणूस म्हणून पेश करण्याचा दावा करणारी जाहिरात केली आहे. तुकाराम हा मानवी जगण्याचा भाष्यकार होता, त्यामुळेच त्याला ' संत ' म्हटले गेले. यातला ' माणूस ' असा एक तुकडा वेगळा काढून दाखवता येतो ?"

"आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभव ।।

-- या ओळी महाराष्ट्रातले एक विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे हे तुकाराम कसा नास्तिक होता हे सांगण्यासाठी वापरत असल्याचे वाचनात आले होते. त्यावरून, काहीही ओळख नसताना, डॉ. सदानंद मोरे यांचा फोननंबर मिळवून, निव्वळ

याच दोन ओळींसाठी काही वर्षांपूर्वी मी त्यांच्याशी फोनवर बोललो होतो. साळुंखेंचा अर्थ चुकीचा असल्याबद्दल आमचे एकमत झाले होते. ' तुकाराम ' या सिनेमात या ओळी आणखी एका चुकीच्या पद्धतीने वापरल्याचे दिसले. आणि इथे तर डॉ. मोरे हे सल्लागार आहेत !"

"' दिल एक मंदिर ' मध्ये राजकुमारचे एक महत्त्वाचे ऑपरेशन करण्यासाठी राजेंद्रकुमारने रात्रभर कसून अभ्यास तरी केला होता -- तुकाराम काय, कुठे शिकला -- काही कळलेच नाही --"

"' वळू ' मधल वळू जसा हिंसक न होता भयानक असल्याचे सांगितले जाते तसेच इथे तुकाराम अध्यात्मिक न होता संत आहे म्हणून सांगितले जाते !"

"आहे ऐसा देव -- या ओळी चुकीच्या अर्थाने वापरलेल्या आहेत --"

"तरीही तुकारामाच्या वडिलांचे शुद्ध ब्राम्हणी मराठी ऐका --"

"बरेच आहे -- इथे किती लिहिणार ?"

"तुकारामाचा भाऊ देवाच्या शोधात घर सोडून जातो -- तुकाराम संसारात राहून देवाला प्राप्त करतो ( म्हणजे काय, कोण जाणे ! ). पुढे जेव्हा एका ठिकाणी त्यांची गाठ पडते तेव्हा तो भाऊ म्हणतो, " मी बाहेर शोधण्याऐवजी आत शोधायला हवे होते का ? " -- हे वाक्य या सिनेमालाही लागू पडते. इथे ' बाहेरचा ' तुकाराम आहे, आतला शोधलेला नाही. अहो, आतला तुकाराम शोधला तर बघायला कोण येणार ? म्हणजेच बाहेरचा धर्म सांगणारे पंडित आणि हा सिनेमा दोन्ही सारखेच म्हणावे लागतात. आणि प्रेक्षकही जर आतला तुकाराम पाहण्यात इंटरेस्ट नसलेले असतील तर त्यांनाही तुकाराम-विरोधी म्हणजेच मंबाजीच्या बाजूचे का म्हणू नये ?"

"स्वप्न ही जर मनाने केलेली एक भ्रमनिर्मिती असेल तर तथाकथित जागेपणी जे सत्य म्हणून पाहिले जाते ती भ्रमनिर्मिती नाही, असे दाखवता यायला हवे !"

"वस्तू, सुविधा, तंत्रज्ञान, शहरे यांची निर्मिती सतत चालू असली तरी मानसिक भाकडपणा,कंटाळा, निरर्थकपणा हेही फोफावत आहेत. तोच आपला विषय आहे. या भाकडपणाची सवय होतेय आणि हा जाणार तर नाही, अशी भीती वाटतेय.

पूल बांधणे, खूप पुस्तके लिहिणे हे चालू असतानाही कॅन्सरसारखा वाढत जाणारा आहे हा भाकडपणा. आणि याला सातत्य आहे. सातत्य आणि वाढ. आयनेस्कोच्या नाटकातले वाढत जाणारे प्रेतच !"

"धनाजी, माझे ' नुसते सुस्वभावी -- ' हे स्टेटस बघा."

"' मृत्युस्पर्श असलेले अथांग जगणे का नकोय ? '"

"अविनाशजी, समजून घ्या ना भाऊ -- तुमच्या वाक्यावर मला काहीच बोलायचे नाहीय -- म्हणून ओबामा --"

"शुक्लाजी, मला वाटते ओबामा पुन्हा येतील -- तुम्हाला काय वाटते ?"

"शक्ती नाय तर युक्ती वापरा राव ! फिक्सिंग करा !"

"विनायकजी, या तुमच्या वाक्याला लाईक करणे फायद्याचे तर नाहीच पण तोट्याचे नक्की होईल, हे लगेच लक्षात आल्याने -- सॉरी !"

"आपण फार डिफेन्सिव्ह राहतो -- आयुष्यात उन्हाळाच नसता तर -- असे नको ?"

"अवधूतजी, मुळात सुस्वभाव म्हणजे काय, इथूनच सुरुवात होणार ! या घटनेपूर्वी मी एक प्रकारचा सुस्वभावी होतो, इतकेच !"

"सर्व फ्रेंडसना धन्यवाद ! आता समजले, ते सांगतो. सिक्युरिटी सेटिंगमध्ये अशा पॉप अप चौकटींना मज्जाव करायची सोय आहे. कधी कधी उदा. बँकिंगची वगैरे माहिती पाहताना आणखी संबंधित तपशील देणाऱ्या चौकटी येतात त्या अलोव करायच्या असतात. तसे काही नको असेल तेव्हा बंदोबस्त करा आणि निवांत राहा. असो."

"' आमच्यात सात्त्विक बदल झाला आहे ' असे कुणी म्हटल्यास तो आमचा अपमान समजण्यात येईल ! तंगडं तोडून हातात देऊ !"

"इथल्या सगळ्या फ्रेंडससाठी त्यांचे कारस्थान आधीच उघडकीला आणले खरे, पण आता त्या सगळ्या मादक तरुणींचे शत्रुत्व ओढवून घेण्याचे संकट मेरे सरपे मंडरा रहा है। शत्रू चांगला असावा, असे मी म्हणायचो खरे !"

"नौशादभाई तुम्हाला लाख लाख शुभेच्छा ! सौहार्दयुक्त एकत्र चर्चांची अशी कल्पना सुचणे आणि ती अंमलात आणणे, ही एक ग्रेट गोष्ट आहे !"

"सगळेच अत्यंत विचारखाद्यमुद्दे ! माझ्या भूतकाळाचे -- म्हणजे माहिती, कौशल्य हे नव्हे -- अनुभवांचे व्रण या अर्थी -- सातत्य असण्याचा भाकडपणाशी संबंध आहे, असे दिसते. हा आकलनाला अडथळाच ठरतो --"

"होय, तेही असेल सध्या माझ्या बाबतीत. इथे, एकूणात भाकड म्हणजे काय -- फक्त कलावंताच्या संदर्भात नव्हे -- असे यावे --"

"तांबेजी, मुळात मराठीत अशा नोंदी ( त्यांच्या महत्त्वासह ) ठेवणारे अभ्यासक कमी आहेत -- त्यांच्या पोटावर पाय आणू नका -- ( पुस्तकांच्या नोंदी असतीलही काहीजणांकडे, पण अशा सुट्या लेखनाची दखल ? अशक्य ! )"

"सागर, हा भ्रष्टाचाराचा पाऊस आहे -- त्याशिवाय कोण कशाला असे वेळेवर काम करेल !"

" इथली उपस्थिती ' जरा कमी ' केली म्हणजे आपल्या सर्जक लेखनालाही नीट वेळ देता येईल, हा त्यातला विचार आहे. एवढे उत्तमोत्तम फ्रेंडस सोडून जाण्याचा मुळीच विचार नाही. गुण आणि दोष, चांगले आणि वाईट या जोड्यांची अर्थचिकित्सा न करता त्या तशाच सरधोपटपणे वापरायच्या तर सर्वांप्रमाणेच मीही या भल्याबुऱ्याचे मिश्रण आहे. ते जरा जास्त धगधगते मिश्रण असू शकेल. त्याचे भलेबुरे परिणामही जगण्यात येतात. हे सगळे सावधपणे पाहणे मला महत्त्वाचे वाटत असल्याने कला निर्मितीलाही ते पोषक होते. पण आपल्या अनुपस्थितीची नुइसन्स व्हॅल्यू होऊ शकेल, असा भ्रम मला नाही. काही फ्रेंडस म्हणाले, खेळकरपणाला हाच बरा मुहूर्त सापडला ! अहो, सावध माणूस असणे किंवा सर्जक लेखक असणे आणि स्त्री-पुरुष संबंध हा विषय अग्रक्रमात नसणे, कसे शक्य आहे ? मी माझी मान्य-अमान्य अशी कोणतीही प्रतिमा बनवण्याच्या प्रयत्नात नाही, कारण कुणाचीही कोणतीही प्रतिमा कधीही भंग पावू शकते, हे माझे आकलन आहे. मुळात अमुक एक प्रतिमा बाळगणे कितपत अर्थपूर्ण आहे, हाही प्रश्न मी नाकारत नाही. तरी, फ्रेंडस, कोणताही गैरसमज नसावा, ही विनंती. इधरउधरकी ' चूकभूल ' संभलते रहोगे तब तक मिलते रहेंगे । शुभदिन ! "

"तसे नका समजू, पहिल्या सात जन्मांतल्या चांगल्या वर्तणुकीमुळे, माझा आठवा चालू आहे -- सुधारणा म्हणून वाईट वागावे तर शिक्षा म्हणून नववा मिळू शकतोच !"

"घी देखा लेकिन बडगा नही देखा -- या म्हणीचा अर्थ आयुष्यभर समजून घेत राहणे !"

"सोल मेटच्या शोधात, प्रयोग करत, या जन्मापासून असंख्य जन्म फिरणे शक्य व्हावे !-- मला सुचलेली प्रार्थना ! ( सोल मेट सापडूच नये ही सुप्त इच्छा ! )"

"खरे तर म्हणायचे एकच आहे -- जगा आणि जगू द्या ( या जन्मात ) !"

"संजय, या निमित्ताने लक्षात आले, खरेच ' निष्ठा ' हे नाव फारसे का ठेवले जात नसावे ?"

"मग ' प्रधान ' हे पदच खालसा होईल आणि सगळे सोंगाडे होतील !"

"सगळी एकाच पत्नीची विविध रूपे आहेत, असे अद्वैत पुरुष मान्य करतील !"

"खोटेपणाचा मुख्य फायदा असतो -- खरे लपवणे, हा ! ' नीट खरे ' म्हणजे खूप तपशीलवार आणि खऱ्यापेक्षाही खरे वाटावे, असे खोटे !"

"ते या जन्माचे हिशोब चुकते करण्यासाठीही असू शकते !"

"धारासुरकर्जी, रोज दोनतीन फोन करावे लागले तर महिन्याला शंभर रुपये जातात. तुम्ही म्हणता त्याच कंपनीच्या तशाच अनुभवामुळे मी हे लिहिले आहे. यापुढे, काहीही घेताना, ईमेल आयडी दिलाय की नाही, हे तरी पाहायचेच, असे मी ठरवले आहे. त्यांचा ईमेल आयडी मला त्यांच्या वेबसाईटवर जाऊन प्रयत्नपूर्वक शोधावा लागला -- आणि तो तरी अशा तक्रारीसाठी उपयोगी आहे का, हे माहिती नाही !"

"आपापल्या मानसिक प्रोग्रामिंगप्रमाणे ठरवले गेलेले उदात्त हमखास घोटाळा करते !"

"कळते की नाही हे ज्याचे त्याने न ठरवता ते दुसऱ्यांनी ठरवावे, असे केले तरी ' लाईकस ' च्या माध्यमातून भ्रष्टाचार बोकाळेल आणि पुन्हा पहिल्यासारखेच सगळे तुडुंब चालू राहील !"

"ओस नाही पडणार -- आपल्याला ज्या विषयातले कळते, असे वाटते, असेही खूप आहेत विषय !"

"एक उदात्त ध्येय पकडले तर गुंतागुंत कमी होत मनाचा दगडही होऊ शकतो !"

"तुम्हाला माहीत असलेले शेखर ते हेच का, याची खात्री करून घ्या, नाही तर तुम्हा दोघांऐवजी ते दुसरेच दोघे भेटून गेले असे व्हायचे आणि तुम्हाला वाटतेय की तुम्हीच भेटलात !"

"सर्व तऱ्हेच्या भ्रष्टाचाराचे मूळ विखंडित मन हेच आहे. त्याबद्दल प्रश्नही न पडणारे किंवा त्याबाबतच्या प्रश्नांना ' अध्यात्मिक ' वा ' उच्च ' म्हणून निकालात काढणारे सगळेच या विखंडित मनांच्या रचनेला शक्ती पुरवत असतात आणि पाठिंबा देत असतात. आज ना उद्या जगणे भ्रष्टाचारमुक्त होईल, हीही या विखंडित मनांचीच बकवास असते !"

"याला काहीही अर्थ नाही -- हे मग आहे त्यातच खितपत पडणे होईल -- जे चालूच आहे. बाकीचे कसे भ्रष्टाचारमुक्त होतील हा प्रश्नच चुकीचा आहे -- माझे काय ? -- हाच फक्त प्रश्न आहे --"

"माणसाचे मन विखंडितपणे काम करते -- भ्रष्ट नसलेले मन असूच शकत नाही -- भ्रष्टाचारमुक्त भारत / जग वगैरे बोलणेही भ्रष्ट मनातूनच येते -- मी विखंडित आहे की नाही आणि हा विखंडितपणा जाऊ शकतो का, याचा मी तातडीने शोध घेणे, हा एकच मार्ग !"

"हाच ज्योक ' कथा अकलेच्या कांद्याची ' मध्ये निळू फुल्यांच्या तोंडी होता."

"मनाच्या नुसत्या बऱ्यावाईट, सुखदुःखाच्या वगैरे निरनिराळ्या प्रतिक्रिया देणाऱ्या कविता कितपत अर्थपूर्ण असतात, हाही प्रश्न इथे विचारात घ्यावा."

"तुका करी रिता ठाव । त्यासी बैसावया वाव ।। -- हेही इथे प्रस्तुत ठरावे. किंवा -- तुका म्हणे मन मुरे । मग जें उरें तेंचि तूं ।।"

"बरोबर -- व्यक्तित्वबंद माणूस ' विठ्ठला ' ला स्वतःत प्रवेश देऊ शकत नसल्याने त्याला फक्त पुस्तकी ज्ञानच होण्याची शक्यता ! म्हणूनच तर वेदांचा अर्थ ' तुकारामा ' लाच कळतो !"

"तुकारामाच्या ओळी या व्यक्तित्वबंद माणसाबद्दल असाव्यात, असे वाटते."

"चटक कमी घातक आणि व्यसन जास्त घातक, असे दिसते."

"स्वतःचे पूर्वग्रह, मते यांना जिवापाड जपणाऱ्यालाच व्यसन लागू शकते, नव्या आकलनासाठी ' स्वतः ' बाजूला होणाऱ्याला नाही."

"तथाकथित चांगल्या गोष्टींचे व्यसनही जर मेंदू अडकवण्यासाठी, तो बधीर करण्यासाठी आणि जगण्याच्या प्रश्नांपासून पळ काढण्यासाठी वापरले जात असेल तर तेही घातकच म्हणायला हवे. कारण ते सर्जकतेच्या भीतीतून येते."

"जगात जसे अनेक विचार, क्रिया-प्रतिक्रिया आहेत तसेच सगळे इथेही आहे. जगातही सगळा निरुपयोगी काथ्याकूट, आदर्श, निवड, विचारप्रवृत्त होणे, न होणे -- हे सगळे चालू असते. तिथे आपण काय करतो ? आपल्याला काय महत्त्वाचे वाटते, आपण काय समजून घेऊ इच्छितो यावर सगळे अवलंबून आहे."

"माहिती,तंत्रज्ञान, कौशल्य यांचे आयुष्य ठीक पण मानवी संबंधांचे आयुष्य हे जर आपण प्रॅक्टिकल आयुष्य म्हणायला लागलो तर बुद्धीने दिशा न दिलेले समग्रावधान कधीच, कुठेही शक्य नाही असा निषकर्ष काढणेच होईल ते."

"इतरांच्या डोक्यांत आपल्याबद्दल जे काही येईल तेही आपल्याला आपल्याच प्रतिक्रियारूप पद्धतीनेच कळणार !"

"अजिंक्य, तुझ्या वाक्यात -- बुद्धीच काय ते करणार -- असे जखडून घेणे आहे. बुद्धीने दिशा न दिलेले समग्रावधान असू शकेल का, हा प्रश्नही विचारायला मन तयार नाही !"

मला न उमगलेले दुबे

"दुबेजींना शब्दांत पकडायचा / व्यक्त करायचा प्रयत्न करणाराही तसाच ' तयारीचा ' पैलवान लागतो, हे गिरीशच्या या लेखाने लक्षात येते !"

रामभाऊ नेउरगावकर

"इथे आणखी बरेच सेंट्रलाईटस आहेत -- त्यांचेही फ्रेंड व्हा ! शुभेच्छा !"

"कलेचे कळणे विश्लेषणात्मक आणि संश्लेषणात्मक असे दोन्ही असू शकत असले तरीही संश्लेषणात्मकच अर्थपूर्ण, असेच मलाही वाटते."

"या चारही गोष्टी मुख्यतः शारीरिक स्तरावरच्या असू शकतात -- मला सुखशोधाच्या पाया-रचनेतून येणाऱ्या प्रतिक्रियांवर भर द्यायचा आहे --"

"' कवितेतील अ-भाव ' या शीर्षकाचा माझा एक लेख आहे."

"माझा बीएला मराठी हा दुय्यम विषय होता. तेव्हा तांब्यांची पूर्ण कविता अभ्यासली. शिकवायला प्रा. शंकर वैद्य होते."

"मनाच्या बाबतीत ती कल्पनाच ! कारण एकात्मता, असलीच तर, तीत हे विदीर्ण मन असू शकणार नाही !"

"मी तीन वर्षे कोल्हापुरात राहिलेलो आहे, माझे तिथले मित्र, काय सांगू ! अहो, वर्षानुवर्षे भेटणे जमत नाही पण माझ्या निवडक जिगरी दोस्तांत कोल्हापुरातले माझे सगळेच मित्र आहेत !!"

"मला मधून मधून विनोदी लिहायला कसे जमते, याचे रहस्य अशा घटनांत दडलेले आहे !"

"एकीकडे एकूण जगण्याच्या प्रवाहाशी फारसा संपर्क न राहिलेल्या मनाचा भावनिक प्रेमळपणा आणि दुसरीकडे एकूण जगण्याच्या प्रवासात त्या मानाने बराच रुक्षपणा आलेली मने, असा हा, मराठी कलाविश्वात खूप लोकप्रिय व्हावा असा विनोदी मामला तयार झालेला आहे !"

"त्याचप्रमाणे, आवडीनिवडी जोपासल्याच पाहिजेत आणि त्यांतून आनंद मिळवलाच पाहिजे, हेही एकीकडे सर्वांचे चालूच असते ! -- ही दुसऱ्या प्रकरची इस्त्री !"

"दरम्यानच्य काळात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे असेल, द वर्ल्ड इज फ्लॅट या नियमाप्रमाणे सगळ्यांच्या आवडीनिवडींची इस्त्री झालेली असून स्वतःच्या आवडीनिवडी जोपासण्याला वेडेपणाच म्हणावे, हे सर्वांना पटलेले आहे !"

"घर ते मंडई जाण्यायेण्याचे दीडशे रुपये रिक्षाभाडे मुलीने तिच्या पर्समधून घालवले ! म्हणजे त्या भाज्या काय भावात पडल्या ते बघा !"

"मला माईनमुळांचे लोणचे आवडते म्हणून ती शोधायचा तिने प्रयत्न केला पण ती पुण्यात येणे बंद झाले असून फक्त सांगलीकडे मिळतात, असे कळले."

"काही अनावश्यक ओळी लिहिल्या जाणे, बोधप्रद लिहिले जाणे, नुसते रूटीनमधले -- कविता म्हणूच नये असे -- लिहिले जाणे, असे काही दोष काही वेळी इथल्या कवितांतूनही दिसतात."

"निखिल वागळ्यांची स्पेशालिटी म्हणावी असे एक वाक्य आहे -- " हे बघा तुम्हाला निर्लज्ज म्हणताहेत -- यावर तुमचे मत सांगा ! ""

"समजा, श्रेयस म्हणजे देशासाठी जगणे किंवा धर्मासाठी जगणे -- असे म्हटले तर श्रेयस हे माणसांच्या हजारो समूहांचे वेगवेगळे, असे असते का की पूर्ण मानवजातीसाठी एकच श्रेयस असते, या प्रश्नाची दखल घ्यावी लागणारच. अतींद्रजी, सुरुवात व्हायच्या आधीच सोडून देण्यापेक्षा जमेल तेवढे पुढे जाऊन बघू या."

"सर्वोत्तम, अति-चांगले, हिताचे -- याच्याच अर्थाबद्दल आपण चर्चा करतोय. शब्द सगळ्यांना माहीत आहेत. सविस्तर बोलावे लागेल. कुणी म्हणेल, कम्युनिझम अंमलात येणे हेच श्रेयस पण दुसऱ्याला ते पटणार नाही."

"' का जगायचे ' ऐवजी इथे आपण ' श्रेयस ' हा शब्द वापरलाय आणि आता त्याचा अर्थ शोधतोय. त्यामुळे घोटगळकरांचा प्रश्न व्हॅलिड आहे. नुसते शब्द बदलून आपल्याला अर्थ सापडला, असे होणार नाही."

"माणूस खरे बोलूच शकत नाही, त्यामुळे, बरे बोलणेच बरे !"

"अनंतजी, भूमिका असते तेव्हा एक बौद्धिक दिशा दिली जाते; भूमिका नाही आणि सर्वंकश भानाला महत्त्व आहे, यात अमुक एक बौद्धिक दिशा नसते -- त्यामुळे, ' दोन्ही भूमिकाच ' असा सारखेपणा संभवत नाही."

"ही चर्चेला खुली पोस्ट आहे -- हे मला मान्य असलेले आणि माझी बाजू असलेले मुद्दे, असे या पोस्टचे स्वरूप नाही."

"नक्कीच ! एकाच मनातून एकाच व्यक्तीबद्दल, राग, द्वेष, प्रेम, आसक्ती, सुटकेची इच्छा असूनही अडकणे -- हे पूर्ण भान व्यक्त होणे किंवा तिलाही सिफिलिस झाल्यानंतरचा भाग ही मला ग्रेटनेसची लक्षणे वाटतात. ही एवढ्या पानांची कादंबरी असायची गरज नव्हती, असे काही दोष सांगता येतील. पण एखादा कलावंत कुठेही, कोणती उंची गाठतो, हे मला महत्त्वाचे वाटते. काही ठिकाणी ती नैतिक निष्कर्ष काढल्यासारखे लिहिते, ते मला ' कमी ' वाटते. पण दोनतीन भाग ती खूप उंचीवर नेते, असे मला वाटते. म्हणून ग्रेट !"

"समजा एखादा बाह्य मूर्ख आहे पण अंतर्मूर्ख नाही तर त्या क्षेत्रात त्याचे नाव होत नाही. त्यामुळे मूर्ख म्हणजे अंतर्मूर्खच असे ठरले असावे. त्यामुळे, आता नुसते ' मूर्ख ' म्हटले तरी चालेल, त्याचे पूर्ण श्रेय त्याला मिळणारच, असे झाले असावे."

"भाषा, बुद्धी, अहंकार यांचे, संपर्क अशक्य करणारे अडथळे -- असल्या संपर्कांच्या बाबतीत मृत्यू पत्करणे श्रेयस्कर !"

"ढोर मेहनतीत शक्ती वाया न जाणे चांगलेच !"

"मोकळे होणे वा गुरफटणे हे व्यक्त होण्या न होण्यावर अवलंबून नाही."

"बुद्धिप्रामाण्यवाद तब्येत बिघडवतो हा एक ग्रेटच मुद्दा लाख्यांनी पुढे आणला आहे ! माझ्या भात्यात हे एक नवीन अस्त्र जमा झाले !"

"धन्यवाद मित्रा, भेटत राहू -- तुम्हालाही मी ओळखून आहे, त्यामुळेच इथे मनमुराद स्वातंत्र्य घेतो !"

"गरिबाघरची मीठभाकर निसर्गाच्या श्रीमंतीत विलीन !"

"सतीश, खरे तर बुद्धीही कुठे जाऊन पोचते हे इतरांनी धाडसाने पाहिले, आपल्या वेड्या बुद्धिनिष्ठांनी तिकडे दुर्लक्षही केले आणि ते लपवायचा प्रयत्नही केला. आता ते करणे अशक्य आहे. कारण एक लागू सोडले तर बुद्धिप्रामाण्यवाद जगभर केविलवाणा झालेला आहे !"

"अरे वा ! ' बुद्धिकोष्ठ ' !"

"काही वर्षांपूर्वी मी हस्तरेषा-शास्त्रावरची खूप पुस्तके वाचली होती -- त्यातही मस्तकरेषा बाधित असण्याचा आणि पोटाच्या विकारांचा संबंध असल्याचे वाचल्याचे आठवते."

"पुण्यातले प्रख्यात डॉक्टर ह. वि. सरदेसाई म्हणतात की ८० % रोगांचे मूळ मानसिक असते. त्याच्याच पुढचे विधान १०० % मानसिक रोग हे विचारामुळे होतात, असे केले तर ? मन, शरीर सगळेच तरण्या-बुडण्याचे खापर विचारावर फोडता येईल का ?"

"माहितातून न-माहितात जाण्याची शक्यता !"

"पोस्ट देवनागरीत आणि बाकी सगळे रोमन ? हिंदीत पत्र आले तर हिंदीतच उत्तर द्यावे असा एक सरकारी नियम आहे, तसे काहीतरी इथे हवे !"

"इझमिस्ट प्लस कमिटेड !"

"एकूणच साहित्यकला ही इतर कलांप्रमाणेच जगणे समजून घेण्याची प्रक्रिया आहे -- अभिव्यक्ती म्हणजे या प्रक्रियेत इच्छुकांना सहभागी करून घेणे आहे. ती रद्दी आहे की मौल्यवान आहे, माझे योग्य स्थान कोणते, माझे योगदान काय, असे सगळे बंदिस्त करायची घाई कशाला ?"

"आपल्याला उपयोग नाही झाला तरी चालेल पण दुसऱ्याचे भले व्हायलाच पाहिजे, ही भावना प्राणवायूसारखी रक्तात भिनलेली !"

"मला समजत नाही -- इथून सुरुवात केली पाहिजे, हे सध्या मला पटतेय."

"स्वप्नील, युसुफ म्हणतात ते बरोबर आहे -- फारसे कुणी यात इंटरेस्ट घेतलेले नाही -- आणि इथे निबंध लिहिण्यावर माझा विश्वास नाही. संकष्टीमुळे जसे आपल्या नाटकाला प्रेक्षक कमी आले, असे आपल्याला वाटते , तसे काही तरी झाले असावे ! यावर उपाय म्हणजे महिन्याभराने हीच पोस्ट पुन्हा देणे !"

"मला प्रॉब्लेम असा दिसतो की -- देव आहे म्हणणारे, देव नाही -- फक्त बुद्धी आहे म्हणणारे, फक्त वेडेपणा आहे म्हणणारे, सतत पिऊन पडावे म्हणणारे आणि आत्महत्या हे एकच सोल्युशन असे म्हणणारे -- या सगळ्यांच्यात फारसा फरकच नाही. हा त्याला अंधश्रद्धा म्हणतोय, तो याला अराजक म्हणतोय, तिसऱ्याला चौथा निराशावादी म्हणतोय. आणि चौथ्याला सगळेच ' बावळट स्वप्नील ' म्हणतायत ! आणि प्रत्येकाला वाटतेय, आपणच फायनल !"

"फेसबुकवर असे सगळे भारी कवी-कवयित्री बघून, ' या पिढीला कलेचे महत्त्व नाही ' हे वाक्य खोटे पडतेय !"

"त्या स्पेशालिटीच्या बाहेरचे जगणे नगण्य होणे हा काही स्पेशालिटीवाल्यांचा प्रश्न असतो !"

"सर्व तऱ्हेचे विचार, मते येणार.असे सगळ्यांनी एकत्रितपणे व्यक्त होणेही काही सांगून जाते !"

"हेही म्हटले जाऊ लागले म्हणजे समता आलीच म्हणायची !"

"आनुवंशिकतेसह सगळे परिणाम त्यात असतात."

"असे सगळे पाहणाऱ्या कविता क्वचितच दिसतात !"

"प्रोग्रॅमिंग वेगळे असते याकडे दुर्लक्ष करणारी कविता --"

"जगण्यातल्या दुसऱ्यांनी कंट्रोल केलेल्या क्षणांचा त्रास !"

"कोणत्याही परिस्थितीत असलेली बहुसंख्य माणसे मानसिक संघर्ष भोगतात पण त्यांना सामोरे जात नाहीत, ऑटोमॅटिक जगत राहतात. सामोरे जाण्याची अर्जन्सी गौतम बुद्धालाही सर्वसुरक्षित जगण्यातही वाटू शकते. याचे निश्चित गणित दिसत नाही."

"कस हा सकारण असतो की नाही, असे या चर्चेचे स्वरूप मला वाटते. नाही -- असे मला दिसते. बाह्य परिस्थिती काहीही असो, मन हे नेहमी संघर्षात्मक पद्धतीनेच काम करते. याच्या प्रश्नांना जो सामोरा जातो तो कसदार, असे मला

दिसते. नाही तर इथल्या लेखकांना वा माणसांना महायुद्धांचे अनुभव नाहीत म्हणून ते कसदार असू शकत नाहीत, असे म्हणावे लागेल !"

"त्या भाषेच्या शक्ती ओळाखणारी माणसे असणे महत्त्वाचे, नुसती संख्या तिला जगवायला फारशी उपयोगी पडणार नाही."

"एखद्या भाषेतले सूक्ष्मातिसूक्ष्म अर्थांचे / आशयांचे भांडार समजून घेण्यात इंटरेस्ट असलेली, तशा समृद्ध अभिव्यक्ती देणारी आणि तशा अभिव्यक्तींचे महत्त्व समजणारी माणसे कमीकमी होत जाणे म्हणजे भाषा मरत जाणे."

"सिंगापूरमध्ये बांधलाय तसा पूल आपण मराठी माणसांनी इथेही बांधला पाहिजे. हे शक्य आहे. थोडी इच्छाशक्ती, पैसा, तंत्रज्ञान आणि कष्ट यांनी ते साध्य होणे अवघड नाही. एवढ्या गोष्टी उलब्ध करून दिल्या म्हणजे उत्तम कलाकृती निर्माण होईलच, असे नाही."

"फारच छान ! माझ्या दृष्टीने यात मतभेदाचा मुद्दाच नाही. फक्त ' पर्याय ' म्हणून हे करण्याबद्दल कधीतरी बोलू --"

"ही नुसती अगतिकता नाही, यात ' असलेल्याला ' एक मोठा नकारही आहे."

"कारण सर्जक असणे हे सर्जक नसलेल्यांना खूप खटकणारे असते !"

"सॉरी ! तसे नसलेल्यांनी बोलू नये, असे मुळीच नाही --"

"आता इथपर्यंत जे आलेत त्यांनी पुढे बोलावे --"

"आणि ' संस्कार ' हे बहुमत आहे !"

"ज्याला समजून घ्यावेसे वाटते त्याने मुक्तपणे त्या प्रक्रियेत जायला हवे --"

"आभास, तुमचे म्हणणे निश्‍चितच समज पुढे नेणारे आहे आणि त्यातल्या धोक्याची पर्वा न करणारे आहे !"

"म्हणूनच, काहीही गृहीत न धरण्यापासून सुरुवात व्हावी -- मला याचे निराकरण माहीत आहे म्हणून हा विषय इथे घेतलेला नसून आपण सगळ्यांनी मिळून यातून काही समजून घेता येईल का, अशी ही चर्चा आहे -- होकार-नकारात्मक मते वेगवेगळी असतील, त्या पद्धतीच्या चर्चांचा उपयोग काय ?"

"श्री पाटील, जरा पुन्हा विचार करा, मूळ प्रश्नाचाच मागोवा घेत जाऊ या --"

"' मानियले नाही बहुमत ' चा इथे संबंध आहे. जग हे मूर्ख, विकृत असूच शकत नाही, अशी तरी सुरुवात कशाला ? तुकाराम अशी सुरुवात करून थांबला असता तर ?"

"जगात ' एकविध मन ' कुणाचेच नाही, तसे नसण्यामुळे माणसाच्या जगण्याची वाट लागते आहे, मग आपण एकविध मनाचा धर्म सांगणाऱ्या तुकारामालाच विकृत म्हणणार ? कोणतीही पोझिशन न घेता आपल्याला समजून काय घेता येईल, हा प्रश्न आहे."

"एकाने दुसऱ्याची पूजा करणे या प्रकारात दोन व्यक्तिमत्वे असतात, त्यांची स्वतःची गुणवैशिष्ट्ये असतात, अस्मिताही असतात. गुणांची पूजा, आदर करतो म्हणणारी माणसेच एकमेकांवर हल्ले करत राहतात. कारण या प्रक्रियेत मूळ संकुचितपणाला बढावा मिळतो. अहो, मन असेच असते, अशी मनाच्या सवयींची समर्थने करत श्रेयसाच्या गप्पा व्यर्थ आहेत. कशाचे अडथळे येतायत ते पाहिलेच पाहिजे. त्यावर उपाय माहीत नाही म्हणून त्याकडे पाहायचेच नाही, असे करून चालणार नाही."

"उदाहरणार्थ आपण अमिताभ आणि सचिन यांना बहाल केलेले ग्लॅमर घेऊ."

"नुसते फेसबुक किंवा देश कशाला, पूर्ण मानवी मनाबद्दलच हे वाक्य आहे. सामान्यतः ही दोन्ही वैशिष्ट्ये एकत्रच असतात, काही कारणांनी प्रमाणाचे फरक असले तरी. प्रणवचे वाक्य खरेच आहे. शहाणा माणूस सापडेल की नाही, हा प्रश्न चुकीचा नाही. मन जर फक्त याच पद्धतीने वागू शकते, असे असेल तर ' श्रेयस ' ही कल्पनाही मातीत घालावी लागेल. मग कशासाठी आपण समता, न्याय, स्वातंत्र्य वगैरे गप्पा मारतो, असा प्रश्न येईल. जे आहे ते गृहीत धरून विचार का करावा ?"

"चला, म्हणजे नशिबाला बोल लावण्यापेक्षा त्याचे आभार मानावे, हेच बरे !"

"अरेरे ! आजच्याच दिवशी माझाही जन्मदिवस असावा ! काय हा दैवदुर्विलास !"

"रेखा शहाणे, धन्यवाद ! तुमच्या लेखनाबद्दल वाटलेली उत्सुकता सार्थ करणारी कविता !कवितेची किंचितशी जाणही ' सारं जग आणून पुढं उभं करते ' -- अत्यंत अर्थपूर्ण ! तुमच्या एकूणच लेखनाची माहिती मिळावी. कविता असतील तर इथे जरूर द्याव्या."

"' लवंगी मिरची कोल्हापूरची ' या वगनाट्यात निळू फुले यांच्या तोंडी असलेला संवाद -- " लग्न ? पावशेर दुधासाठी आख्खी म्हैस पाळायचा धंदा ! ""

"मलाही हे जाणून घ्यायचे आहे -- जाणकारांनी सांगावे --"

"अमर घाटपांडे ही एक ' अलग ' व्यक्ती आहे, हे लक्षात आले होते, पण इतकी टॉप लेव्हल नव्हती कळली, कारण बोलणे फारच कमी ! वेळात वेळ काढून त्यांनी त्यांना आवडणाऱ्या कवितांवर असेच लिहीत राहावे, कविता समजण्याच्या मार्गातला मराठीतला एक उत्तम ग्रंथ सिद्ध होईल."

"प्रमाण बिघडलेले जगणे हे त्रासिक, नाइलाजाचे, ढकलत जाण्याचे, असेच असावे लागेल का, हा प्रश्न उरतोच."

"सोडवतोच किंवा सोडवू शकतोच, असे दिसत नाही. त्या त्या व्यक्तीच्या इच्छाशक्तीव्यतिरिक्त अनेक घटक याला कारणीभूत असतात. तुम्हाला एखादी गोष्ट करायची असते, तिला काही महिने वा वर्षे तुम्ही हातही लावू शकत नाही, असे घडते. अशा प्रमाण बिघडलेल्या जगण्याबद्दल विचार व्हावा यासाठी ही पोस्ट आहे. हा एक महत्त्वाचा विषय वाटतो."

"चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, साहित्यिक, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, संशोधक हे सगळे तासंतास, महिनोनमहिने असे दीर्घकाळ आपापल्या कामात असतात. ही एक्साईटेड की ग्राउंड अवस्था ? एखादा समीक्षक जेव्हा त्याला हवी असलेली चार पुस्तके आणण्यासाठी बसच्या रांगेत उभा राहून, लांब जाऊन ती पुस्तके मिळवण्याचा प्रयत्न करतो तेव्हा पैसा आणि वेळ यांचे महत्त्व दुर्लक्षिता येत नाही. जगणे हे अशा सर्व गोष्टींनी भरलेलेच असणार, प्रश्न प्रमाणाचा येतो."

"मित्रवर्य कल्लोळीजी खूप दिवसांनी भेटलात, आनंद वाटला ! आता इथे फेसबुकवरही कोल्हापूरचे काही मित्र मिळालेत ! एक संमेलन जमवा -- न भांडता पिऊ, खाऊ, गप्पा मारू !"

"यापुढचे सगळे त्या चष्म्याच्या भाग्यावर अवलंबून !"

"Life is a terminal disease -- हे वाक्य वर दिलेले आहे. या वाक्याची मूळ कर्ती आता कळलेली आहे. प्रिया तेंडुलकरांच्या एका टॉकशोमध्ये रेखा शहाणे यांनी उच्चारलेले हे वाक्य आहे. त्या इथे आपल्या मित्रपरिवारातही आहेत. हे वाक्य इतके सणसणीत आहे की विसरणे शक्य नाही. ते इंग्रजीत असल्यामुळे ते तेंडुलकरांनी आणखी कुठून घेतले असले तर मला माहीत नाही, असे मी म्हटले होते. या निमित्ताने, रेखा शहाणे यांनी त्यांच्या लेखनाबद्दल आपणा सर्वांना माहिती द्यावी कारण हे वाक्य त्याबद्दलची उत्सुकता निर्माण करणारे आहे. अनेकांप्रमाणे मलाही अजून त्यांची फारशी माहिती नाही."

"त्या वेळी शोध घेतला जाऊ शकत नाही, तेथे पळवाटच लागते -- त्या वेळेपुरती -- शोध घेणे हे थोडा तोल सावरल्यावर होऊ शकते -- म्हणूनच मी निव्वळ करमणुकीच्या कलेलासुद्धा हेटाळत नाही --"

"त्यांच्यासाठी मी इंग्रजी स्पेलिंगचे मराठी न वाचण्याचा नियम मोडतोय -- योग्य वेळी याची फी वसूल करण्यात येईल !"

"माझ्या आयुष्यात हे कधी ना कधी घडून गेलेले आहे -- या बाबतीतले मित्रमैत्रिणींचे अनुभव समजून घेण्यासाठी ही पोस्ट --"

"तुम्ही तर संगीतसम्राट कानसेन आहात !"

"मजेदार भेदक !"

"भव्यसुंदर !"

"माणसाचे मन ही मुळातच विदीर्ण ( disintegrated ) गोष्ट आहे. त्यामुळे, हे वाक्य wishful thinking मध्ये घ्यावे."

"एक तर अवतीभोवतीच्या जगण्यातला थोडा भागच आपल्याला दिसतोय आणि डोक्याच्या आतले तर दिसूच शकत नाही --"

"मूल्यऱ्हास, ताणतणाव, असुरक्षितता, स्पर्धा, नात्यांतले आणि बाहेरचे संघर्ष, शिवाय महागाई, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, इ. असूनही !"

"गणेश, माझा इंग्रजीला विरोध नाही, इंग्रजी स्पेलिंगचे मराठी लिहिण्याला आहे."

"तेंडुलकरांनी एका ठिकाणी वापरलेले वाक्य -- Life is a terminal disease. ( त्यांनी ते आणखी कुठून घेतले असले तर माहीत नाही )."

"मानवी बुद्धी हा एकूण जगण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेला जगण्यातला एक छोटा भाग आहे. त्यामुळे बुद्धीने समग्र जगण्याबद्दल विधान करण्यात तथ्य नाही."

May 4

10:12pm

Shriniwas Deshpande

"कलावस्तू मर्यादित असते पण ती अमर्याद सांगू शकते."

10:10pm

Chandrakant commented on a photo.

Photo

Timeline Photos

"मन वापरण्याच्या सवयीच्या पद्धतीला ' धर्मा ' चे आव्हान असते. त्याच सवयीच्या पद्धतीतून होय म्हटले काय आणि नाही म्हटले काय, दोन्ही निरर्थकच ठरणार."

"कुणालाही जर असे वाटले की मी रागावून बोलतोय तर लगेच माफी मागण्यात येईल आणि चर्चेतून निवृत्ती स्वीकारण्यात येईल. तसे नाही. सगळे सडण्याची कारणे आपण मान्य करणार आणि सडणे नको म्हणणार, हे दोन्ही कसे चालेल, एवढाच प्रश्न आहे."

"इथे राजनजी, मार्क्स त्या नासवण्याच्याच प्रक्रियेचा पाईक नाही का -- हेही विचारले पाहिजे."

"आहे ते नासवा, असे सांगायची गरज काय ? प्रचंड नासवणेच तर चालू आहे ! आणि आपण आहे तेच ठीक म्हणणार ?"

"संथ आणि शांत म्हणजे डल असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ते खरे असते का हा भागच वेगळा, पण आपण सर्व छळ, विकृती, दुःख यांचे समर्थन करतो, हे निश्चित !"

"बुद्धिगम्य माध्यम अपुरेच असणार, म्हणूनच कलेचे वेगळे महत्त्व आहे."

"आपोआप क्रियाप्रतिक्रियांचे वस्तुमय होत चाललेय जगणे -- तांब्यांचे वाक्य खूपच गंभीरपणे विचारात घेतले पाहिजे. एका क्षणाचीही मोकळी स्पेस नसलेले असे खरोखरच उठवळ, नीरस, निबर जगणे."

"Jungle ... city ... Pune हे मी लिहिलेले नाही, कुणी लिहिले असावे ? असे दुसरी व्यक्ती इथे लिहू शकते ? माहितगाराने सांगावे, ही विनंती."

"एका तत्त्वज्ञाने शहाण्या माणसाची व्याख्याच ही केलेली आहे."

"आपलेही तथाकथित गुण-अवगुण वगळले जावे !"

"पोट भरल्यावर ? तहानभूक मातीत घालून, डोके भरकटवून, अंत्यविधीकडे पोचवणारा प्रश्न आहे हा !"

"जगण्यातल्या या महत्त्वाच्या प्रश्नावर किती मोकळेपणाने आणि भरपूर बोलले गेले पाहिजे ! नुसता प्रश्नाचा त्रास भोगण्यापेक्षा तो प्रश्न समजून घेणे अधिक अर्थपूर्ण असणार नाही ? न जाणो त्या प्रश्नाच्या मुळातच त्याचे निराकरण असायचे !"

"दुसरी व्यक्ती ' चांगली ' असती तर एकटेपणा पत्करावा लागला नसता -- हा विचार तरी छळणारच ! थोडक्यात, पळवाट उपलब्ध नाही !"

"बुद्धवचनाशी सुसंगत !"

"होय -- हा गोंधळ शोधाला प्रवृत्त करणारा आहे --"

"पुरेसा गोंधळ झालाय तयार -- थांबावे का इथे ?"

"प्रत्येक बोलणे हे त्याच्या त्याच्या वेगवेगळ्या मानसिक माहोलाने प्रभावित झालेले असते आणि हा मानसिक माहोलही बदलत असतो. यालाच जर ' सत्य ' म्हणायचे असेल तर असत्य कोणते आणि सगळेच सत्य असेल तर ' सत्यवचनी ' या शब्दाची गरजच काय ?"

"म्हणजे अ स्वतःला सत्यवचनी म्हणू शकतो पण ब ने अ ला सत्यवचनी म्हणण्यात काही अर्थ नाही ! दुसरे, बुद्धवचनाप्रमाणे सगळे सतत बदलत आहे -- त्यामुळे अ चे सत्यही बदलत राहणार ! प्रत्येक वेळी जे जसे खरे वाटेल ते प्रामाणिकपणे बदलत जाणारा म्हणजे सत्यवचनी ? आणि अ च्या मानसिक सत्याला कोणत्या आधारावर सत्य म्हणावे ? त्याने आणि इतरांनी ?"

"एकच घटना वेगवेगळ्या प्रकारे निवेदित होते -- उदा. ' राशोमान '. एकाच घटनेचे आकलनच भिन्न भिन्न असू शकते. प्रामाणिकपणेही ही भिन्नता अस्तित्वात येते आणि हेतूपूर्वकही ' भूमिका ', ' पवित्रा ' घेऊनही अस्तित्वात येते. प्रत्येकाचे मन, ते वापरण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असल्यामुळे एकच सत्य असू तरी शकते का ? म्हणजे ' सत्यवचनी ' या शब्दाला काही अर्थच नाही, असे होत नाही का ?"

"नुसत्या गंमती, चमत्कृती यांचा मी फारसा शौकीन नाही."

"आभास, इथे आपल्यात बोलायचे झाले तर समजून घेण्याची प्रक्रिया चालू राहणे महत्त्वाचे असल्यानेच आपण या जगात आहोत !"

"यातून कदाचित मराठीचे थोडे भले होइल, पण मुख्य म्हणजे माझा बराच त्रास वाचेल --"

"आपापल्या जबाबदाऱ्या, कामे यांबाबत हुशार ( शहाणे नव्हे ) आणि जगण्याच्या बाबतीत मूर्ख, अशा भेदानेही या विषयाचे एक वेगळे परिमाण लक्षात येऊ शकेल."

"डॉक्टर, एकूण सर्व अगणित कारणे पाहता, सगळे मिळून शास्त्रीय भाषेत ' शरीरसापेक्ष ' असे म्हणावे काय ?"

"ते तसले वाचण्यात वेळ जास्त जातो, त्रास होतो आणि नीट कळतही नाही ! शिवाय स्पेलिंग मिस्टेकस असतात !"

"मराठी लोकांनी युनिकोड शिकलेच पाहिजे --"

"सतीश, प्रतिमा भंग पावण्याची भीती, हा कॉमन रोग दिसतो, पद्धती फार तर वेगळ्या असतील. काही वेगळ्या, विशेषतः प्रगत देशांत वास्तव्य केलेल्या लोकांनी यावर बोलले पाहिजे."

"या बाबतीत स्त्री-पुरुष समानता एक वेळ काळाच्या ओघात येऊ शकेल पण ' हातचे राखून ' असणे यात बदल होण्याची शक्यता वाटत नाही. समाजमान्यतेप्रमाणे आचरण नसणे -- हे अमर द्वंद्व, हेच त्याचे कारण."

"जी गोष्ट मी केली पण सापडलो नाही तीच पापकृती दुसरा कुणी करताना सापडला तर त्याची छीःथूः करण्यात मी आघाडीवर असणार !"

"एक तर पाप ही समूहागणिक बदलणारी संकल्पना आहे -- याला रसेल भौगोलिक संकल्पना म्हणतो -- आणि दुसरी गोष्ट म्हणजे पूर्ण समाजमान्य मनोरचनेचा आणि आचरणाचा माणूस असूच शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाच्याच मनात अपराधी भाव असतो. मनासारखे वागता आल्याने समाधान लाभू शकते, पण यात संघर्षाची, त्रासाची शक्यताही गृहीत धरूनच चालावी लागणार."

"एखाद्याला स्वीकारलेला अभ्यासक्रमच आवडत नाही किंवा नोकरी-काम-धंद्याचे क्षेत्रच आवडत नाही किंवा एखादा जवळचा संबंधच आवडत नाही किंवा आपण राहात असलेले घर वा गावच आवडत नाही किंवा फार गर्दी, फार एकटेपणा वा फार निसर्ग आवडत नाही आणि सगळ्यात विचित्र म्हणजे स्वतःचा स्वभावच त्रासदायक असल्याने आवडत नाही -- हेही सगळे घ्यावे यात."

"या प्रश्नात सगळे रहस्य दडलेले आहे, असे वाटते -- हे काय असेल ते असो, पण सखोल विचाराला प्रवृत्त करणारे वाक्य इथे दिल्याबद्दल खरेच धन्यवाद !"

"ही समजूत मान्य -- पण ती अमुक टप्प्यांनी येते असे काही नाही -- किंबहुना, अनुभवाचा परिणाम म्हणून समजूत येते का ? -- हा महत्त्वाचा प्रश्न वाटतो --"

"बदल म्हणजे उंच पातळीवर जाणे ?"

"मग उंच पातळीवर जाणे म्हणजे काय ?"

"नाही, अनुभवाला महत्त्व देतोय की नाही आपण, हेच तपासायला हवे -- टप्प्याटप्प्याने शहाणपण म्हणजे अनुभवच नाही का ?"

"समजा मला जवळचे कुणी गेल्याचा अनुभव आला -- मी त्या दुःखातून तावूनसुलाखून निघणार म्हणजे काय ? तसे तर सगळेच असे अनुभव घेत जातात -- म्हणजे शहाणे होतात ? समजुतीच्या उंचीवर जातात ?"

"वय, वयाचे टप्पे, तावानसुलाखून निघणे -- हा अनुभव नाही तर काय आहे ?"

"जरा संशयास्पद वाटतेय हे वाक्य -- अनुभवाने माणूस शहाणा होतो ?"

"विनयजी, हे वाक्य अर्थातच तुम्हाला पटलेले असावे. माझ्या समजुतीप्रमाणे सत्य नेमके उलट आहे ! काहीही बोलले तरी त्यात थोडा तरी तथ्यांश असतोच, या विभागातही माझ्या वाक्याच विचार व्हावा !"

"युनिकोड फ्री उपलब्ध असूनही देवनागरीचा अवलंब करण्याचा का कंटाळा करतात अनेक लोक ?"

"सगळ्यांचीच मने वेगवेगळ्या प्रकारे विदीर्ण आहेत, हे लक्षात आल्यावर सगळेच समर्थनीय ठरते किंवा अमुक प्रकारची विदीर्ण माणसे तमुक प्रकारच्या विदीर्णांना कसे जगावे याची अक्कल शिकवत राहतात -- याव्यतिरिक्त काही असू शकते का, हा प्रश्न पडतोच. तीच अध्यात्माची सुरुवात असावी, असे वाटते."

"शिव्या खाणाऱ्याचा अहंकार धुतला जात असल्याने तो शिव होत असावा !"

"शिववडाप्रमाणे शिव्यापोळीचे स्टॉल्स काढायचा विचार आहे की काय !"

"मीटिंगा संध्याकाळी ठेवत चला, सगळ्यांची सक्रिय मदत मिळेल !"

"म्हणून संशोधन चालू ठेवावे -- हा ठीक आहे का निष्कर्ष ?"

"हे असे सूक्ष्म बारकावे माणसाला संशोधनामुळेच कळतात !"

"काय मिळणार आहे, हे आधी समोर दिसले पाहिजे !"

"संशोधकानेही सगळेच तूप आपल्याच पोळीवर ओढू नये -- अशाच इतर वाटपालाही वाव ठेवावा !"

"' अर्थपुरण ' असली तरी शिवाय मदत पूर्णही मिळावी -- कमिशन न कापता !"

सोडून आलो आहे गाव....
"शहरातच राहात आलेले लोकही म्हणताहेत की पूर्वीचे शहर चांगले होते !"

निरर्थकाची खोली
"ठरलेली पोझिशन म्हणजे मी स्वतः साठलेले असण्याची अवस्था असावी -- नाही तर मीनिंग हवेयच कशाला आणि कुणाला ?"

"मिलिंद शिंत्रेंना भेटा -- त्यांच्याकडे ' प ' पासून सुरू होणाऱ्या शब्दांची विक्रमी कथा आहे !"

"अगदी खरे आहे -- सामाजिक मान्यता आणि प्रत्यक्ष जगणे यांत फरक असतोच."

"माझे झाले होते ना -- मग फ्रेंडस ओळखणे वगैरे करून पासवर्ड बदलल्यावर सुरू झाले."

"कळत नाही, काही हाती लागत नाही, निरर्थक सगळे, कशाला लिहितात कोण जाणे -- ही माझ्यासारख्याची आवडीची कॅटेगरी !"

"अर्थपूर्ण संशोधन म्हणजे काय, हा यातला अंतर्भूत प्रश्न !"

"कुणाची आठवण येतेय हेही कळू नये इतक्या व्यक्ती आहेत अशा आठवणीयोग्य ?"

"माणसांच्या मूल्यमापनाची तागडीच जणू माझ्याकडे आहे असे समजून मी जगत असेन तर जागे व्हायला कधीतरी सुरुवात व्हावी. हे होणारच नसेल तर शोकांतिकेपासून माणूस लांब नाही, हे स्पष्ट आहे."

"युसुफ, तुमचे मुद्दे योग्यच आहेत. या प्रश्नांतली जी गुंतागुंत आहे, एकमेकांवर परिणाम करणारे अनेक विचार आणि फोर्सेस आहेत यांचा कलावंताने आवाका घ्यावा, त्याचे समग्र भान निर्माण करावे, हे मला महत्त्वाचे वाटते. एक बाजू घेणारा, भूमिका घेणारा कलावंत फार मोठ्या आवाक्याची कलाकृती निर्माण करू शकत नाही."

"' सत्य ' शब्द नको, निर्विवादपणे सगळेजण जिथे पोचावेत असे काही -- असे म्हणू. विचाराने असे काही सापडत नाही हाच तर मुद्दा आहे. त्याचे कारण दिलेले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या नावाखाली चालणारा बुद्धिप्रामाण्यवादही अंधश्रद्धाच ठरतो ते त्यामुळे. तरीही माणसे आपापल्या पद्धतीत हेकट, आग्रही आणि हिंसक असतात. आपण दुसऱ्यांना कंडेम करतानाची ( हेटाळतानाची ) आपली मनःस्थिती कसे काम करतेय, हे पाहायला नको ? सगळेच असे करत असल्यामुळे तर माणसाच्या जगण्याची वाट लागत चाललेली आहे."

"कौशल, तू म्हणतोयस ते सर्जकतेला अधिक महत्त्व येत चालल्याचे लक्षण असावे --"

"वैचारिक मांडणी करून, वादाने वा संवादाने जर सत्यापर्यंत पोचता आले असते तर वेगवेगळी मते असायचा प्रश्नच आला नसता. विचार, बाजू वा मत यांची मांडणी ही कुठल्यातरी ' निवडलेल्या ' सोयीस्कर पायावर आधारित असते. माहितीने ओवरलोड झालेल्या आजच्या जगात अशा कुठल्यातरी माहितीच्या चिरगुटांवर आधारित निष्कर्ष काढून त्यासाठी पूर्ण आयुष्य पणाला लावणे हे वेडेपणातच जमा व्हावे."

"कौशल, व्होल्टेअरचे मला नीट काही माहिती नाही, पण तू दिलेल्या वाक्यावरून ते मतस्वातंत्र्याचे महत्त्व सांगणे दिसते -- इथे तेही ऐरणीवर घ्यायचे आहे --"

"म्हणजे ' मत ' या स्थितीबाबत संशय वाटणे हेही एक मतच -- असे ?"

"' मत ' हा प्रकार अत्यंत बालिश आणि गधडेपणचा समजावा का ?"

"' मी स्वतः सर्वश्रेष्ठ आणि समजुतदार आहे ' हाच फक्त एकूण मानवी जगण्याचा सारांश असतो का ? मग मी दुःखी का ? अस्वस्थ का ?"

"आपले स्वतःचे मानसिक प्रोग्रॅमिंग श्रेष्ठ धरून चालण्याचा तर हा प्रकार नसतो ?"

"प्राची, समजून-उमजून भ्रमात सामील होणे हे मलाही पूर्ण मान्य !"

" -- त्यामुळे प्रत्यक्षात नीती, शूरपणा यांचा विचार जगण्यात खूपच कमी असतो -- आपण राम आहोत की रावण आहोत हे सिद्ध करण्यात कुणाला इंटरेस्ट नसते कारण पूर्णपणे राम वा रावण अशी व्यक्ती अस्तित्वातच नसते -- म्हणूनच या विषयातले सर्वात मोठे क्षेत्र छुपेपणाचे असते ! एक छोटे क्षेत्र शूर, बेजबाबदार लोकांचे असते आणि दुसरे एक छोटे क्षेत्र सगळे मनात दडपून विकृत, डल जगणाऱ्यांचे असते ! आपण वस्तुस्थिती समजून घेतोय -- कुणी कुणाला कशाला प्रोत्साहन देण्याचा हा प्रश्न नाही --"

"नीतीकल्पना आणि अटळ सुखशोध यांच्यात नेहमी संघर्षच असतो आणि अनीतीने वागताना प्रत्येक वेळी शूर बेजबाबदारपणानेच वागले पाहिजे, असे नसते, त्यामुळे, अशा घटनांचे प्रचंड अंडरवर्ल्ड जगभर अस्तित्वात असते !
( हेच अंडरवर्ल्ड हाताळणारे माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' नामक एक नाटक आहे. )"

"बहुतही बडी छलांग मार दी !"

"आणि ही घंटी वाजावी असे वाटणाऱ्यांना मनाच्या महादेवाचे देऊळ जरा गावाबाहेरच ठेवावे लागते ! कुणी पाहात नाहीय हे पाहूनच अशी घंटी वाजण्याची शक्यता असते !"

"बाहेरची माणसे, पुस्तके वगैरेंची मदत न घेता अस्तित्वात येऊ शकणारी सर्वांत महत्त्वाची समज-प्रक्रिया !"

"लव्हस्टोरीतले लव्ह हे स्वतःच्या सुखाच्या शोधात ' निवडलेल्या ' व्यक्तीवरचे लव्ह असते. ते बिनशर्त असू शकत नाही. शर्तींत बिघाड झाला की एका सेकंदात लव्हचे रूपांतर हेटमध्ये होते !"

"हे आता खूप व्यक्तींना कळत असल्याने स्वप्नीलपणा कमी झालाय असे वाटते --"

"' हर सवालका सवालही जवाब हो ' -- ' दिल एक मंदिर ' ."

"' लव्हस्टोरी ' हा शब्दच ऍब्सर्ड आहे --"

"काही मिळवायचे असते तेव्हाच तणाव येतो. मन वापरायची परिचित पद्धत तणावाचीच आहे. ओळीने प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा सापडते, हा निव्वळ भ्रम आहे. समतेचे जगणे म्हणजे अलगतावादी नसलेले जगणे. विषमतेच्या, अन्यायाच्या, छळाच्या प्रश्नांवर कुठल्याही संक्रमणात कुठलीही उत्तरे नसतात. भ्रमिष्ट आदर्शवादाचा उपयोग आहे -- असे वाक्य बिनस्वप्नाळू होईल ?"

"येत्या २७ ला मुंबईत रवींद्रला, लाख्यांच्या ' मिती चार ' तर्फे माझ्या ' वस्तू ' या नाटकाचा प्रयोग आहे -- शक्य असेल त्यांनी जरूर बघा -- शिवाय नाशिकचा एक ग्रुप लौकरच ' विरहवेदना ' हे माझे नाटकही मुंबईत सादर करेल. धन्यवाद प्राची !"

"ज्ञानदा, एक तर हे फक्त आपल्यावर अवलंबून नाही आणि स्टुपिडिटी आणि रेस्ट एवरिथिंग यांतही फारसा भेद राहात नाही. we all make mistakes. -- हे तुझ्या मानवी समजुतीचे निदर्शक. रिझॉल्व्ह होण्याची शक्यता तुला वाटतेय -- ते ठीक. आत्ता, या क्षणी काय ? मी या प्रश्नाचा छळ सोसू ?"

"' दुःखी ' मन हे ' आनंदी ' असण्याला ' मागासलेले ', ' निर्बुद्ध ' समजतेय, हे येतेय का आपल्या लक्षात ?"

"मी दिलेली एक कॉमेंट आली नाही वाटते -- आठवेल तशी पुन्हा -- संस्कृतीचा मानसिक साठा आणि प्रत्यक्ष जगणे यांत एक फट -- गॅप -- असते, त्यामुळे, ते फक्त मतमतांतराचे जगणे असते, त्याला मूल्यात्मकता नसते --"

"हेही इतके बारकाईने आले की पुन्हा एकदा ' बुद्धिमान ' म्हणावेसे वाटते ! छानच !"

"आपण ज्याला संस्कृती म्हणतो ती आंतरविरोधात्मक असते. ' हिंसा वाईट ' हे मान्य पण ' हिंसा अटळ आहे ', हेही मान्य, अशी ! ' संस्कृती ' म्हणजे हेच, असे कायमचे सत्य असतॆ. याचा अर्थ ' संस्कृती ' अस्तित्वातच असू शकत नाही, मग आपण कशाबद्दल बोलतोय ?"

"यावर मी आणखी लिहिणार आहे, इतर व्यापांमुळे राहतेय --"

"केतकी का ? तिने माझ्या एका नाटकात काम केले होते, लक्षात आहे ना ? तिला माझ्या शुभेच्छा कळवाव्या."

"अहो, या बदललेल्या पद्धतीत मैत्री-विनंत्या कुठे येतात तेच माहीत नव्हते -- आता माहीत झाले -- एकदम ५२ वाढले !"

"ज्यांचा मला अत्यंत संताप येतो त्यांच्याबद्दल न चिडता बोलण्याचा प्रयत्न !"

"मी ८६३ वरून ८०९ वर घसरलोय ! माझे या निमित्ताने लक्ष गेले ! पण मी खूप पॉप्युलर होऊ शकणारच नाही, हे मी सगळीकडेच समजून असतो !"

"आजच्या काळात निरनिराळ्या प्रकारे प्रतिक्रियारूपात येणारी अभिव्यक्ती मी पोस्टमध्ये चर्चेला दिली आहे. ते माझे आकलन आहे, म्हणून नव्हे. ' संस्कृती ' हा भूतकाळच असतो आणि तो मूलभूत प्रश्न निर्माण करतो असे मला दिसते. कुठल्याही भूतकाळरूप मूल्याशी मानसिक सुसंगत वागण्याच्या प्रयत्नाची कृती ही संघर्ष आणि ढोंगीपणा यांची निर्मिती करते आणि संस्कृतीनाश करते, असे दिसते. त्यामुळे आपण ज्याला संस्कृती म्हणतो ती खरे तर संस्कृतीनाशाची प्रक्रिया असते ! ' हिंसा नको ' हे सांस्कृतिक तत्त्व होत असेल तर ती बोगस गोष्ट आहे. ' संस्कृती ' असे काही असलेच तर ते भूतकालीन बुद्धिसाठ्यापेक्षा वर्तमानातल्या एकात्म कृतीला महत्त्व देणारे अस्तित्व असेल, असे मला इथे मांडावेसे वाटते."

"पाचदहा वर्षांत जनुक-अभियांत्रिकीद्वारे आपल्याला हवे ते, हवे तसे बदल करून मिळणार आहेत, असे ऐकतोय ! मग ' मी कोण ' हा प्रश्न पुन्हा उसळी घेईल !"

Photo

24TH ARVIND DESHPANDE THEATRE FESTIVAL - 4

"नाटकाचे नाव आलेले नाही --"

"आणि खूप रडूनही खूप भूक लागते -- हे आजचे वाक्य ऑफ द डे ठरावे !"

"इतक्या प्रचंड काळोखातही सेल्फआयडेंटिटीचा शोध !"

"बौद्धिक कळणे सगळ्यांचे अर्धवटच असते, त्यामुळे माझेही अर्धवट असले तरी काही बिघडत नाही ( म्हणजे बिघडणारच असते ). म्हणूनच बुद्धिप्रामाण्यावर वा तथाकथित विवेकावर जगणे हे रामभरोसे जगणेच असते !"

पगला घोडा.
"आता प्रयोग कधी, कुठे आहे ?"

"आपल्या आजूबाजूला दिसणारा दृष्टिकोण, विशेषतः उत्तर-आधुनिक म्हटली जाणारी धारणा या पोस्टमध्ये दिलेली आहे. उपरोध वगैरे त्या धारणेतलाच आहे."

"आनंद थत्ते जर ' पूर्वग्रहविरहित ' असा ' संस्कृती ' या शब्दाचा प्रचलित अर्थ देऊ शकले तर या चर्चेला एक वेगळे परिमाण मिळेल. वर आलेल्या अर्थांशी ते सहमत नाहीत. उत्सुकता तर वाढलेली आहे."

"' संस्कृती ' हा शब्द भाषेत असावा की नसावा याचा निर्णय घेण्याचे अधिकार कोण कुणाला देणार ? त्यासाठी ही चर्चा चाललेलीच नाही. बदलते विचार, मूल्ये वा न-मूल्ये, बदलते आकलन यांबाबतचे भान अशा चर्चेतून वाढू शकते. दोन गट पाडून मारामारी करणे म्हणजे चर्चा नव्हे. निष्कर्ष काढणे, कुणीतरी कुणाला काही पटवून देणे हे अशा चर्चेचे उद्देश असू नयेत ( असे मला वाटते ). सगळेच निरर्थक वाटणारे लोकही असू शकतात पण तेही जगातल्या चर्चा, विचार, समजून घेण्याचे दुसऱ्यांचे प्रयत्न थांबवू शकत नाहीत. चर्चावल्यांना ही गुड न्यूजच असते !"

"बरे, हे वेब्स्टरच्या शब्दकोशातले बघा --1. A particular society at a particular time and place.[Wordnet]
2. The tastes in art and manners that are favored by a social group.[Wordnet]
3. All the knowledge and values shared by a society.[Wordnet]
4. (biology) the growing of microorganisms in a nutrient medium (such as gelatin or agar); "the culture of cells in a Petri dish".[Wordnet]

5. A highly developed state of perfection; having a flawless or impeccable quality.[Wordnet]
अनबायस्ड प्रचलित अर्थ कोणता आहे, ते तरी समोर यावे --"

" हे उपयोगी पडेल असे वाटल्याने देत आहे --

Culture is a definition highly misunderstood and misused, thus the need for an explanation:

Culture refers to the following Ways of Life, including but not limited to:
Language : the oldest human institution and the most sophisticated medium of expression.

Arts & Sciences : the most advanced and refined forms of human expression.

Thought : the ways in which people perceive, interpret, and understand the world around them.

Spirituality : the value system transmitted through generations for the inner well-being of human beings, expressed through language and actions.

Social activity : the shared pursuits within a cultural community, demonstrated in a variety of festivities and life-celebrating events.

Interaction : the social aspects of human contact, including the give-and-take of socialization, negotiation, protocol, and conventions.
All of the above collectively define the meaning of Culture."

"

"काही सखोल, वैश्विक, मूल्यात्मक, सत्य असे असते असा अर्थ ' संस्कृती ' या शब्दात नाही ? मग प्रचलित अर्थ तरी काय आहे या शब्दाचा ? आधी प्रचलित अर्थ पाहावा आणि मग पुढे बोलावे, हे योग्य होईल, असे मला वाटते --"

" -- अगदी मोकळेपणाने बोलू या ! मी, मला पटण्यापेक्षा, सुरुवात शब्दकोशातल्या अर्थापासून केलीय -- पण विशेषतः उत्तर-आधुनिक समजुतीबद्दल आपल्या मित्रमैत्रिणींनी खुलेपणाने बोलावे म्हणून हे वाक्य दिले आहे --"

"चांगले, शुद्ध, संस्कारित, मूल्यात्मक अशा गोष्टींना संस्कृती म्हणतात -- या पार्स्वभूमीवर या वाक्याची चर्चा होण्याची गरज आहे की नाही ?"

"आपल्या मित्रमैत्रिणींना हा लेख वाचण्यात फारसे इंटरेस्ट नाही, हे पाहून जरा वाईट तर वाटणारच ना !"

"ही एफबीवरची कमाई -- आपल्यासारखेच जाणवणाऱ्या व्यक्ती भेटणे !"

"आधीच्या सवयींतून बाहेर पडणे एकाला तरी जमावे ! म्हणजे ' आज ' समजून काही होऊ शकेल !"

"छान मोकळे जगणे !"